१.सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन स्तरावरील कामकाज

शासन स्तरावर मा. मंत्री (सार्वजनिक बांधकाम) तसेच मा.राज्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे अधिपत्याखाली विभागाचे दोन सचिव [सचिव (रस्ते) व सचिव (बांधकामे)] हे सर्वोच्च प्रशासनिक अधिकारी आहेत. शासन स्तरावर विविध धोरणात्मक निर्णय, तांत्रिक निर्णय, विभागाचा अर्थसंकल्प, राज्य महामार्ग व इतर रस्ते, शासकीय इमारती यांचे बांधकाम, देखभाल / दुरुस्ती इत्यादी विषय हाताळली जातात.

१.१ अर्थसंकल्प :-

राज्यातील रस्त्यांची निकड विचारात घेऊन शासनामार्फत २० वर्षासाठी रस्ते विकास योजना तयार केली जाते. तयार केलेल्या आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी रस्ते, पूल व इमारती यांची कामे अर्थसंकल्पात समाविष्ट केली जातात. निधीच्या उपलब्धतेनुसार कामांच्या प्रगतीबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात येतो.

अर्थसंकल्पात समाविष्ट झालेल्या रस्त्यांची व इमारतींची मूळ कामे आणि देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी लागणारा आवश्यक निधी शासना मार्फत उपलब्ध करुन दिला जातो.
महाराष्ट्र शासनाच्या एकंदरीत अर्थसंकल्पात सार्वजनिक बांधकाम विभागास उपलब्ध होणारा निधी कामांची व्याप्ती पाहता कमी पडत असल्याने हुडको, नाबार्ड यासारख्या संस्थाकडून कर्जरुपाने निधी उपलब्ध करुन, तसेच खाजगीकरणाच्या माध्यमातूनही निधीची उभारणी करुन लोकोपयोगी कामे करण्यात येतात.

१.२ रस्त्यांची दुरुस्ती कार्यक्रमास मान्यता देणे:-

विविध रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी वार्षिक कार्यक्रम, क्षेत्रीय स्तरावरुन तयार केली जातात. त्याला शासनस्तरावर मंजूरी प्रदान करुन निधी उपलब्ध केला जातो. हे कार्यक्रम मंजूर करतांना लोकप्रतिनिधींच्या मागण्या, जनतेच्या तातडीच्या मागण्या यांना प्राधान्य देण्यात येते. शासनाचे मार्फत याबाबत सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

१.३ विधानसभा व विधान परिषदेसंबधी कामकाज :-

दर वर्षी सर्वसाधारणपणे तीन वेळा (मार्च, जुलै, डिसेंबर) विधान मंडळाची अधिवेशने होतात. त्या अनुषंगाने प्रश्न व उत्तर, ठराव इत्यादींचे कामकाज,अर्थसंकल्प,पूरवणी मागण्या इत्यादी विषय शासनस्तरावर हाताळले जातात.

१.४ अधिका-यांच्या बदल्या :-

वर्ग-१ व वर्ग-२ अधिका-यांच्या बदल्या शासन राजपत्रक दिनांक दि.१२.०५.२००६ अधिनियम २००५ अन्वये निर्गमित केलेल्या सुचना प्रमाणे करण्यात येतात.

१.५अधिका-यांच्या पदोन्नत्या :-

विविध संवर्गात वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या ज्येष्ठता याद्यांनुसार अधिका-यांना रिक्त जागाच्या अनुषंगाने पदोन्नत्या देण्यांत येतात.

* * *

२.१ रस्ते विकास योजना (20 Years Plan)

या आधीच्या रस्ते विकास योजना फक्त रस्ते विकास बांधकामाच्या निधी उपलब्धतेनुसार मर्यादितच नव्हत्या तर रस्त्याच्या विकासांच्या आवश्यकतेवर आधारीत होत्या म्हणून राष्ट्रीय पातळीवर १९८१-२००१ ची रस्ते विकास योजना करताना आर्थिक मर्यादा विचारात न घेता बृहत योजनेचा संकल्पना विचारात घेणारी व ग्रामीण भागातील साधारण मनुष्याच्या आकांक्षा सदैव वाढविणारी ठेवावी असे योजले आहे. १९८१-२००१ रस्ते विकास योजनेचे मध्यावधी पुनर्विलोकन करण्याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे देशाच्या ग्रामीण भागातील आर्थिक विकास करणे व खेडी आणि लहान शहरे विकासाचे स्वरूप साकार करणे होय. त्यामुळे लहान मोठ्या शहरांकडे खेड्यातील लोकसंख्येचा ओघ थांबविंणे शक्य होईल आणि खेड्यातील राहण्याची परिस्थिती सुधारली जाईल यावर भर दिला आहे. हे उद्दीष्ट साकार होण्यासाठी सर्व खेडी सन २००१ अखेरीस बारमाही रस्त्याने जोडली जातील असे उद्दिष्ट ठरविले आहे. त्या द्वारे ग्रामीण भागातील जनतेच्या किमान अपेक्षा व गरजा पूर्ण करण्यावर शासनाचा भर आहे.

१९८१-२००१ पुर्नविलोकीत रस्ते विकास योजनेची इतर महत्वाची उद्दीष्टे खालीलप्रमाणे

(अ) राष्ट्रीय महामार्गाचे जाळे अशा रितीने विस्तारले जावे कि त्यामुळे १०० कि.मी. बाजू असणारी जाळी तयार व्हावी.

(ब) जलद वाहतुक व्हावी यासाठी जास्त वाहतूक वर्दळ असलेल्या मार्गावर द्रुतगती मार्ग बांधावेत.

(क) जिल्हा मुख्यालये , उप-विभागीय मुख्यालये , मुख्य औद्योगिक केंन्द्रे , व्यापारी स्थळे पर्यटन स्थळे , मुख्य कृषी बाजार केंन्द्रे आणि बदरे राज्य मार्गाने जोडले गेले पाहिजेत.

(ड) सर्व शहरे आणि १५०० व त्यावरील लोकसंख्येची गावे जी प्रत्यक्षात राष्ट्रीय महामार्गाला राज्य मार्गाने जोडली गेली नाहीत, अशी गांवे प्रमुख जिल्हा मार्गांनी जोडली गेली पाहिजेत. तसेच भिन्न शहरे आपापसात प्रमुख जिल्हामार्गानी शक्य असेल तेथे जोडली पाहिजेत.

(इ) १०००-१५०० लोकसंख्याची गांवे व इतर जिल्हा मार्गांनी जोडली पाहिजेत.

(फ) प्रत्येक खेड्यास किमान एक बारमाही रस्ता असला पाहिजेत.

(ग) डोंगरी व दुर्गम भागातील खेडंयाना जेथे शेती/इतर सामाजिक सुखसोयी, नदी/खाडी पलिकडे आहेत, अशा भागातपादचारी पदपूल (साकव) बांधले पाहिजे.

सन २००१-२०२१ रस्ते विकास योजना

केंद्र शासनाने नोव्हेंबर २००१ मध्ये प्रसिध्द केलेल्या Road Development Plan Vision 2021 पुस्तिकेत समाविष्ट असलेल्या मार्गदर्शक सुचनांच्या आधारे आता सन २००१-२०२१ ची रस्ते विकास योजना तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

व्हिजन २०२१ ची महत्वाची उद्दीष्टे खालील प्रमाणे

१. द्रुतगती मार्ग

१९८१-२०२१ च्या रस्ते विकास योजनेत समाविष्ट नसलेल्या सर्व द्रुतगती मार्गाचा समावेश रस्ते विकास योजना २००१-२०२१ मध्ये करण्यात यावा. ज्या राष्ट्रीय महामार्गावर वाहतुक वर्दळ अतिशय जास्त आहे त्यांचे चौपदरीकरण २०२१ पर्यंत करावे.

२. राष्ट्रीय महामार्ग

महत्वाच्या राज्यमार्गाचा राष्ट्रीय महामार्गामध्ये अंतर्भाव करण्यासाठी प्रस्तावित करण्यात यावे.

३. राज्यमार्ग

प्रमुख बंदरे, औद्योगिक शहरे, पर्यटन व तिर्थक्षेत्र जोडणारे असावेत. जिल्हा मुख्यालय ते जिल्हा मुख्यालय दुपदरी असावा, तालुका मुख्यालय ते जिल्हा मुख्यालय किमान दीडपदरी असावा, २०२१ पर्यंत दुपदरी करणे, सर्व जिल्हा मुख्यालय शहरास रिंगरोड व सर्व तालुका मुख्यालय शहरास वळणमार्ग प्रस्तावित करावेत.

४. प्रमुख जिल्हा मार्ग

१५०० व त्यावरील गावे, बाजार मुख्यालये प्रमुख जिल्हा मार्गावर असावीत, अतिशय जास्त वाहतुक असलेल्या भागाचे दुपदरी / चौपदरीकरण करणे.

५. इतर जिल्हा मार्ग

१००० ते १५०० लोक संख्येची गावे इतर जिल्हामार्गावर असावीत.

६. ग्रामीण मार्ग

मंजूर केलेले तसेच विचाराधीन असलेले योजनाबाहय रस्ते रस्ते विकास योजनेत समाविष्ट करण्यात यावेत.

७. गावे जोडणे

२००० च्या जनगणनेनुसार ५०० पेक्षा जास्त लोकसंख्येची गावे १०० टक्के जोडणे व २०० ते ५०० लोकसंख्येची गावे ५० टक्के जोडणे.

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना २०१० पर्यंत ५०० पेक्षा कमी लोकसंख्येची गावे जोडणे.

५०० लोकसंख्येपर्यंतच्या सर्व गावांना किमान एक रस्ता हा रस्त्याची आखणी त्या गावांना थेट बारमाही रस्ता उपलब्ध होईल.

२.२ **भौमितीक माणके**

अ.क्र	तपशिल	द्रुतमार्ग	रा.म.	रा.मा.	प्रजिमा	इजिमा	ग्रामा
१	**नियंत्रण रेषा** (फॅक्टरी सिनेमा हॉल, व्यापारी गोडाऊन मार्केट इ.) अंतर मिटर मध्ये रस्त्याच्या मध्यापासून अ. अनागरी व कृषी क्षेत्र ब. नागरी व औद्यो.क्षेत्र	रस्त्याच्या मध्यापासून ६० मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासून १५ मीटर यापैकी जास्त असेल ते	७५.०० ३७.००	५०.०० ३७.००	४७.०० ३७.००	३०.०० १८.००	२५.०० १४.००
२	**इमारत रेषा** रस्त्याच्या मध्यापासून मिटर मध्ये अ. अनागरी व कृषी क्षेत्र ब. नागरी व औद्यो.क्षेत्र	रस्त्याच्या मध्यापासून ६० मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासून १५ मीटर यापैकी जास्त असेल ते	४०.०० रस्त्याच्या हद्दीपासून ३ तें ६ मीटर	४०.०० रस्त्याच्या मध्यापासून २० मी. अथवा रस्त्याच्या हद्दीपासून ४.५ मी यापैकी जास्त असेल ते	३०.०० रस्त्याच्या मध्यापासून १५ मी. अथवा रस्त्याच्या हद्दीपासून ४.५ मी यापैकी जास्त असेल ते	१५.०० रस्त्याच्या मध्यापासून १२ मी. अथवा रस्त्याच्या हद्दीपासून ४.५ मी यापैकी जास्त असेल ते	१२.० रस्त्याच्या मध्यापासून १० मी. अथवा रस्त्याच्या हद्दीपासून ३.०० मी यापैकी जास्त असेल ते

अ.क्र	तपशिल	द्रुतमार्ग	रा.म.	रा.मा.	प्रजिमा	इजिमा	ग्रामा
३	**रस्त्याची हद्द** (एकूण मिटर मध्ये) अ. अनागरी व कृषी क्षेत्र रेंज सर्वसाधारण ब. नागरी व औद्यो.क्षेत्र रेंज सर्वसाधारण	रस्त्याच्या मध्यापासून २० मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासून ४.५ मी. यापैकी जास्त असेल ते	३० ते ६० ४५ ३० ते ६० ३०	३० ते ६० ४५ ३० ते ६० ३०	२५ ते ३० २५ १५ ते २५ २०	१५ ते २५ १५ १५ ते २० १५	१२ ते १८ १२ १० ते १५ १०
४	संकल्पित वेग (ताशी कि.मी.) (१) सपाट प्रदेश अ. निर्धाारित वेग ब. किमान संकल्पित वेग (२) चढ उतारी भूप्रदेश अ. निर्धाारित वेग ब. किमान संकल्पित वेग (३) डोंगराळ किंवा पर्वतमय भूप्रदेश अ. निर्धाारित वेग ब. किमान संकल्पित वेग		१००.०० ८०.०० ८०.०० ६५.०० ५०.०० ४०.००	१००.०० ८०.०० ८०.०० ६५.०० ५०.०० ४०.००	८०.०० ६५.०० ६५.०० ५०.०० ४०.०० ३०.००	६५.०० ५०.०० ५०.०० ४०.०० ३०.०० २५.००	५०.०० ४०.०० ४०.०० ३५.०० २५.०० २०.००
५	ढाळ (१) निर्धारित ढाळ अ. सपाट भूप्रदेश ब. डोंगराळ किंवा पर्वतमय भूप्रदेश (२) ढाळ मर्यादा अ. सपाट भूप्रदेश ब. डोंगराळ किंवा पर्वतमय भूप्रदेश (३) अपवादात्मक ढाळ (डोंगराळ		१:३० १:२० १:२० १ : १४.३	१:३० १:२० १:२० १ : १४.३	१:३० १:२० १:२० १ : १४.३	१:३० १:२० १:२० १ : १४.३	१:३० १:२० १:२० १ : १४.३

६	किंवा पर्वतमय भूप्रदेश ३००० मीटर पर्यंत) अ. सपाट भूप्रदेश ब. डोंगराळ किंवा पर्वतमय भूप्रदेश		१:१५ १ : १२.५	१:१५ १ : १२.५	१:१५ १ : १२.५	१:१५ १ : १२.५	१:१५ १ : १२.५
	समस्तर वळण त्रिज्या (मिटर मध्ये) (१) कमी चढउतार भूप्रदेश						
	अ. सर्वात कमी		२३० पेक्षा जास्त	२३० पेक्षा जास्त	१५५ पेक्षा जास्त	९० पेक्षा जास्त	६० पेक्षा जास्त
	ब. किमान निर्धारित		३६० पेक्षा जास्त	३६० पेक्षा जास्त	२३० पेक्षा जास्त	१५५ पेक्षा जास्त	९० पेक्षा जास्त
	क. कमाल		-----------	-------------	मर्यादा नाही	----------------	----------
	(२) डोंगराळ प्रदेशात आणि अडचणींच्या स्थानी.						
	अ. सर्वात कमी		५० पेक्षा जास्त	५० पेक्षा जास्त	३० पेक्षा जास्त	२० पेक्षा जास्त	१४ पेक्षा जास्त
	ब. किमान निर्धारित		८० पेक्षा जास्त	८० पेक्षा जास्त	५० पेक्षा जास्त	३० पेक्षा जास्त	२० पेक्षा जास्त
	क. कमाल		-----------	-----------	मर्यादा नाही	----------	----------

७. वाहन मार्गाची रूंदी (मीटरमध्ये)

अ.क्र.	रस्त्याचा दर्जा	एकेरी मार्ग	दुहेरी मार्ग (उंच कडा नसलेल्या ठिकाणी)	दुहेरी मार्ग (बाजूला उंच कडा असलेल्या ठिकाणी)	बहुमार्ग रस्ता(प्रत्येक मार्गा करिता)
	१	**२**	**३**	**४**	**५**
१	राष्ट्रीय महामार्ग , राज्य मार्ग व प्रमुख राज्य मार्ग	३.७५	७.००	७.००	३.५०
२	प्रमुख जिल्हा मार्ग	३.७५	७	-	-
३	इतर जिल्हा मार्ग	३.७५	-	-	-
३	ग्रामीण मार्ग	३.७५	-	-	-

८.रस्ता मार्गाची रूंदी (मीटर मध्ये)

१	राष्ट्रीय महामार्ग , राज्य मार्ग व प्रमुख राज्य मार्ग	१२.००	१२.००
२	प्रमुख जिल्हा मार्ग	९.००	९.००
३	इतर जिल्हा मार्ग	७.५०	९.००
४	ग्रामीण मार्ग	७.५०	-

टीप - बहुमार्गिय वाहनाकरिता रस्ता रूंदी, मध्य कड,पादचारी मार्ग,सायकल मार्ग इत्यादी धरून प्रत्येक रस्ता रूंदीच्या बाबतीत जरूरी प्रमाणे आखणी करावी.काटकसर आणि वाहतुकीचा आवश्यकतेचा विचार करून प्रमुख जिल्हा मार्गाकरिता ९.०० मीटर , इतर जिल्हा मार्ग आणि ग्रामीण मार्गाकरिता ७.५० मीटर रस्तारूंदी घ्यावी. त्याच प्रमाणे एकेरी मार्गासाठी वाहनमार्ग राज्य मार्ग प्रमुख जिल्हा मार्ग,इतर जिल्हा मार्ग या करिता कमीत कमी ३.७५ मीटर व ग्रामीण मार्गासाठी ३.०० मीटर प्रस्तावित केलेला आहे.

९अ. दर्शक अंतर - महामार्गावरील प्रत्येक ठिकाणी दर्शक अंतर शक्य तितके लांब पल्ल्याचे ठेवावे आणि खाली दर्शविलेल्या अंतरापेक्षा कमी असू नये.

अनु. क्रमांक	प्रत्येक ताशी वाहन वेग		दर्शक अंतर हे कमी थांबा दर्शक अंतरा बरोबर असावे(मीटरमध्ये)	
			सपाट व चढउताराचा भूप्रदेश	डोंगराळ भूप्रदेश
१	**२**		**३**	**४**
१	२५		-	२७.००
२	३५		-	३७.००
३	४०		३७.००	५०.००
४	५०		६०.००	६०.००
५	६५		९०.००	-
६	८०		१२०.००	-

(वरील मर्यादा कमीत कमी आहे. ज्या ठिकाणी मोठ्या त्रिज्या देणे शक्य होईल त्या ठिकाणी शक्यतो मोठ्या त्रिज्या वापराव्यात)

९.ब **ओलांडण्यासाठी दर्शक अंतर - दुपदरी वाहन मार्गावर वाहन ओलांडण्यरिता कमीत कमी दर्शक अंतर खालील प्रमाणे असावे -**

अनुक्रमांक	संकल्पित वेग कि.मी. /तास	दुपदरी अविभाजीत वाहनमार्ग (मीटरमध्ये)	विभाजीत वाहनमार्ग (प्रत्येक दिशांतील वाहनमार्ग कमीतकमी दुपदरी) (मीटरमध्ये)
१	२	३	४
१	४०	१३७.००	७६
२	५०	१८०.००	११०
३	५५	२४५.००	१३७
४	६५	३०५.००	१६८
५	८०	४७१.००	२६०

टीप

(१) चालकांची दृष्टी रस्त्याच्या पृष्ठभागापासून १.२० मीटर उंचीवर (४ फूट) असेल असे गृहीत धरले तर,तो रस्त्यावरील १० सें.मी.(४ इंच) उंचीची वस्तू पाहू शकतो. ते कमीत कमी दर्शक अंतर गृहीत धरले आहे.

(२) टायर आणि रस्त्याच्या पृष्ठभागातील घर्षण गुणांक ०.४० गृहीत धरला आहे.

(२) बोघ आणि रोधक - प्रतिक्रिया काळ ५०,६५ आणि ८० कि.मी. ताशी वेगासाठी अनुक्रमे २.५,२.७५ आणि ३.० सेकंद गृहीत धरला आहे.

(३) ओलांडणा-या, ओलांडलेल्या वाहनांच्या वेगातील फरक १६ कि.मी.प्रती तास गृहीत धरला आहे.

१०. सर्व प्रकारच्या वेगासाठी वळणावरील वाहनमार्गाचे रुंदीकरण

वळणाची त्रिज्या मीटरमध्ये	६० पर्यंत	६१ ते १००	१०१ ते ३००	३०० पेक्षा जास्त
रस्त्याच्या बाहेरील बाजूस अतिरिक्त रूंदी मीटरमध्ये	१.२०	०.९०	०.६०	आवश्यक नाही

११. पूल

जलनि:सारण बांधकामावरील मानक रस्ता रूंदी

(१) सपाट भूप्रदेशातील रस्त्यावरील मो-यांची एकूण रूंदी, त्यावरील कठड्याच्या बाहेरील बाजूंमधील अंतर,हे परिच्छेद ८ मध्ये विहीत रस्त्याच्या सर्वसाधारण रूंदी इतके असावे.

(२) डोंगराळ तथा पर्वतमय प्रदेशात रस्त्यावरील मो-यांच्या कठड्याच्या आतील अंतर परिच्छेद ८ मध्ये येथे विहीत रस्त्याच्या सर्वसाधारण रूंदी इतके असावे.

(३) पूलावरील रस्त्यातील कर्बस्टोन मधील अंतरे खालील प्रमाणे असावीत.

वेगवेगळया वर्गीकरणाच्या रस्त्यातील अनुज्ञेय व्यत्यय व जलनिःसारण बांधकामावरील रस्त्याची निव्वळ रूंदी

अ.क्र.	तपशिल	राष्ट्रीय महामार्ग	राज्य महामार्ग	प्रमुख जिल्हा मार्ग	इतर जिल्हा मार्ग	ग्राम मार्ग	शेरा
१	२	३	४	५	६	७	८
१	अनुज्ञेय व्यत्यय	एका वर्षात ६ वेळा पर्यंत व एका वेळेस १२ तासा पेक्षा जास्त होणारा वाहतूक अटकाव				एका वेळेस ३ दिवसां पर्यंत आणि एका वर्षात ६ वेळा	महाराष्ट्र शासनाच्या सा.बा.विभागातील आदेश क्रमांक आर.एस.१०७४-२६४३१पी.आय. , दि. १९जुलै १९७४ नुसार

१	२	३				४	५
२	चाक रक्षकामधील कमीतकमी निव्वळ रूंदी (मीटरमध्ये)						
	(अ) कलव्हर्टस						
	१) जलपथ लांबी # १.५२४ मी. पर्यंत	१२.००	१०*	७.५	७.५	४.२५	
	२) १.५२४ मी. पेक्षा जास्त आणि ३.०४८ मी.पर्यंत	१२.००	१०**	७.५०	७.५०	४.२५	
	३) ३.०४८ मी.पेक्षा जास्त आणि ६.०९६ मी. पर्यंत	१२.००	१०**	७.५०	४.२५	४.२५	
	(ब) सेतू मार्ग आणि निमज्जल पूल	७.५०	७.५०	७.५०	७.५०	७.५०	
	(क) छोटे पूल म्हणजे जलपथ लांबी ६ मीटर पेक्षा जास्त व ३० मी.पर्यंत	१२.००	७.५००	७.५०	४.२५	४.२५	
	(ड) मोठे पूल म्हणजे जलपथ लांबी ३० मी.पेक्षा जास्त	१२.००	७.५०	७.५०	-	-	

जलपथ लांबी म्हणजे दोन्ही अंत्य पादांच्या दर्शनी बाजू मधील किंवा अंतिम स्तंभामधील स्थूल किंवा एकंदरजलपथ लांबी उदा. प्रत्येकी ३.०४८ मी.

२ गाळ्यांच्या निःसारण बांधकामास छोटापूल संबोधण्यात येतो. कारण स्तभच्या रूंदीसहीत एकंदर जलपथ लांबी ६.०० मी. पेक्षा जास्त आहे.

* दोन्ही पॅरेपेटच्या बाहेरील अंतर पहा. शासन पत्र क्रमांक एसएसआर. ७५१ सी , दिनांक १२ जून, १९५२.

** आतील ९.१४४ मी. निव्वळ रूंदीस अधीन राहून पॅरेपेटच्या बाहेर - ेबाहेरील १० मीटरची रूंदी ठेवण्यात यावी.

पुलावरील वाहनमार्गाची रूंदी भारतीय रस्ते महासभेने खुलासा केल्यानंतर खालील प्रमाणे आहे.

एकेरी पदरी	४.२५ मीटर
दोन पदरी	७.५० मीटर
तीन पदरी	१४.५० मीटर
चार पदरी	२१.५० मीटर

इतर जिल्हा मार्ग आणि ग्रमीण मार्गाच्या बाबतीत प्रत्येक प्रकरणी तिच्या गुणवत्तेनुसार पुलावरील रस्त्याची निव्वळ रूंदी ठरवावी . सर्व साधारणपणे १.३७ मीटर जलपथ लांबी करिता रस्ता निव्वळ रूंदी ३.७० मीटर ठेवावी.

सन २००१ मध्ये रस्त्यांची प्रस्ताविक मानके

राष्ट्रीय महामार्ग	राज्य मार्ग	प्रमुख जिल्हा मार्ग	इतर जिल्हा मार्ग	ग्रामीण मार्ग
१	२	३	४	५
दोन पदरी वाहन मार्ग आधुनिक दर्जाचा पृष्ठभाग व सर्व पूल असलेला (१०,००० प्रवासी गाडी एकेकपेक्षा जास्त असणा-या रस्त्यांसाठी चौपदरी मार्ग)	(१) सर्व पूल असलेला आधुनिक पृष्ठभागासहीत एकेरी पदरीचा वाहन मार्ग (२) २५ टक्के अस्तित्वातील लांबी दोन पदरी (३) ५० टक्के अस्तित्वातील लांबी, ५.५ मी. रूंदी मार्गाची. (४) २५ टक्के एकेरी पदरी (५) २५ टक्के राज्य मार्ग ५.५ मी. रूंदीचा पाहिजेत. (६) ७५ टक्के नवीन राज्य मार्गाना एकेरी मार्ग पाहिजेत. (७) १०,००० प्रवासी गाडी एकेक पेक्षा जास्त वर्दळ असणा-या रस्त्या साठी चौपदी मार्ग	उच्च पातळीच्या निम्नलपुलासहित एकेरी पदरीचा डांबरी पृष्ठभाग (२५ टक्के साठी ५.५ मीटर रूंदीचा वाहन मार्ग)	सेतू मार्गासहीत एका पदरी खडीचे पृष्ठभाग प्रतिदिनी १,००० टनापेक्षा जास्त वाहतुक वर्दळअसलेल्या रस्त्यावर डांबरी पृष्ठभाग. ५,००० पेक्षा जास्त लोकसंख्याअसलेली गांवे जोडणारे रस्ते डांबरी पृष्ठभागाचे	मो-या व सेतू मार्गासहीत एकपदरी पृष्ठभाग प्रतिदिनी १,००० टनापेक्षा जास्त वर्दळ असलेले किंवा ५,००० पेक्षा जास्त लोकवस्ती असलेली गावे जोडणारे डांबरी पृष्ठभागाचे आणि १,००० व त्याहीपेक्षा जास्त लोकवस्ती असणा-या खेडेगावातून जाणारा रस्ता डांबरी पृष्ठभागाचा.

टीप - आदिवासी भागात ५०० टन प्रति दिवस वाहतूक वर्दळसाठी किंवा एकंदर लोकसंख्या २,००० असेल तर इतर जिल्हा मार्ग आणि ग्रामीण मार्ग डांबरी पृष्ठभागाचे असायला पाहिजेत.

२.३ खाजगीकरणांतर्गत करावयाची रस्ते व पुलांची कामे.

महाराष्ट्र शासन दर २० वर्षांनी २० वर्षासाठीचा रस्ते विकास आराखडा तयार करुन त्यानुसार रस्ते बांधणी व सुधारणेचा प्रकल्प राबविते. परंतु दरवर्षी शासनास उपलब्ध होणारा अपुरा निधी लक्षात घेता रस्ते विकास आराखडयानुसार ठेवण्यांत आलेले उद्दिष्टे साध्य करणे अवघड जाते. महाराष्ट्रातील औद्योगिक वसाहती व व्यापारी बाजारपेठा यांना चांगल्या व पुरेशा वाहतूक क्षमतेच्या रस्त्याने तसेच जिल्हा मुख्यालय ते राजधानी व जिल्हा मुख्यालय ते जिल्हा मुख्यालय चांगल्या रस्त्यांनी जोडले जात नाही तोपर्यन्त विकासाच्या वाटचालीस गती येत नाही. याचा विचार करुन महाराष्ट्र शासनाने १९९७ साली "महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ" स्थापन करुन राज्य रस्ते सुधारणा प्रकल्प या महामंडळामार्फत राबविण्यास सुरुवात केली.

२.३.१ खाजगीकरणा अंतर्गत करण्यांत येणारी कामे "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर करण्यांत येतात. या कामांसाठीचा निधी प्रथम उद्योजकांकडून खर्च करण्यांत येतो. काम पूर्ण होऊन जनतेस लाभ मिळण्यास सुरु होताच या कामांसाठी झालेला खर्च पथकरामार्फत वसूल करण्याची परवानगी शासनाव्दारे उद्योजकास देण्यांत येते.

२.३.२ खाजगीकरणांतर्गत प्रकल्प प्रस्तावित करतांना खालीलप्रमाणे बाबींची पडताळणी करण्यांत येते.

१. अर्थसंकल्पातून पूर्ण करण्यात आलेल्या रु.१ कोटी पेक्षा अधिक किमतीच्या प्रकल्पावर पथकर लावण्यात येतो.

२. खाजगीकरणांतर्गत जे प्रकल्प राबावयाचे आहेत त्या प्रकल्पाची साधारण रुपरेषा शासन निर्णय क्र.खाक्षेस-२००२/प्र.क्र.२७९()/रस्ते-९, दि.९ जानेवारी २००३ अन्वये निर्गमित केली आहे. यामध्ये प्रमुखतः नव्याने बांधावयाचे रस्ते व पूल, चार पदरी वाहन मार्गाच्या रुंदीसाठी रस्त्याची सुधारणा, दुपदरी डांबरी पृष्ठभागाची कमीत कमी २५ किमी.लांबीच्या रस्त्याची सुधारणा, वळणरस्ते, उड्डाण पूल इ.कामांचा समावेश आहे.

३. पथकरात द्यावयाची सवलत व सूट याबाबतची मानके शासन निर्णयाच्या परिशिष्ट 'अ'मध्ये दिलेली आहेत.

३. पथकरासाठीचे दर हे रु.२० कोटीपर्यन्तचा प्रकल्प व २० ते ७५ कोटी पर्यन्तचा प्रकल्प यासाठी वेगवेगळे नमूद केले असून ३१ मार्च २०५२ पर्यन्तचे दर परिपत्रकात देण्यांत आले आहेत. यासंबधीचे 'परिशिष्ट ब' सोबत जोडले आहे.रु.७५ कोटीपेक्षा जास्त किंमतीच्या प्रकल्पासाठी पथकर धोरण स्वतंत्ररित्या ठरविले जाते.

४.खाजगीकरणा अंतर्गत सुसाध्यता अहवाल तयार करतांना काही मार्गदर्शक तत्वे शासन

परिपत्रक जा.क्र.खाक्षेस-२००२/प्र.क्र.२७९(III) /रस्ते-९ दि.९ जानेवारी २००३ अन्वये देण्यात आलेली आहेत.

वाहतुक वर्दळीत दरवर्षी धरावयाची वाढ.

- पहिली ५ वर्षे :- ५ %
- ६-१० वर्षे :- ४ %
- १० वर्षानंतर शेवटपर्यन्त :- ३ %

देखभाल व दुरुस्तीसाठी विचारात घ्यावयाचा खर्च.

- पुलांचे कामासाठी :- ०.५ %
- रस्ते :- १.० %

दर ७ वर्षानी करावयाची विशेष दुरूस्ती .

- पुलांचे कामासाठी :- ३.० %
- रस्ते नुतनीकरण :- ६.० % अथवा प्रत्यक्ष अंदाजपत्रकानुसार.

नुतनीकरणासाठी डांबरी पृष्ठभागाचा खडबडीतपणा (Roughness Index) मुख्य अभियंता यांनी निश्चित केलेल्या विहीत खडखडीतपणाच्या निर्देशांकापेक्षा जास्त होण्यापूर्वी किंवा ७ वर्षे यापैकी जो कालावधी आधी येईल तेव्हा नुतनीकरण करणे उद्योजकास बंधनकारक राहील.

पथकर वसूली व आस्थापना खर्च खालील प्रमाणे गृहीत धरण्यात येतो.

१) पथकर उत्पन्न प्रतिमाह रू.१० लक्ष पर्यंत	:-	मासीक उत्पन्नाच्या १० % किंवा किमान रु.०.७० लक्ष.
२) पथकर उत्पन्न प्रतिमाह रु. १० लक्ष ते रु.२५ लक्ष पर्यंत	:-	मासीक उत्पन्नाच्या ७.५० % किंवा किमान रू.१ लक्ष.
३) पथकर उत्पन्न प्रतिमाह रू.२५ लक्ष पेक्षा जास्त	:-	मासीक उत्पन्नाच्या ५ % किंवा किमान रू.१.९० लक्ष.

पथकरातील सुट विचारात घेता खालीलप्रमाणे घट गृहीत धरण्यात येतेः

अ) महानगरपालिका/नगरपालिका हद्दीपासुन ५ किमी अंतरापर्यंत स्थित पथकर स्थानकासाठी २५ %.

ब) महानगरपालीका/नगरपालीका हद्दीपासुन ५ किमी पेक्षा जास्त अंतरात असलेल्या पथकर स्थानकासाठी - १६ % .

हातची किंमत काढणे:

पथकर प्रस्ताव तयार करतांना हातची किंमत (Upset Value) काढण्यासाठी अपेक्षित पथकराच्या रक्कमेतुन वरीलप्रमाणे पथकराच्या उत्पन्नातील घट विचारात घेऊन हातची किंमत काढण्यात येते.

बांधकामाचा कालावधी :

खाजगीकरणा अंतर्गत प्रकल्पाच्या बांधकाम कालावधीसाठी शासन परिपत्रक खाक्षेस-१०८९/प्र.क्र.१७४/रस्ते-९ दि.१९ सप्टेंबर २००० नुसार मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत.

अ.क्र.	**बांधकामाची किमंत**	**बांधकाम कालावधी**
१.	१ कोटी पर्यंत ६ महीने	६ महीने
२.	१ ते ५ कोटी पर्यंत १ वर्षे	१ वर्षे
३.	५ ते २५ कोटी पर्यंत १/२ वर्षे	१ १/२ वर्षे
४.	२५ ते ५० कोटी पर्यंत २ वर्षे	२ वर्षे
५.	५० ते ७५ कोटी पर्यंत २ १/२ वर्षे	२ १/२ वर्षे
६.	७५ कोटीपेक्षा जास्त-	स्वतंत्रपणे निश्चित करावा.

परिशिष्ट - अ

शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.खाक्षेस-२००२/प्र.क्र.२७९(II) / रस्ते-९ चे सहपत्र

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>वाहन प्रकार</th><th>प्रकल्प किंमत रु.२० कोटी पर्यंत</th><th>प्रकल्प किमंत रु.२० कोटी ते रु.७५ कोटी पर्यंत</th></tr>
<tr><td>१.</td><td>स्कूटर, मोटार सायकल, वाहन वगळून ३ आसनी प्रवासी रिक्षा, रिकाम्या ट्रॉलीसह ट्रॅक्टर</td><td>पथकर नाही</td><td>पथकर नाही</td></tr>
<tr><td>२.</td><td>मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९) मध्ये नमुद केल्याप्रमाणे हलकी मोटार वाहने
अ) कार, जीप, टाटा सुमो, ट्रॅक्स, वाहन चालक वगळून सहा आसनी प्रवासी रिक्षा, कमांडर व इतर तत्सम (चालक वगळुन १२ पर्यंत प्रवासी क्षमता असलेली) वाहने</td><td rowspan="3">पथकराचे दर परिशिष्ट-ब मधील प्रवर्ग-१ प्रमाणे</td><td rowspan="3">पथकराचे दर परिशिष्ट ब मधील प्रवर्ग-२ प्रमाणे</td></tr>
<tr><td>३.</td><td>ट्रक, बस</td></tr>
<tr><td>४.</td><td>मोटार वाहन अधिनियम १९८८ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे व अ.क्र.३ मध्ये नमूद केलेले ट्रक वगळून अवजड वाहने उदा.ट्रक-ट्रेलर, दोन पेक्षा अधिक असांची वाहने इत्यादी</td></tr>
</table>

रु.७५ कोटी पेक्षा जास्त किमतीच्या प्रकल्पाचे आणि एकात्मिक शहर रस्ते विकास योजनेसाठीचे पथकराचे धोरण व दर स्वतंत्ररित्या ठरविण्यात येतील.

२. उपरोक्त पथकराचे दर हे १ जुलै १९९८ हे आधारभूत वर्ष धरुन निश्चित करण्यात यावेत. पथकराच्या दरामध्ये प्रत्येक वर्षी ६ टक्के याप्रमाणे ३ वर्षातून एकदा १ एप्रिल रोजी वाढ करण्यात यावी. अपूर्णांकातील पथकराचे दर सन २०२५ पर्यंत नजिकच्या ५ रुपयामध्ये आणि सन २०२५ नंतर नजिच्या १० रु. मध्ये परिवर्तीत करण्यात यावेत. तथापी प्रतिवर्षी वाढ परिगणित करण्यासाठी मूळ अपूर्ण रुपयातील दर विचारात घेण्यात यावा. (परिशिष्ट-ब)

३. पथकराच्या दरामध्ये खालीलप्रमाणे सूट देण्यात यावी.

अ) पथकराच्या ५० कुपन्सची पुस्तिका आगाऊ खरेदी करणा-यास पुस्तिकेच्या किंमतीमध्ये १० टक्के सवलत देण्यात येईल.

ब) पथकराच्या १०० कुपन्सची पुस्तिका आगाऊ खरेदी करणा-यास पुस्तिकेच्या किमतीमध्ये २० टक्के सवलत देण्यात येईल.

क) वारंवार प्रवास करणा-या वाहनांसाठी परतीच्या प्रवासाचे व दैनिक पासाचे दर हे त्या त्या वाहनांच्या एकेरी प्रवास दराच्या अनुक्रमे दीड पट व अडीचपट ठेवावेत. परतीच्या प्रवासाचा पास व दैनिक पास हा ज्या दिवशी पास काढला जाईल त्या दिवशीच्या रात्री १२.०० वाजेपर्यंत ग्राहय राहील.

ड) मासिक पासाचे दर एकेरी प्रवास दराच्ग्रा पन्नास पट राहतील.

४. खालील वाहनांना पथकरातून सुट देण्यात यावी.

१) महाराष्ट्र राज्यातील विद्यमान मा.आमदार / खासदार प्रवास करीत असलेली वाहने

२) केंद्र व राज्य शासनाची वाहने,

३) पोलीस वाहने,

४) लष्कराच्या मालकीची वाहने,

५) टपाल व तार खात्याची वाहने,

६) रुग्णवाहिका,

७) शववाहिका,

८) अग्निशमन दलाची वाहने.

VIII) भुयारी मार्गाची कामे.

IX) पादचारी पुलांची कामे.

X) एकात्मिक शहर रस्ते विकास प्रकल्प.

XI) रस्ते विकास प्रकल्पात जर निरनिराळया दर्जाचे रस्ते सलग असतील व वरिल निकषांमध्ये बसत असतील तर तसाही प्रकल्प एकत्रित रित्या घेता येईल.

XII) खाजगीकरणांतर्गत कामाची निवड करतांना, शक्यतो१९८१-२००१ रस्ते विकास योजनेत समाविष्ट असलेल्या रस्त्याची कामे घेतली जावीत, वाहतूक वर्दळ व विकासाची निकड तसेच आर्थिकदृष्टया जास्त किफायतशीरपणा इत्यादी तत्वावर सर्वसाधारणतः कामाचे प्राधान्य ठरविण्यात यावे.

XIII) खाजगीकरणातून शासकीय भूखंडाचा विकास करणे.

XIV) उद्योजकाने सुचविलेला एखादा प्रस्ताव.

३) पथकराचे दर हे प्रकल्पाच्या किंमतीवर आधारित असावेत, त्यानुसार अर्थसंकल्पातून व खाजगीकरणाच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आलेल्या प्रकल्पांवर सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या वाहन प्रकार निहाय पथकराचे दर निश्चित करण्यात यावेत.

४) पथकर वसूली नाक्याचे ठिकाण निश्चित करण्याचे अधिकार संबधीत मुख्य अभियंता यांना राहतील. पथकर वसूली नाका सर्वसाधारणपणे एखाद्या पुलाजवळ उभारण्यात यावा.

तसेच एकाच रस्त्यावरील दोन पथकर नाक्यांमधील अंतर सर्वसाधारणपणे ३५-४० कि.मी. पेक्षा कमी नसावे.

५) सदरच्या शासन निर्णयातील तरतुदी या निर्णयाच्या दिनांकापर्यंत हाती घेण्यांत येणा-या कामासाठी लागु राहतील.

सदर शासन निर्णय हा नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३६०/१४७४, दिनांक २०.१२.२००२ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.८२८/व्यय-११, दिनांक ०१.०१.२००३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

परिशिष्ट ब
शासन सार्वजनिक बांधकाम विभागाचे निर्णय क्र. खाक्षेस-२००२/प्र.क्र.२७९ (II)/रस्ते-९ दि.९ जानेवारी २००३ चे सहपत्र
पथकराचे दर - प्रवर्ग - १ (प्रकल्प किमंत रु.२० कोटी पर्यंत)

वर्ष	वाहन प्रकार- २ अ पथकराचे दर		वाहन प्रकार- २ ब पथकराचे दर		वाहन प्रकार- ३ पथकराचे दर		वाहन प्रकार- ४ पथकराचे दर	
	मुळ दर	पुर्ण रु.तील दर	मुळ दर	पुर्ण रु.तील दर	मुळ दर	पुर्ण रु.तील दर	मुळ दर	पुर्ण रु.तील दर
१ जुलै १९९८ ते ३० जुन २००१	८.०० ८.४८ ८.९९	८.००	१२.०० १२.७२ १३.४८	१२.००	२५.०० २६.५० २८.०९	२५.००	४०.०० ४२.४० ४४.९४	४०.००
१ जुलै २००१ ते ३१ मार्च २००४	९.५३ १०.१० १०.७१	१०.००	१४.२९ १५.१५ १६.०६	१५.००	२९.७८ ३१.५६ ३३.४६	३०.००	४७.६४ ५०.५० ५३.५३	५०.००
१ एप्रील २००४ ते ३१ मार्च २००७	११.३५ १२.०३ १२.७५	१०.००	१७.०२ १८.०४ १९.१३	२०.००	३५.४६ ३७.५९ ३९.८५	४०.००	५६.७४ ६०.१५ ६३.७५	६०.००
१ एप्रील २००७ ते ३१ मार्च २०१०	१३.५२ १४.३३ १५.१९	१५.००	२०.२७ २१.४९ २२.७८	२०.००	४२.२४ ४४.७७ ४७.४६	४५.००	६७.५८ ७१.६३ ७५.१३	७०.००
१ एप्रील २०१० ते ३१ मार्च २०१३	१६.१० १७.०६ १८.०९	१५.००	२४.१५ २५.६० २७.१३	२५.००	५०.३० ५३.३२ ५६.५२	५५.००	८०.४९ ८५.३२ ९०.४४	८५.००
१ एप्रील २०१३ ते ३१ मार्च २०१६	१९.१७ २०.३२ २१.५४	२०.००	२८.७६ ३०.४८ ३२.३१	३०.००	५९.९१ ६३.५१ ६७.३२	६५.००	९५.८६ १०१.६१ १०७.७१	१००.००
१ एप्रील २०१६ ते ३१ मार्च २०१९	२२.८३ २४.२० २५.६६	२५.००	३४.१५ ३६.३१ ३८.४९	३५.००	७१.३६ ७५.६४ ८०.१८	७५.००	११४.१७ १२१.०२ १२८.२९	१२०.००
१ एप्रील २०१९ ते ३१ मार्च २०२२	२७.२० २८.८३ ३०.५६	३०.००	४०.७९ ४३.२४ ४५.८४	४५.००	८४.९९ ९०.०९ ९५.४९	९०.००	१३५.९८ १४४.१४ १५२.७९	१४५.००
१ एप्रील२०२२ ते ३१ मार्च २०२५	३२.३९ ३४.३३ ३६.४०	३५.००	४८.५९ ५१.५० ५४.५९	५०.००	१०१.२२ १०७.३० ११३.७३	१०५.००	१६१.९६ १७१.६७ १८१.९८	१७०.००
१ एप्रील २०२५ ते ३१ मार्च२०२८	३८.५८ ४०.८१ ४३.३५	४०.००	५७.८७ ६१.३४ ६५.०२	६०.००	१२०.५६ १२७.७९ १३५.४६	१३०.००	१९२.८९ २०४.४७ २१६.७४	२००.००
१ एप्रील२०२८ ते ३१ मार्च२०३१	४५.१५ ४८.७० ५१.६३	५०.००	६८.९२ ७३.०६ ७७.४४	७०.००	१४३.५९ १५२.२० १६१.३३	१५०.००	२२९.७४ २४३.५२ २५८.१४	२४०.००

वर्ष	वाहन प्रकार- २ अ पथकराचे दर		वाहन प्रकार- २ ब पथकराचे दर		वाहन प्रकार- ३ पथकराचे दर		वाहन प्रकार- ४ पथकराचे दर	
	मुळ दर	पुर्ण रु.तील दर	मुळ दर	पुर्ण रु.तील दर	मुळ दर	पुर्ण रु.तील दर	मुळ दर	पुर्ण रु.तील दर
१ एप्रील२०३१ ते ३१ मार्च२०३४	५४.७२ ५८.०१ ६१.४९	६०.००	८२.०९ ८७.०१ ९२.२३	९०.००	१७१.०१ १८१.२८ १९२.१५	१८०.००	२७३.६२ २९०.०४ ३०७.४४	२९०.००
१ एप्रील२०३४ ते ३१ मार्च २०३७	६५.१८ ६९.०९ ७३.२३	७०.००	९७.७७ १०३.६३ १०९.८५	१००.००	२०३.६८ २१५.९० २२८.८६	२२०.००	३२५.८९ ३४५.४४ ३६६.१७	३५०.००
१ एप्रील२०३७ ते ३१ मार्च २०४०	७७.६३ ८२.२९ ८७.२२	८०.००	११६.४४ १२३.४३ १३०.८३	१२०.०	२४२.५९ २५७.१४ २७२.५७	२६०.००	३८८.१४ ४११.४३ ४३६.११	४१०.००
१ एप्रील२०४० ते ३१ मार्च २०४३	९२.४६ ९८.०० १०३.८८	१००.००	१३८.६८ १४७.०१ १५५.८३	१५०.००	२८८.९३ ३०६.२६ ३२४.६४	३१०.००	४६२.२८ ४९०.०२ ५१९.४२	४९०.००
१ एप्रील२०४३ ते ३१ मार्च २०४६	११०.१२ ११६.७२ १२३.७३	१२०.००	१६५.१८ १७५.०९ १८५.५१	१८०.००	३४४.१२ २६४.७६ ३८६.६५	३७०.००	५५०.५८ ५८३.६२ ६१८.४२	५८०.००
१ एप्रील २०४६ ते ३१ मार्च २०४९	१३१.१५ १३९.०२ १४७.३६	१४०.००	१९६.७३ २०८.५३ २२१.०४	२१०.००	४०९.८५ ४३४.४४ ४६०.५०	४३०.००	६५५.७५ ६९५.१० ७३६.८१	७००.००
१ एप्रील २०४९ ते ३१ मार्च २०५२	१५६.२० १६५.५८ १७५.५१	१७०.००	२३४.३० २४८.३६ २६३.२६	२०५.००	४८८.१३ ५१७.४२ ५४८.४७	५२०.००	८७१.०१ ८२७.८८ ८७७.५५	८३०.००

पथकराचे दर-प्रवर्ग-२ (प्रकल्प किमंत रु.२० कोटी ते रु.७५ कोटी पर्यंत)

वर्ष	वाहन प्रकार- २ अ पथकराचे दर		वाहन प्रकार- २ ब पथकराचे दर		वाहन प्रकार- ३ पथकराचे दर		वाहन प्रकार- ४ पथकराचे दर	
	मुळ दर	पुर्ण रु.तील दर	मुळ दर	पुर्ण रु.तील दर	मुळ दर	पुर्ण रु.तील दर	मुळ दर	पुर्ण रु.तील दर
१ जुलै १९९८ ते ३० जुन २००१	१२.०० १२.७२ १३.४८	१२.००	१८.०० १९.०८ २०.२२	१८.००	३५.०० ३७.१० ३९.३३	३५.००	६०.०० ६३.६० ६७.४३	६०.००
१ जुलै २००१ ते ३१ मार्च २००४	१४.२९ १५.१५ १६.०६	१५.००	२१.४४ २२.७२ २४.०९	२५.००	४१.६९ ४४.१९ ४६.८४	४५.००	७१.४६ ७५.७५ ८०.२९	७५.०१०
१ एप्रील २००४ ते ३१ मार्च २००७	१७.०२ १८.०४ १९.१३	२०.००	२५.५३ २७.०७ २८.६९	२५.००	४९.६५ ५२.६३ ५५.७८	५५.००	८५.११ ९०.२२ ९५.६३	९०.००
१ एप्रील २००७ ते ३१ मार्च २०१०	२०.२७ २१.४९ २२.७८	२०.००	३०.४१ ३२.२४ ३४.१७	३०.००	५९.१३ ६२.६८ ६६.४४	६५.००	१०१.३७ १०७.४५ ११३.९०	११०.००
१ एप्रील २०१० ते ३१ मार्च २०१३	२४.१५ २५.६० २७.१३	२५.००	३६.२२ ३८.३९ ७०.७०	४०.००	७०.४३ ७४.६५ ७६.१३	७५.००	१२०.७३ १२७.९८ १३५.६५	१३०.००
१ एप्रील २०१३ ते ३१ मार्च २०१६	२८.७६ ३०.४८ ३२.३१	३०.००	४३.१४ ४५.७३ ४८.४७	४५.००	८३.३८ ८८.९१ ९४.२५	९०.००	१४३.७९ १५२.४२ १६१.५७	१५५.००
१ एप्रील २०१६ ते ३१ मार्च २०१९	३४.१५ ३६.३१ ३८.४९	३५.००	५१.३८ ५४.४६ ५७.७३	५५.००	९९.९० १०५.९० ११२.२५	१०५.००	१७१.२६ १८१.५४ १९२.४३	१८०.००
१ एप्रील २०१९ ते ३१ मार्च २०२२	४०.७९ ४३.२४ ४५.८४	४५.००	६१.१९ ६४.८६ ६८.७६	६५.००	११८.२५ १२६.१२ १३३.६१	१२५.००	२०३.९७ २१६.२१ २२९.१८	२१५.००
१ एप्रील२०२२ ते ३१ मार्च २०२५	४८.५१ ५१.५० ५४.५९	५०.००	७२.८८ ७७.२५ ८१.८९	७५.००	१४१.७१ १५०.२२ १५२.२३	१५०.००	२४२.९४ २५७.५१ २७२.९६	२६०.००
१ एप्रील २०२५ ते ३१ मार्च२०२८	५७.८७ ६१.३४ ६५.०२	६०.००	८६.८० ९२.०१ ९७.५३	९०.००	१६८.७८ १७८.९१ १८९.६४	१८०.००	२८९.३४ ३०६.७० ३२५.१०	३१०.००
१ एप्रील२०२८ ते ३१ मार्च२०३१	६८.९२ ७३.०६ ७७.४४	७०.००	१०३.३८ १०९.५१ ११६.१६	११०.००	२०१.०२ २१३.०८ २२५.८७	२१०.००	३४४.६१ ३६५.२१ ३८७.२०	३७०.००
१ एप्रील२०३१ ते ३१ मार्च२०३४	८२.०९ ८७.०१ ९२.२३	९०.००	१२३.१३ १३०.५२ १३८.३५	१३०.००	२३९.४२ २५३.७९ २६९.०१	२५०.००	४१०.४४ ४३५.०६ ४६१.१७	४४०.००

वर्ष	वाहन प्रकार- २ अ पथकराचे दर		वाहन प्रकार- २ ब पथकराचे दर		वाहन प्रकार- ३ पथकराचे दर		वाहन प्रकार- ४ पथकराचे दर	
	मुळ दर	पुर्ण रु.तील दर	मुळ दर	पुर्ण रु.तील दर	मुळ दर	पुर्ण रु.तील दर	मुळ दर	पुर्ण रु.तील दर
१ एप्रील२०३४ ते ३१ मार्च २०३७	९७.७७ १०३.६३ १०९.८५	१००.००	१४६.६५ १५५.४५ १६४.७८	१६०.००	२८५.१५ ३०२.२६ ३२०.४०	३००.००	४८८.८४ ५१८.१७ ५४९.२६	५२०.००
१ एप्रील२०३७ ते ३१ मार्च २०४०	११६.४४ १२३.४३ १३०.८३	१२०.०	१७४.६६ १८५.१४ १९६.२५	१९०.००	३३९.६२ ३६०.०० ३८१.६०	३६०.००	५८२.२१ ६१७.१४ ६५४.१७	६२०.००
१ एप्रील२०४० ते ३१ मार्च २०४३	१३८.६८ १४७.०१ १५५.८३	१५०.००	२०८.०३ २२०.५१ २३३.७४	२२०.००	४०४.५० ४२८.७७ ४५४.४९	४३०.००	६९३.४२ ७३५.०३ ७७९.१३	७४०.००
१ एप्रील२०४३ ते ३१ मार्च २०४६	१६५.१८ १७५.०९ १८५.५१	१८०.००	२४७.७६ २६२.६३ २७८.३९	२६०.००	४८४.७६ ५१०.६७ ५४१.३१	५१०.००	८२५.८८ ८७५.४३ ९२७.९६	८८०.००
१ एप्रील २०४६ ते ३१ मार्च २०४९	१९६.७३ २०८.५३ २२१.०४	२१०.००	२९५.१९ ३१२.८० ३३१.५६	३१०.००	५७३.७९ ६०८.२१ ६४४.७१	६१०.००	९८३.६३ १०४२.६५ ११०५.२१	१०४०.००
१ एप्रील २०४९ ते ३१ मार्च २०५२	२३४.३० २४८.३६ २६३.२६	२०५.००	२५१.४६ ३७२.५४ ३९४.९०	३७०.००	६८३.३९ ७२४.३९ ७६७.८५	७२०.००	११७१.५२ १२४१.८१ १३१६.३२	१२४०.००

२.३.३ इतर मानके

- प्रकल्पाचा शक्याशक्यता अहवाल तयार करतांना स्टेट बँक ऑफ इंडियाच्या पीएलआर दरानुसार व्याजदर गृहीत धरावा.
- डेब्ट इक्वीटी गुणोत्तर साठी किमान २५% इक्विटी गृहीत धरण्यांत येते.
- शक्याशक्यता अहवालात १६% आय आर आर साठी शक्यतो सवलतीचा कालावधी काढण्यांत येतो.

२.३.४ खाजगी करणांतर्गत करावयाच्या कामांसाठीची विहित कार्यपध्दती

१) प्रलंबित प्रकल्पातील कामाचा वाव निश्चित करणे व शासनाकडून सर्वसाधारण मान्यता घेणे.

२) कामाचा वाव मंजुरीनंतर समाधानकारक अहवाल तयार करणे व कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन सक्षम स्तरावर मंजुरी घेणे.

३) कंत्राटदाराची पूर्वअर्हता व निविदा कार्यवाही करणे व प्राप्त निविदांपैकी सुयोग्य अशा किमतीसह कमी सवलतीचा कालावधी असलेली निविदा शासनास मंजुरी साठी सादर करणे.

४) शासनाकडून निविदा मंजुरीनंतर कार्यकारी अभियंता यांनी कार्यारंभ आदेश देणे.

५) प्रकल्पाचे कामांची आखणी व दिलेल्या मुदतीत काम पुर्ण करणे.

६) साधारण ९८% काम झाल्यानंतर व रस्ता वाहतुकीस योग्य झाल्यानंतर कामाचे तात्पुरत्या स्वरुपातील पुर्णत्वाचा दाखला उद्योजकास देणे.

७) पथकर वसुलीचा प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी सादर करणे.

८) शासन स्तरावरुन पथकर प्रस्तावाची मंजुरीनंतर अधिसूचना निर्गमित करणे.

९) उद्योजकाने सवलतीच्या उर्वरित कालावधीसाठी पथकर वसुली करणे.

१०) पथकर सुरु करावयाच्या दिनांकापासून ६० दिवसांत प्रकल्प अंतिमरीत्या पुर्ण करणे व कार्यकारी अभियंता यांनी पुर्णत्वाचे प्रमाणपत्र देणे.

११) सवलतीच्या कालावधीत उद्योजकाने प्रकल्पाची संपूर्ण देखभाल व दुरु स्ती करणे.

१२) ज्या ठिकाणी वाहतुक वर्दळ व प्रकल्पाच्या किंमतीनुसार प्रकल्प सुसाध्य होत नाही त्याठिकाणी शासनाच्या अर्थसंकल्पात काही प्रमाणात निधीची तरतुद करुन (Government's equity) प्रकल्प सुसाध्य करण्याचा प्रयत्न केला जातो.

२.३.५ खाजगीकरणांतर्गत रस्ते विकासाची व इमारती प्रकल्पांची निविदा बोलविलेनंतर कार्यारंभ आदेश देण्यापर्यंत बराच कालावधी लागत असल्याने दि.०१.०९.२००६ पासुन सदर प्रकल्पांना गती देण्याकरीता सचिव (बांधकामे) सा.बां. विभाग यांचे अध्यक्षतेखालील गटाची स्थापना करण्यात आली असून या गटाची कार्यकक्षा खालील प्रमाणे आहे.

१. प्राथमिक व निविदा स्तरावरील प्रकल्पांचे नियोजन व संनियंत्रण

२. प्रकल्पाची छाननी करणे व शासनाची मान्यता घेणे.

३. प्रकल्पास मंजूरी देतांना वित्त विभाग, नियोजन विभागाची सहमती घेणे.

प्रकल्पास मान्यता मिळालेनंतर निविदा प्रक्रिया व उद्योजकाकडून काम करुन घेणे याची जबाबदारी मुख्य अभियंता व क्षेत्रिय अधिकारी यांची आहे.

२.३.६ विविध महामंडळे व उपक्रमे यांनी रोखे व्दारा उभारलेल्या निधीतून तसे खाजगीकरणांतर्गत उद्योजकाकडून बीओटी तत्वावर करावयाच्या रु.१५ कोटीपेक्षा जास्त किमतीचे प्रकल्प हाती घेण्यापूर्वी मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीची प्रकल्पास मान्यता घेणे बंधनकारक आहे.

* * *

२.४ रस्ते देखभाल व दुरूस्ती

२.४.१ सार्वजनिक बांधकाम विभागाचे नियमपुस्तीकेतील प्रकरण ३ व परिच्छेद १३ नुसार खात्याचे कामांचे प्रथमतः दोन प्रकारामध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे.

१. मुळ बांधकामे. २. दुरूस्ती व परिरक्षण

१) मुळ बांधकामे या संज्ञेमध्ये संपूर्ण नविन बांधकाम करणे (रस्ते किंवा इमारती) किंवा सध्याच्या बांधकामामध्ये भर घालणे किंवा फेरफार करणे, तसेच नव्याने खरेदी करण्यात आलेल्या, संपादीत करण्यात आलेल्या पूर्वी काम सोडून देण्यात आलेल्या व पुन्हा वापरात आणण्याची आवश्यकता असलेल्या बांधकामाची सर्वकष दुरूस्ती करणे यांचा समावेश होतो. (सा.बां. विभाग नियमावलीनुसार परिच्छेद १३१ (१))

२) दुरूस्ती व परिरक्षण या संज्ञे मध्ये प्रथमतः सर्वसाधारण वापरात असलेल्या इमारती / रस्ते यांचे योग्य स्थितीत परिरक्षण करण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या बांधकामाचा समावेश होतो.

२.४.२ अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची देखभाल दुरूस्ती करणे त्यावरील वाहतूकीस कोणत्याही प्रकारे बाधा / खंडीत होणार नाही, हे देखील दुरूस्तीचे मुख्य उद्दिष्ट आहे. रस्त्याची योग्य प्रकारे देखभाल दुरूस्ती करणे हे सा.बां. विभागाचे मुख्यतः कर्तव्य आहे. राष्ट्रीय महामार्ग , राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, वाहतुकीस सुरळीत ठेवणे याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे येते. तसेच इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग या रस्त्यांची संपूर्ण जबाबदारी जिल्हा परिषदे कडे असते.

या पैकी राष्ट्रीय महामार्गाची देखभाल दुरूस्तीसाठी येणारा सर्व खर्चाचा भाग केंद्र शासन उचलते तर राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, इतर जिल्हामार्ग , ग्रामिण मार्ग देखभाल दुरूस्तीचा खर्च राज्य शासन करते. (सा.बां. विभाग नियमावली परिच्छेद १३१ (२))

राष्ट्रीय महामार्गाची देखभाल व दुरुस्ती

२.४.३ सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र राज्यातील राष्ट्रीय महामार्गांची देखभाल व दुरुस्ती केली जाते. राज्यात साधारणतः ४००० कि.मी. लांबीचे राष्ट्रीय महामार्ग आहेत. महामार्गाच्या दुरुस्तीसाठी भुपृष्ठ वाहतूक मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्फत अनुदान उपलब्ध करुन दिले जाते व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून महामार्गांची दुरुस्ती त्यानुसार केली जाते.

राष्ट्रीय महामार्गाची देखभाल व दुरुस्ती यांत प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होतो.

अ) पृष्ठभागास खड्डे पडू नयेत यासाठी पावसाळयापूर्वी आवश्यक उपाययोजना करणे (गटर्स काढणे, बाजूपट्टया तासणे, सीलकोट करणे इत्यादी)

ब) पावसाळयात पडणारे खड्डे इमल्शन मिश्रीत खडीने भरणे किंवा उघडीप असल्यास खडी डांबराने भरणे.

क) बाजूपट्टयांवरची, वळणांवरची झुडूपे काढणे, बाजूपट्टया मुरुमाने भरणे.

ड) कि.मी./२००मी. /गार्ड स्टोन / सुचना फलक /पिलर्स इत्यादी वेळोवेळी रंगरगोटी करणे.

इ) गरजेनुसार इतर आवश्यक कामे करणे.

राष्ट्रीय महामार्गाची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी मिळणारे अनुदान हे प्रचलित बाजारभाव, निर्देशांक इत्यादीनुसार बदलत असते.

२.४.४ भारत सरकारच्या भूतल वाहतूक व महामार्ग परिवहन मंत्रालयाने दि.२६ सप्टेंबर २००२ च्या पत्रानुसार राष्ट्रीय महामार्गाच्या नियतकालीक नुतनीकरणासाठी व पृष्ठभागाच्या गुणवत्तेत सुधारणा करणे या कामांसाठी सुधारीत मार्गदर्शक तत्वे दिली आहेत. त्यानुसार रा.म.च्या लांबीची निवड करणे अपेक्षित आहे. त्याचा तपशिल थोडक्यात खालील प्रमाणे

१) पृष्ठभागाच्या गुणवत्तेत सुधारणा करणेचे कामासाठी लावावयाचे निकष :

I) रा.म.ची अशी लांबी कि जेथे अस्तित्वातील थर अपूर्ण नाही किंवा त्याचे विभाजन झाले नाही परंतु पृष्ठभागावर तडे पडले आहेत व त्यास समतल करण्याची आवश्यकता आहे.

किंवा

II) दोन पदरी रस्ता ज्यावर वाहतूक वर्दळ १५०० सी.व्ही.डी. किंवा जास्त आणि खरबरीतपणा निर्देशांक ३५०० मी.मी. प्रती कि.मी. पेक्षा जास्त असणे.

किंवा

III) एक पदरी रस्ता ज्याची भौमितीकता व्यवस्थित आहे व वाहतूक वर्दळ १००० सी.व्ही.डी.पेक्षा जास्त आणि खरबरीतपणा निर्देशांक ३५०० मी.मी. / कि.मी. पेक्षा जास्त आहे.

किंवा

IV) अशी लांबी की जिचे ५ वर्षापूर्वी मजबूतीकरण झाले आहे परंतू नियतकालीक नुतनीकरण केलेले नाही व वाढत्या वाहतुकीमुळे खराब होण्याचे संकेत दिसत आहेत.

V) अशी लांबी शक्यतो १० किमी पेक्षा कमी नसावी.

२)नियतकालीक नुतनीकरणासाठी लावावयाचे निकष

I) रस्त्याची अशी लांबी जेथे वाहतुक वर्दळ ४५० ते १५०० सी.व्ही.डी. आहे आणि किरकोळ खराब झाली आहे व जेथे नुतनीकरणाची आवश्यकता समर्थनीय आहे.

II) रस्त्याची अशी लांबी जिचे मजबूतीकरण आधीच्या कार्यक्रमात केलेले आहे व पृष्ठभागाची स्थिती तुलनात्मक दृष्टया चांगली आहे व नुतनीकरणाने ज्याचा पृष्ठभाग टिकाऊ होईल व पृष्ठभागाची गुणवत्ता उत्तम होईल व प्रस्तावित नुतनीकरण कमीत कमी तीन वर्ष टिकेल.

III) शक्यतो प्रस्तावित नियतकालीक नुतनीकरणाची लांबी १० किमी असावी किंवा एकत्रितरित्या अंदाजपत्रक केल्यास जवळपासच्या तुकडयांची लांबी १० किमी असावी.

प्रमुख राज्यमार्ग, राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, इतर जिल्हा मार्ग, ग्रामिण मार्गाची देखभाल दुरूस्ती

२.४.५ शासन सा.बां. विभागाचे परिपत्रक क्र. आर.एम.आर./ २००२/प्र.क्र.१०९/रस्ते-१ दि. ४/६/२००२ यामध्ये रस्त्याची देखभाल व दूरुस्ती करण्याबाबत सविस्तर सुचना देण्यात आलेल्या आहेत.

गट अ : रस्ते वाहतुकी योग्य ठेवण्यांसाठी करावयाची कामे.

- हा कार्यक्रम संबंधीत अधीक्षक अभियंता स्तरावर मंजूर करण्यात येतो.
- या मधील कामे खात्याच्या मजुरांमार्फतच करण्यात येतात.
- जर कंत्राटदाराकडून ही कामे करावयाची असल्यास मुख्य अभियंता यांची परवानगी घेणे आवश्यक असते.
- या गट "अ" मध्ये खालील कामांचा समावेश आहे.

१. मजूरांचे वेतन

२.रस्त्याचे पृष्ठभागावरील खड्डे भरणे (शासन सा.बां. विभागाचे क्र. आरएमआर/ २००२ /प्र.क्र.१०९/रस्ते-१ दि. ४/६/२००२ चे पत्र)

३. डोंगरी गटारे (Catch Water Drain) खणणे व सुस्थितीत राखणे

४.अस्तित्वातील गटारे पुरेशी खोल करणे

५. नवी गटारे खणणे

६. बाजू पट्टया तासणे / बाजूपट्टयांना योग्य उतार देणे

७. उखडलेले कठडे, पॅरापेट इत्यादींची पुर्नबांधणी करणे

८. किरकोळ स्वरुपात वाहून गेलेल्या रस्त्याच्या भरावांची पुनर्स्थापना करणे (Restoring Rain Cuts)

गट ब : रस्त्याचा दर्जा टिकविण्यासाठी करावयाची सुधारणा.

या गटा मध्ये खालील प्रकाराची कामे अभिप्रेत आहे.

१. रस्त्याची विशेष दुरूस्ती / सुधारणा.

२. डांबरी नुतनीकरण (सर्वसाधारण परिस्थितीतील चार वर्षानंतर नुतनीकरण करण्यांत येते.)

३. थेट रस्ते सुधारणा.

४. खडी नुतनीकरण.

५. रुंदीकरण (धावपट्टीचे).

गट (क) :- विशिष्ट प्रयोजनाची कामे :-

कोकण, मराठवाडा, विदर्भ विकास कार्यक्रमातील कामे (मंत्री मंडळ बैठकीत मंजूर झालेल्या वावाच्या मर्यादेत)

हा कार्यक्रम शासनाची पूर्व सहमती घेवून मुख्य अभियंता स्तरावर मंजूर करण्यात येतो.

या गटात प्रामुख्याने खालील कामांचा समावेश करण्यात आला आहे.

(१) अपघात प्रवण क्षेत्राची / स्थळांची सुधारणा

(२) रस्त्यांची अन्य अभियांत्रिकी सुधारणा (Geometrical Improvement) रस्त्याचे मानका नुसार

(३) कमकुवत पुलाची तसेच मोठया पुलांची दुरुस्ती/ मजबुतीकरण.

(४) गांवे बारमाही रस्त्याने जोडणेसाठी मुरुमी पृष्ठभागाचे खडीकरण

(५) गावे बारमाही रस्त्याने जोडणेसाठी मोऱ्या/ लहान पुलांची / रस्त्यांची मुळ बांधकामे

(६) लहान मोऱ्यांची सुधारणा/ रुंदीकरण.

गट (ड) :- संकिर्ण कामेः-

या मध्ये रस्त्याची देखभाल व दुरुस्ती अंतर्गत उपरोक्त अ, ब, क मध्ये नसणाऱ्या प्रकारची कामे असतील

२.४.६ रस्ते व पूलाच्या देखभाल व दुरूस्तीची प्रमाणके महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम परिपत्रक क्र. आरएमआर-१०८९ सीआर- ८७ / रस्ते १ मंत्रालय मुंबई दिनांक १५ नोव्हेंबर १९९५ अन्वये देण्यांत आली आहेत. ही मानके खालील प्रमाणे आहेत. सदरहु मानके सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद अखत्यारीतील रस्ते यांना लागू राहतील.

अ.क्र.	रस्त्याचे वर्गीकरण	प्रतिकिलोमीटर दर
१	राज्यमार्ग	रू. २५,६०० ते ३८,२००
२	प्रमुख जिल्हा मार्ग	रू. २१,०५० ते ३०,१००
३	इतर जिल्हा मार्ग	रू. २०,३०० ते २०,६५०
४	ग्रामीण मार्ग	रू. १९,१२५ ते २०,३००
५	अवर्गीकृत रस्ते	रू. १०,४५०
६	लहान पूल(३० मी. पेक्षा कमी लांबीचे)	रू. १०० प्रतिमीटर
७	मोठे पूल(३० मी. पेक्षा जास्त लांबीचे)	रू. २५० प्रतिमीटर

वरील तक्त्यात दर्शाविलेले दर सन १९८९-९० या दरसुचीवर आधारित आहेत. वेळोवेळी बदलणा-या दरसुचीतील दर सुधारित करुन रस्ते दुरुस्तीसाठी निधीची मागणी केली जाते. उपलब्ध निधीच्या अधिन राहून रस्ते दुरुस्तीची कामे केली जातात.
(महाराष्ट्र शासन सा.बां.विभाग परिपत्रक क्र.आरएमआर/१०८९/सीआर/८७/रस्ते-१ दि.१५नोव्हेंबर १९९५)

गट इ) पूरहानी दुरुस्ती :-

अपवादात्मक परिस्थितीत ज्यावेळी पूरहानी दुरुस्तीची कामे करणे आवश्यक असतात त्यावेळी ती शासनाकडे उपलब्ध होणा-या निधीच्या अनुषंगाने केली जातात.

* * *

२.५ रस्ते , पुल व इमारती यांची तपासणी

२.५.१ वाहतुक वर्दळ आणि रस्त्याच्या महत्वानुसार रस्ते विकास आराखडयातील रस्त्यांची राष्ट्रीय महामार्ग, राज्यमार्ग , प्रमुख जिल्हा मार्ग, इतर जिल्हा मार्ग, ग्रामीण मार्ग अशी वर्गवारी करण्यात आली आहे. रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती करणे, रस्त्यांच्या अवस्थेबद्दल अहवाल सादर करणे, कामांचे प्रस्ताव तयार करणे इ. करीता रस्त्यांची पाहणी तथा तपासणी शासन परिपत्रक क्र.आरएमआर-१०८२/(२१४) डेस्क आर-१ दि.८/१०/१९८४अन्वये करण्यात येते.

अ.क्र.	रस्त्याचा दर्जा	कार्यकारी अभियंता	उप अभियंता	कनिष्ठ अभियंता
१.	राष्ट्रीय महामार्ग/ राज्यमार्ग	वर्षातुन दोन वेळा	वर्षातुन सहा वेळा	वर्षातुन बारा वेळा
२.	प्रमुख जिल्हा मार्ग/ इतर जिल्हा मार्ग	वर्षातुन एक वेळा	वर्षातुन तीन वेळा	वर्षातुन सहा वेळा
३.	ग्रामीण मार्ग	वर्षातुन एक वेळा	वर्षातुन दोन वेळा	वर्षातुन दोन वेळा

२.५.२ आदिवासी विभागातील रस्ते सुस्थितीत राहून आदिवासींना शासकीय योजनांचा लाभ व्हावा, सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी शासनाने परिपत्रक क्र. योजना १०२००४/प्र.क्र.४५५ नियोजन -१, दि.१७/७/२००४ अन्वये मानके निश्चित केली आहेत.

अ.क्र.	अधिकारी	तपासणी नियम
१.	मुख्य अभियंता	वर्षातून एकदा
२.	अधीक्षक अभियंता	६ महिन्यातून एकदा
३.	कार्यकारी अभियंता, सा.बां./ जि.प.	३ महिन्यातून एकदा
४	उप अभियंता	महिन्यातून एकदा
५	कनिष्ठ अभियंता	महिन्यातून दोनदा

२.५.३ रस्त्यावरील पुल व मोऱ्या यांची योग्य प्रकारे देखभाल व दुरुस्ती व्हावी यासाठी शासन परिपत्रक क्र- MTS /३३६६/ NH -२ दिनांक २१/३/१९८८. अन्वये तपासणीसाठी मानके निश्चित केली आहेत

अ) नियतकालीन तपासणी :-

अ.क्र.	स्ट्रक्चर	प्राधिकरण	तपासणी मानके
१.	मो-या / कल्वर्ट	कनिष्ठ अभियंता उप अभियंता	वर्षातून २ वेळा वर्षातून १ वेळा
२.	लहान पुल	कनिष्ठ अभियंता उप अभियंता	वर्षातून २ वेळा वर्षातून २ वेळा
३.	मोठा पुल	उप अभियंता कार्यकारी अभियंता	वर्षातून २ वेळा वर्षातून २ वेळा
४	लांब पुल	कार्यकारी अभियंता अधीक्षक अभियंता	वर्षातून २ वेळा वर्षातून १ वेळा

ब) सविस्तर तपासणी :-

अ.क्र.	स्ट्रक्चर	प्राधिकरण	तपासणी मानके
१.	लहान पुल	कार्यकारी अभियंता	५ वर्षातून १ वेळा
२.	मोठा पुल सर्व साधारण वातावरण	अधीक्षक अभियंता	५ वर्षातून १ वेळा
३.	मोठा पुल तीव्र वातावरण	अधीक्षक अभियंता	३ वर्षातून १ वेळा
४	लांब पुल साधारण वातावरण	मुख्य अभियंता	५ वर्षातून १ वेळा
५	लांब पूल तीव्र वातारण	मुख्य अभियंता	३ वर्षातून १ वेळा

२.५.४ पुलाचे लहान/मोठा/लांब असे वर्गीकरण दोन अंत्यपादातील अंतरानुसार खालील प्रमाणे करण्यात येते.

लांबीनुसार खालील प्रमाणे करण्यात येते.

अ) ६मीटर पेक्षा कमी - कल्वर्ट

ब) ६ मीटर ते ३० मीटर - लहान पुल

क) ३० मीटर ते २५० मीटर - मोठा पूल

ड) २५० मीटर पेक्षा जास्ती लांबी -लांब पूल

२.५.५ रस्ते, पुल व इमारती यांच्या कामांमध्ये योग्य गुणवत्ता राखण्याची जबाबदारी प्रामुख्याने क्षेत्रीय मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांची आहे. तथापी कामाचा व्याप व इतर महत्वाची कामे यात मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांचा वेळ जात असल्याने कामांच्या तपासणीकडे विशेष लक्ष पुरविणे शक्य होत नाही. तेव्हा क्षेत्रीय स्तरावर सुरु असलेल्या कामांची तपासणी होऊन कामांत गुणवत्ता राखली जावी याकरीता दक्षता व गुण नियंत्रण मंडळाकडून प्रातिनिधीक स्वरुपात तपासणी करण्यासाठी शासन परिपत्रक क्रमांक Misc -२०००/१३४/ NH -२ दि.१५.५.२००२ अन्वये खालील प्रमाणे मानके ठरवून दिलेली आहेत.

अ.क्र.	तपशिल	मानके
१	नियतकालीक निरिक्षण	१९१
२	आकस्मिक तपासणी	४८
३	हजेरीपटाची तपासणी	२४
४	क्षेत्रीय चाचण्यांचे पुनर्विलोकन	१८
५	कामांचा दर्जा तपासणी	२४
६	भांडार तपासणी	४
७	निरिक्षण वाहने व बांधकाम यंत्रे आणि कार्यशाळा तपासणी	१०
८	तांत्रिक लेखा परिक्षण	९
९	तांत्रिक प्रशिक्षण वर्ग	१०

२.५.६ योजना निहाय मानके

१	स्थानिक विकास काम	१०%
२	रो.ह.यो. काम	५%
३	दुरुस्ती काम	३०%
४	जि.प.कडील काम	२०%
५	मुळ बांधकामे व इतर	३५%

२.५.७ जिल्हा परिषद मार्फत इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गावर करण्यात येणाऱ्या कामांवर योग्य नियंत्रण रहावे यासाठी शासन परि.क्र.२ PS - १०९४/CR-३४/MV-३ दिनांक ३१/१०/१९९८ अन्वये अधीक्षक अभियंता यांच्यासाठी खालील प्रमाणे मानके ठरवून दिलेली आहेत.

अ.क्र.	अंदाजित किमंत	मानके
१	रु. ३ ते १५ लक्ष	५ % काम
२	रु.१५ लक्ष पेक्षा जास्त	१०० % काम

२.५.८ रोजगार हमी योजनेतील रस्त्यांची कामे नियमानुसार व गुणवत्तेची व्हावी यासाठी शासन परि.क्र.- Est-११०३/CR-१७२/EGS-३ दिनांक १/१२/२००३ अन्वये सा.बां. खात्यातील अधिकाऱ्यांसाठी खालील मानके ठरवून दिलेली आहेत.

अ.क्र.	प्राधिकरण	वर्षातून तपासावयाच्या कामांची संख्या	तपासणी अहवाल सादर करण्याचे प्राधिकरण
१	अधीक्षक अभियंता	१२	विभागीय आयुक्त
२	कार्यकारी अभियंता	२५ व आवश्यकते नुसार	जिल्हाधिकारी
३	उप अभियंता/उप विभागीय अभियंता / सहा.अभियंता श्रेणी-१	५० व आवश्यकते नुसार	कार्यकारी अभियंता

२.५.९ सा.बां. खात्याकडे देखभाल व दुरुस्तीसाठी असणाऱ्या इमारतींची योग्य प्रकारे काळजी घेतली जावी यासाठी खात्यातील अधिकाऱ्यांनी शासन परि.क्र.BDG-१०९०/CR-२४/Bldg. २ दिनांक ३१/३/१९९०अन्वये खालील मानकाप्रमाणे तपासणी करणे अभिप्रेत आहे.

अ.क्र.	प्राधिकरण	तपासणी मानके	प्रकार
१.	कनिष्ठ अभियंता	वर्षातुन ६ वेळा	सर्व
२.	उप अभियंता	वर्षातुन २ वेळा	सर्व
३.	कार्यकारी अभियंता	वर्षातुन १ वेळा	क्षेत्रफळ > ५०० चौ.मी.
४.	अधीक्षक अभियंता	वर्षातुन १ वेळा	क्षेत्रफळ > ५००० चौ.मी. किंवा १० मजले
५.	मुख्यअभियंता/ वास्तु शास्त्रज्ञ	वर्षातुन १ वेळा	महत्वाच्या इमारती

* * *

२.६ जिल्हा दरसूची

२.६.१ सा.बां.विभाग अंतर्गत शासकीय इमारती तसेच रस्त्यांची देखभाल दुरुस्ती व नविन बांधकामे व त्यांची देखभाल दुरुस्ती करण्यात येते. या कामांसाठी शासनामार्फत निधी उपलब्ध केला जातो. सदर नविन कामे करण्याकरीता अथवा देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यांकरिता आधी कामांचे अंदाजपत्रक तयार करुन सक्षम स्तरावर मंजुरी घेण्यात येते व तद्नंतर ही कामे करण्यात येतात. अंदाजपत्रक तयार करण्यासाठी करावयाच्या कामाचे सर्वेक्षण करुन बाबी निश्चित करण्यात येऊन किंमत काढण्यात येते. ही किंमत काढण्यासाठी प्रत्येक बाबींचे दर निर्धारीत केलेले असणे आवश्यक असते. यासाठी प्रादेशिक स्तरावर जिल्हा दरसूची समिती गठीत करण्यात येते. या समितीमध्ये प्रादेशिक विभागाअंतर्गत सर्व मंडळ कार्यालयाचे अधीक्षक अभियंता व जिल्हा मुख्यालयी असलेले सा.बां.विभागाचे कार्यकारी अभियंता हे सदस्य असतात. या समितीचे सचिव परिमंडळाचे अधीक्षक अभियंता हे असतात.

२.६.२ जिल्हा दरसूची ही प्रत्येक वर्षाकरीता स्वतंत्र तयार करण्यात येते. शासन परिपत्रक क्र.जिदसु/६२००२/१६३/कि-३ दि.१९.७.२००२ अन्वये साधारणपणे एप्रिल ते मार्च आर्थिक वर्ष संपल्यानंतर या समितीच्या बैठका घेण्यात येऊन जिल्हा दरसूची तयार करण्याचे काम पूर्ण करुन संबधीत आर्थिक वर्षाच्या मे महिन्यापर्यंत प्रसिध्द करण्यात येते. कांही कारणास्तव दरसूची तयार होण्यास विलंब लागल्यास मागील वर्षाच्या दरसूचीस मुदतवाढ देण्यात येते. जिल्हा दरसूची मध्ये साधारण खालील प्रमाणे बाबींचे दर निश्चित करण्यात येतात.

१) बांधकाम करावयाच्या बाबींचा तपशीलनिहाय व गटनिहाय पूर्ण स्वरुपात करावयाच्या कामाचे दर.
२) पूर्ण स्वरुपात करावयाच्या कामांतील बांधकाम साहित्य व मजुरीचे दर.
३) स्वतंत्रपणे मजुरीचे दर
४) कि.मी. निहाय बांधकाम साहित्य वाहतुकीचे दर
५) यंत्रसामुग्रीचे वापराचे दर.

२.६.३ दरसूची तयार करतांना साधारणतः खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

१) सर्व जिल्हा मुख्यालयाच्या सा.बां.विभागाच्या कार्यकारी अभियंता कडून बाजारातील बांधकाम साहित्याचे दर मागविण्यात येतात.
२) सर्व मंडळ कार्यालयाकडून मागील आर्थिक वर्षातील बांधकामाच्या निविदांचा कल मागविण्यात येतो.
३) पेट्रोल व डिझेल यांचे दर तसेच बाजारातील साहित्य वाहतूकीचे भाडे ही माहिती गोळा करण्यात येऊन वाहतूकीचे दर निश्चित केले जातात.
४) बाजारातील प्राप्त दर व मागील वर्षातील निविदांचा कल यांची जिल्हा दरसूचीच्या बैठकीत चर्चा करण्यात येऊन त्यानुसार बाबनिहाय कामांचे दर निश्चित करण्यात येतात.

५) बांधकामाशी संबधीत एखादी नवीन बाब दरसूचीत अंतर्भूत करावयाची असल्यास या बैठकीत त्या बाबीविषयी सविस्तर चर्चा करण्यात येऊन दरपृथ्थकरण तयार केले जाते व त्यानुसार त्या बाबीचा दर निश्चित केला जातो.

६) शासकीय इमारती व रस्ते बांधकामाशिवाय, नगरपालिका,महामंडळे,खाजगी स्थापत्य अभियंते यांनाही बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करतांना जिल्हा दरसूची उपयोगी पडत असल्याने त्यांच्यासाठीही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे उपलब्ध असते.

* * *

२.७ रोजगार हमी योजना

२.७.१ १९८१-२००१ रस्ते विकास योजनेतील रस्त्यांचे बांधकाम रो.ह.यो. अंतर्गत करता येवू शकते योजनाबाहय रस्त्यांबाबत विभागीय आयुक्त स्तरावर मान्यता देण्याबाबतचे अधिकार आहेत.

२.७.२ रो.ह.यो. नियमावलीत रस्ते बाबतची सुधारणेची रुंदीकरणाची कामे प्रचलीत निकषानुसार घेता येतात.

२.७.३ रो.ह.यो.च्या प्रचलीत नियमानुसार कामांवर सोयी-सुविधा पुरविण्यात येतात.

* * *

२.८ स्थानिक विकास कार्यक्रम

स्थानिक गरजांवर आधारीत आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम शासनाकडून राज्यात सन १९८४-८५ या आर्थिक वर्षापासून राबविण्यात येत आहे. लोकांच्या किमान गरजेची, लहान स्वरुपाची कामे ज्यांना नियमित जिल्हा योजनेमध्ये निधी अभावी स्थान मिळू शकत नाही अशी कामे स्थानिक विकास कार्यक्रमात घेऊन पूर्ण करण्याचा शासनाचा उद्देश आहे.

२.८.१ या कार्यक्रमांतर्गत राज्य शासनातर्फे प्रत्येक विधानसभा सदस्य / विधान परिषद सदस्य यांना त्यांचे मतदार संघात दरवर्षी रु.८०.०० लक्ष किमतीच्या कामांकरीता निधी उपलब्ध करुन दिला जातो. विधान परिषद सदस्यांना राज्यातील कोणत्याही जिल्हयातील कामे सूचवून त्याकरीता निधी वापरण्याची मुभा (सवलत) देण्यात आलेली आहे.

२.८.२ स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत कामांना मंजूरी देण्यासाठी शासनाने शासन निर्णय क्र.स्थाविका-१०९९/प्र.क्र.७/का-१४४५ दि.१६/६/१९९९ अन्वये जिल्हा स्तरावर समिती गठीत केलेली आहे. त्याचे पदाधिकारी खालील प्रमाणे असतात.

१) जिल्हयाचे पालकमंत्री	:अध्यक्ष
२) जिल्हयातील	
अ) विधानसभा सदस्य	: सदस्य
ब) विधान परिषद सदस्य	: सदस्य
३) जिल्हा परिषदांचे अध्यक्ष	: सदस्य
४) जिल्हाधिकारी	: सदस्य
५) मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.	: सदस्य
६) जिल्हा नियोजन अधिकारी	: सचिव

२.८.३ सदर स्थानिक विकास कार्यक्रमात सुचविलेल्या कामांना वरील समितीची मंजूरी मिळाल्यानंतर जिल्हाधिकारी संबधीत खात्याकडून बांधकामाची अंदाजपत्रके मागवतात. संबधीत कार्यान्वयीन विभाग अंदाजपत्रके सर्वसाधारण तांत्रिक तपासणी करुन जिल्हाधिकारी यांना सादर करतात. जिल्हा नियोजन अधिकारी अंदाजपत्रके व उपलब्ध निधी यांचा अभ्यास करुन प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना सादर करतात. जिल्हाधिकारी सदर कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करतात.

२.८.४ विधीमंडळ सदस्यांनी सुचविलेल्या बांधकामांचे विषयानुसार व कामांचे स्वरुप विचारात घेवून शासनाचे अनुज्ञेय कामांचे सुधारीत परिशिष्ट अ शासन निर्णय क्र.स्थाविका-२००४/प्र.क्र.२७/का-१४४५ मुंबई दि.१९.४.२००४ अन्वये निर्गमित केले आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे करावयाच्या कामांची सर्वसाधारण यादी खालीलप्रमाणे आहे.

परिशिष्ट अ

रस्ते: १) रस्त्यांची कामे रु. १०.०० लक्ष पर्यंत

I) लहान रस्ते (खडीकरण)

ii) मिसिंग लिंक

iii) छोटे पूल

iv) ३ किमी पर्यंत लांबीच्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण

v) नळकांडी पूल

vi) साकव

vii) नाल्यांची कामे

viii)रस्त्यावरील मोंरींची कामे

ix) लहान नाल्यावर फरशी बांधणे

x) फुट ब्रीज

xi) ड्रेनेजची कामे

२) रस्त्यांची कॉक्रीटीकरणाची कामे

३) घाटांमध्ये संरक्षक भिंत बांधणे

४) नवीन रस्त्यांचे मातीकाम, रस्त्यांचे रुंदीकरण करणे व रस्त्यांचे चढाव सुधारणे

५) हॉटमिक्स पध्दतीने रस्त्यांचे डांबरीकरण.

वरील सर्व प्रकारची कामे सा.बां.विभागाकडून करण्यात येतात

इमारती :

१) सामाजिक सभागृह रु.१०.०० लक्ष

२) अनुसूचित जाती / जमाती वस्त्यांमधील समाजमंदिराच्या दुरुस्तीची कामे

३) समाजमंदीर व कम्युनिटी हॉलची कामे (रु.१०.०० लक्ष)

वर नमुद केलेल्या खर्चाच्या मर्यादेत टाईप डिझाईनप्रमाणे कामे सा.बां.विभागाकडून किंवा जि.प. कडून करण्यात येतात.

याशिवाय प्राथमिक शाळा खोल्या, प्रवासी निवारे, व्यायामशाळा, स्मशानभूमी, चावडी, ग्राम सचिवालय, सार्वजनिक वाचनालय इ. कामे स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत जि.प. किंवा सा.बां. विभागाकडून करण्यात येतात.

२.८.५ डोंगरी विकास कार्यक्रम :

शासनाने विहीत केलेल्या डोंगराळ भागासाठी लहान लहान लोकोपयोगी कामे करण्यासाठी स्थानिक विकास कार्यक्रमाप्रमाणेच शासनाकडून स्वतंत्र निधी उपलब्ध करुन दिला जातो.

२.९ खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना.

२.९.१ खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत, खासदारांच्या मतदारसंघातील विकासाची कामे सा.बां.खात्याकडून केली जातात. लोकसभा व राज्यसभेचे प्रत्येक सदस्य एका वर्षात आपल्या मतदारसंघातील रु.२००.०० लक्ष किंमतीपर्यंत विकासाची कामे सुचवू शकतात. या योजने अंतर्गत कमाल रु.२५.०० लक्ष किंमतीचे काम घेता येऊ शकते. भारत सरकार सांख्यिकी व कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय,नवी दिल्ली यांच्या एप्रिल २००२ च्या खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनांबाबतच्या दिशा निर्देश पुस्तिकेत या योजनेअंतर्गत घेण्यांत येणा-या कामांची यादी दिली आहे. तसेच ही कामे करताना शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित होणा-या सुचनांचे पालन करण्यांत येते.

२.९.२ खासदारांच्या स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत करावयाच्या कामांची यादी

१) शाळा, वसतीगृहे व ग्रंथालयाकरिता इमारती बांधणे तसेच शासकीय किंवा स्थानिक संस्थांच्या अधिपत्याखाली असलेल्या शैक्षणिक संस्थांच्या इमारती बांधणे, शैक्षणिक संस्था हया अनुदानित किंवा विनाअनुदानित परंतु मान्यताप्राप्त संस्थाच्या असतील व त्या कमीत कमी दोन वर्षापासून कार्यरत असतील अशा संस्थांच्या इमारती बांधणे.

२) गांवातील व शहरांतील नागरिकांसाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करण्याकरिता कूपनलिका (Tube Wells) व पाण्याच्या टाक्या बांधणे किंवा अशी बांधकामे जी पाणी पुरवठयाशी संबधीत असतील. तसेच पाणी उपलब्ध करण्याकरीता जलवाहिनी (पाण्याचे टॅंकर) खरेदी करणे.

३) गावे, शहरे व नगरांमध्ये रस्त्यांचे बांधकाम करणे, असे रस्ते ज्यामध्ये अंशतः लांबीचे रस्ते (Part Road), जोडरस्ते व लिंक रस्ते यांचा समावेश असेल. स्थानिक लोकांची गरज पूर्ण होण्याकरिता संबधीत खासदार व जिल्हाधिकारी यांच्या सहमतीने काही ठरावीक कच्च्या रस्त्यांचे बांधकामे करणे.

४) उपयुक्त रस्ते किंवा खराब रस्ते अथवा कूपनलीका व नदी नाल्यांवरील मो-या / पूलांचे बांधकामे करणे.

५) वृध्दांसाठी किंवा अपंगासाठी आश्रम बांधणे.

६) मान्यता प्राप्त जिल्हा किंवा राज्यस्तरीय क्रिडा संघांच्या सांस्कृतीक किंवा खेळांशी संबंधीत कार्यासाठी अथवा दवाखान्यासाठी, स्थानिक संस्थांसाठी इमारतीचे बांधकाम करणे. व्यायामशाळा, क्रिडा संघ समिती किंवा शारीरिक शिक्षण / प्रशिक्षण संस्थाकरिता विविध प्रकारच्या व्यायामाच्या सुविधांची तरतूद करणे.

७) सरकारी आणि सामुदायिक जमिनीवर किंवा इतर अधिग्रहीत केलेल्या जमिनीवर (Other Surrender Lands) सामाजिक वनीकरण, वनशेती, रोपवाटीका व उद्यानांची व्यवस्था.

८) गाव,शहरे व नगरांमधील तलावांची स्वच्छता करणे.

९) सार्वजनिक सिंचन व सार्वजनिक मलःनिस्सारण वाहिनीचे बांधकाम

१०) सामुदायिक उपयोगाकरीता व सबंधीत कार्याकरीता गोबर गॅस संयत्र, अपारंपारिक उर्जा प्रणाली / साधन सामुग्रीचे बांधकाम करणे.

११) सिंचनाकरीता भराव किंवा उपसा किंवा जमिनी खालील पाण्याची पातळी वाढविणे करीता बांधकाम करणे.

१२) सार्वजनिक ग्रंथालय व वाचनालयांचे बांधकाम करणे.

१३) पाळणाघरे आणि अंगणवाडी करीता बांधकाम करणे.

१४) एएनएम निवासस्थानांबरोबर परिवार कल्याण उपकेंद्रासहीत सार्वजनिक आरोग्य देखभाल केंद्रांची इमारत बांधणे. अनुदानित संस्थांकरीता देखील अशा इमारतींचे बांधकाम करणे .

१५) स्मशानभूमीवर अत्यंसंस्काराकरीता शवदाहिनी व निवारा बांधकाम करणे.

१६) सार्वजनिक शौचालय व स्नानगृह बांधणे.

१७) नाली व गटारींचे बांधकाम करणे.

१८) पादचारी मार्ग व पादचा-यांसाठी पूल बांधणे.

१९) गावे,शहरे व नगरांमधील झोपडपट्टी क्षेत्रातील,अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती क्षेत्रातील घरांकरीता वीज,पाणी,रस्ता,सार्वजनिक शौचालय इ.नागरी सुविधांची तरतूद करणे. तसेच झोपडपट्टी क्षेत्राकरीता अथवा कामगारांच्या कार्यशाळेकरीता (शेड) पडवीची तरतूद करणे .

२०) आदिवासी क्षेत्रात आश्रमशाळा बांधणे.

२१) सार्वजनिक परिवहन बसेसच्या प्रवाश्यांकरीता बस थांबा / शेड बांधणे.

२२) गुरांचा दवाखाना, कृत्रीम गर्भधारणा केंद्र आणि प्रजनन केंद्राची इमारती बांधणे.

२३) सरकारी दवाखान्याकरीता क्ष-किरण यंत्र, रुग्णवाहिका यासारख्या सुविधा व दवाखान्यातील इतर यंत्रे खरेदी करणे. तसेच सरकारी / पंचायत समिती संस्थांकडून आदिवासी क्षेत्रातील फिरत्या दवाखान्यांकरीता व्यवस्था करणे. रुग्णवाहिकाची सुविधा रेडक्रॉस, रामकृष्ण मिशन सारख्या प्रतिष्ठीत सेवा संस्थांना प्रदान करणे.

२४) इलेक्ट्रॉनिक प्रकल्प.

१) माध्यमिक शाळा / विद्यालयांमध्ये संगणक

२) सूचना किंवा माहितीचा फुटपाथ

३) माध्यमिक शाळांमध्ये हॅम क्लब (Ham Club)

४) नागरिकांकरीता बँड रेडिओ

५) ग्रंथसूची डाटा बेस प्रकल्प

२५) कर्मचारी विरहीत रेल्वे ओलांडणीच्या ठिकाणी समतल ओलांडणीचे बांधकाम करणे.

२६) सरकारी, सरकारी अनुदानित आणि विना अनुदानित परंतु शासन मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्थाना दृक-श्राव्य साधन सामुग्री खरेदी करणे. अर्थात तिथे त्या साधनसामुग्री ठेवण्याची योग्य व्यवस्था व सुरक्षा व्यवस्था असली पाहिजे.

२७) स्थानिक संस्थांसाठी मलनिस्सारण व्यवस्था खरेदी करणे.

२८) चक्रीवादळ व पूर प्रभावित क्षेत्राकरीता मोटरबोट खरेदी करणे.

२९) गुरांची देखभाल/ कल्याणकारी कार्य जसे इमारती व आश्रयस्थाने बांधणे, रुग्णवाहिका, आरोग्य तपासणीची उपकरणे यांची तरतूद व मूलभूत सोयीसुविधांचा विकास जसे पिण्याचे पाणी, सांडपाण्याची निस्सारण व्यवस्था इ. करीता तरतूद करणे.

* * *

२.१० गतिरोधक

२.१०.१ राष्ट्रीय महामार्ग :-

राष्ट्रीय महामार्गावरील गतिरोधकांबाबत खालील प्रमाणे नियम आहेत.

१) राष्ट्रीय महामार्गावर गतिरोधक नसावेत.

२) मुख्य अभियंताच्या मान्यतेनंतर अत्यंत आवश्यक ठिकाणी रम्बलींग स्ट्रीप बसविता येतील त्याची मानके खालील प्रमाणे आहेत.

अ) ३० से.मी.रुंदीच्या व २५ मी.मी.उंचीच्या फक्त ३ च स्ट्रीप १ मीटर अंतरावर असाव्यात.

ब) सदर स्ट्रीप पूर्ण धावपट्टीवर साईट पट्टीवरही येतील एवढया लांब असाव्यात.

क) रम्बलींग स्ट्रीपच्या आधी दोन्ही बाजूस 'पुढे रम्बलींग स्ट्रीप आहेत' अशा व 'इथे रंबलिंग स्ट्रीप आहेत' अशा आशयाचे सूचना फलक लावावेत.

२.१०.२ राज्यमार्ग व त्या खालील दर्जाचे रस्ते :-

शासनाचे परिपत्रक दि.७/५/२००५ नुसार मानका प्रमाणे नसलेले सर्व गतिरोधक हटविणे व आवश्यक तेथे फक्त गतिरोधक समितीने मान्य केलेले व आयआरसी-९९-१९८८ चे मानकाप्रमाणे असेलेले गतिरोधक बसविणे अभिप्रेत आहे.

अ) नव्याने गतिरोधक बसविणे :-

गतिरोधकांबाबत जिल्हा स्तरावर सर्व प्रकारच्या रस्त्यांसाठी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक व संबधित कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग यांची समिती असते. या समितीच्या शिफारशीनंतर गतिरोधकांस खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येते.

i) राष्ट्रीय महामार्ग व राज्यमार्गावरील गतिरोधकासाठी- मुख्य अभियंता

ii) प्रमुख जिल्हा मार्गावरील गतिरोधकांसाठी - अधीक्षक अभियंता व

iii) इतर जिल्हा मार्ग व ग्रामिण मार्गासाठी जिल्हा गतिरोधक समिती

ब) अस्तित्वातील गतिरोधक :-

अस्तित्वातील सर्व गतिरोधक / रम्बलींग स्ट्रिप्सचा कार्यकारी अभियंतानी आढावा घेऊन अनावश्यक गतिरोधक / रम्बलींग स्ट्रीप्स काढून टाकणे आवश्यक गतिरोधकांचे बाबतीत पुढील प्रमाणे कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

i) रस्त्यांच्या संगमस्थानाजवळ (जंक्शनजवळ) गतिरोधक / रम्बलींग स्ट्रीप्स बसवितांना ते मुख्य रस्त्याऐवजी दुय्यम रस्त्यावर बसवावेत व मुख्य रस्त्यावर रोड मार्किंग पट्टे व योग्य ते सूचना फलक लावावेत.

ii) गतिरोधक हे (IRC-11-1988) ९९-१९८८ मधील नमुनाचित्र (१) नुसार ३.७० मी रुंदीचे (जे १७ मी.त्रिज्येला वर्तुळाकार केलेले आहे) ०.१० मी उंच व डांबरी / सिमेंट कॉक्रीट धावपट्टी तसेच बाजूपट्टयांच्या शेवटपर्यन्त येईल एवढे लांब असावेत.

iii) रम्बलींग स्ट्रीप्स शक्यतो एका ठिकाणी तीनच असावेत जे एकमेकांपासून १ मीटर अंतरावर असतील, त्यांची रुंदी ३० से.मी., उंची २५ मी.मी.व लांबी साईट पट्टयांच्या शेवटपर्यन्त येईल एवढी असावी.

* * *



(a) LONGITUDINAL SECTION



(b) TRANSVERSE SECTION

Fig. 1. Recommended specification for rounded hump type of speed breaker for general traffic at preferred crossing speed 25 km/h



(a) LONGITUDINAL SECTION

(b) TRANSVERSE SECTION IS SAME AS GIVEN IN FIG. 1

Fig. 2. Recommended specification for hump type of speed breaker for heavy truck and bus traffic at preferred crossing speed 25 km/h



Fig. 3. Recommended placement of hump/humps in mid-block section, hump marking in chequered pattern and sign board locations



Fig. 4. Speed breakers at T-intersection or railway crossing

IRC : 99-1988



Fig. 5. Plan of speed breakers on approach to a sharp curve



SIGN DETAILS :

Lateral Placement Left

0.60 m on kerbed roads

2.3 m on unkerbed roads

Mounting Height

2.0 m on kerbed roads

1.5 m on unkerbed roads

Use reflective paint or strip

Size of △ 60 cm or 90 cm (standard)

Red strip width 4.5 cm or 7.0 cm

Post (8 cm × 8 cm × 0.8 cm)

T—Iron to be painted white and black in alternate 25 cm bands

Fig. 6. Recommended hump warning sign with definition plate

२.११ पथकिनारवर्ती नियम

२.११.१ रस्त्याच्या बाजुने होणा-या वसाहतींमुळे वाहनांच्या वाहतुकीस अडथळे निर्माण होतात. वसाहतीची ही अनिर्बंध वाढ रोखण्यासाठी पथकिनारवर्ती नियम तयार करण्यात आलेले आहेत. या पथकिनारवर्ती नियमात 'इमारत रेषा' व 'नियंत्रण रेषा' किती अंतरावर असाव्यात हे मुंबई महामार्ग अधिनियम १९५५, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६९, केंद्र शासनाच्या भूपृष्ठ मंत्रालयाचे दि.१३/१/७७ च्या परिपत्रकातील मार्गदर्शक सूचना व स्टँडर्ड बिल्डींग अँड डेव्हलपमेंट रुल्स फॅार म्युनिसिपल कौन्सिल ए/बी/सी मध्ये नमुद करण्यात आलेले आहे.

२.११.२ प्रस्तुत नियमांचे अधीन राहुनच रस्त्यालगतचे बांधकामास्तव 'ना हरकत दाखले' द्यावयाचे असतात. त्यासाठी इमारत रेषा व नियंत्रण रेषा निश्चित करण्यात आल्या असून त्यांची मानके खालील प्रमाणे आहेत.

इमारत रेषा व नियंत्रण रेषा यांची व्याख्या सा.बां.खात्याच्या हस्त पुस्तिकेच्या पुरवणी भाग - १ (१९६३ ची आवृत्ती) मध्ये दिली आहे. ती खालील प्रमाणे.

१) इमारत रेषा :-

ही अशी एक काल्पनिक रेषा आहे की, रस्त्याच्या मध्यापासून ठराविक अंतरापलीकडे सर्वसाधारण बांधकामे करता येतील.

२) नियंत्रण रेषा :-

ही इमारत रेषे पलीकडील अशी एक काल्पनिक रेषा आहे जिच्या पलीकडे विशेष इमारती जशा फॅक्टरी (कारखाने) व्यापारी तत्वावरील गोडाऊन, सिनेमा इ.गर्दी होईल अशी बांधकामे करता येतील.

३) नागरी व नगरेतर भाग :

"नागरी क्षेत्र" याचा अर्थ , त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत करण्यात आलेल्या कोणत्याही महानगरपालिकेच्या किंवा नगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट केलेले क्षेत्र असा आहे. आणि 'नगरेतर क्षेत्र'या शब्द प्रयोगाचा अर्थ त्यानुसार लावला जाईल.

४) डोंगराळ भाग :-

डोंगराळ भागाची व्याख्या शासन नियोजन विभागाचे निर्णय , क्र.डोंविका/१०८९/ प्र.६६/योजना /१९/दि.२३/११/१९९० परिशिष्ट तीन प्रमाणे दिली आहे.

५) औद्योगिक भाग :-

'औद्योगिक भाग म्हणजे महाराष्ट्र शासनाने राजपत्राव्दारे औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित केलेले क्षेत्र'

६) रस्त्याचा मध्य :-

रस्ता हद्दीचा मध्य.

२.११.३ इमारत रेषा व नियंत्रण नियंत्रण रेषा यांची मानके खालील प्रमाणे आहेत.

अ. क्र.	रस्त्याचा दर्जा	इमारत रेषा		नियंत्रण रेषा (फॅक्टरी , सिनेमा हॉल, व्यापारी गोडाऊन , मार्केट इ. गर्दी होईल अशी ठिकाणे)	
		नागरी व औद्योगिक भाग	अनागरी भाग	नागरी व औद्योगिक भाग	अनागरी भाग
१	दुतमार्ग	रस्त्याच्या मध्यापासून ६० मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासून १५ मीटर यापैकी जास्त असेल ते	रस्त्याच्या मध्यापासून ६० मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासून १५ मीटर यापैकी जास्त असेल ते	रस्त्याच्या मध्यापासून ६० मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासून १५ मीटर यापैकी जास्त असेल ते	रस्त्याच्या मध्यापासून ६० मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासून १५ मीटर यापैकी जास्त असेल ते
२	राष्ट्रीय मार्ग	रस्त्याच्या हद्दीपासून ३ ते ६ मीटर	रस्त्याच्या मध्यापासून ४० मीटर	रस्त्याच्या मध्यापासुन ३७ मीटर	रस्त्याच्या मध्यापासुन ७५ मीटर
३	.राज्य महामार्ग व प्रमुख राज्य महामार्ग	रस्त्याच्या मध्यापासून २० मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासून ४.५ मी. यापैकी जास्त असेल ते	रस्त्याच्या मध्यापासून ४० मीटर	रस्त्याच्या मध्यापासून ३७ मीटर	रस्त्याच्या मध्यापासून ५० मीटर
४	.प्रमुख जिल्हा मार्ग	रस्त्याच्या मध्यापासून १५ मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासून ४.५ मी.यापैकी जास्त असेल ते	रस्त्याच्या मध्यापासून ३० मीटर	रस्त्याच्या मध्यापासून ३७ मीटर	रस्त्याच्या मध्यापासून ४७ मीटर
५	इतर जिल्हा मार्ग	रस्त्याच्या मध्यापासून १२ मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासून ४.५ मीटर यापैकी जास्त असेल ते	रस्त्याच्या मध्यापासून १५ मीटर	रस्त्याच्या मध्यापासुन १८ मीटर	रस्त्याच्या मध्यापासून ३० मीटर.
६	ग्रामीण मार्ग	रस्त्याच्या मध्यापासुन १० मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासून ३.०० मीटर यापैकी जास्त असेल ते	रस्त्याच्या मध्यापासून १२ मीटर	रस्त्याच्या मध्यापासून १४ मीटर	रस्त्याच्या मध्यापासून २५ मीटर.

राष्ट्रीय महामार्ग, प्रमुख राज्य महामार्ग व राज्य महामार्ग याकरिता शहराबाहेरुन वळण रस्ता घेण्यात आल्यानंतर हा वळण रस्ता नागरी / औद्योगिक किंवा अनागरी क्षेत्रात येत असला तरी त्यासाठी 'इमारत रेषा' वळण रस्त्याच्या मध्यापासून ४० मीटर अंतरावर मध्यापासून ७५ मीटर अंतरावर घेण्यात यावी.

संदर्भ :- १) शासन सा.बां.विभागाचा निर्णय क्र आरबीडी-१०८१ / ८७१ / रस्ते-७ दि.९ मार्च २००१.

२) शासन सा.बां.विभागाचा पूरक पत्र क्र आरबीडी-१००१ / ७२ / रस्ते-७ दि.२१/९/२००१.

३) शासन सा.बां.विभागाचा शुध्दीपत्रक क्र आरबीडी-१००१ / ७२ / रस्ते-७ दि.७/१/२००२.

४) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र डोंविका-१०८९/ प्र.क्र.६६ / योजना-१९ दि.२२/११/१९९०.

५) शासन सा.बां.विभागाचे पुरक पत्र क्र आरबीडी-२००४/प्र.क्र.२६/रस्ते-७ दि.७/७/२००५.

६) महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग यांचे पत्र क्र संकीर्ण-२००२ / अ.नौ-२९८ / प्र.क्र.२५८ /०३ / नावि-१२ दि.१०/६/२००४.

* * *

२.१२ रस्त्यावरील वाहनगणती

२.१२.१ राष्ट्रीय महामार्ग :

राष्ट्रीय महामार्गावरील वाहन गणती घेण्याबाबत यापूर्वी आयआरसी ९-१९७२ मध्ये दिलेल्या सूचना नुसार सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत घेण्यात येते. आता केंद्रशासनाचे नौकानयन रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाचे पत्र क्र.आरडब्ल्यु/एनएच-३३०४४/३९/२०००-एस ॲण्ड आर (आर) दि.१३ जुलै २००५ नुसार वाहन गणती केंद्र शासनाचे रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाचे परिपत्रक जा.क्र.एचएच-२६०११/१९९-पीएल दि.३१.१२.१९९९ मधील मार्गदर्शक तत्वे व विहीत नमुन्यात घेण्यात येते.

ही वाहनगणती प्रत्येक वर्षी दोनदा म्हणजे मे आणि डिसेंबर महिन्यात घेण्यात येते तिची महिती केंद्र शासनास व राज्य शासनासही सादर करावयाची असते.

२.१२.२ राज्यमार्ग व त्याखालील दर्जाचे रस्ते :

शासन सा.बा. विभागाचे पत्र क्र.वागअ/१०९४/सीआर-६२/नि.२/(सा.) दि.१७.११.९४ क्र..वागअ-१२१५/डिसेंबर९५/(८५)/नि.२/(सां.) दि.१० जानेवारी १९९६ व त्यातील संदर्भान्वये वाहन गणती सम वर्षात डिसेंबर मध्ये तर विषम वर्षात मे या महिन्यात ठरलेल्या मोजणी स्थानकांवर घ्यावयाची असून ती त्या महिन्याच्या तिस-या सोमवारी सकाळी ६.०० वाजता सुरु करुन अखंडपणे ७ दिवस सुरु ठेवावयाची आहे आणि पुढच्या म्हणजे चवथ्या सोमवारी सकाळी ६.०० वाजेपर्यंत संपवायची आहे.

* * *

२.१३ जोडरस्ता परवानगी

२.१३.१ राष्ट्रीय महामार्ग :-

केंद्र शासनाचे रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाचे पत्र क्र आरडब्ल्यु / एनएच-३३०२३/१९/९९-डीओ-३/दि.२५/९/२००३/१७/१०/२००३ व पत्र क्र आरडब्ल्यु/ एनएच ३३०४४/५ / २००४ - एस अँड आर (आर) दि.३१ मार्च २००५ मध्ये राष्ट्रीय महामार्गापासून पेट्रोल पंप / सर्व्हीस स्टेशनसह पेट्रोल पंप व विश्राम संकुले (Norms for the Access for fuel station, Service Station and Rest areas along National Highways) इ.करीता जोड रस्त्यास परवानगी देण्याबाबतची मानके व कार्यपध्दती विषद केली आहे.

राष्ट्रीय महामार्गालगत नवीन पेट्रोल पंप उभारणीच्या परवानगी साठीच्या कागदपत्रांची यादी, मंजूरीसाठीची तपासणी सूची व त्यासाठीची मानके यांची माहिती खाली दिलेली आहे

अ) राष्ट्रीय महामार्गालगत नविन पेट्रोल पंपाची उभारणी करण्याची परवानगी मिळण्यासाठी सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी

१.विहीत नमुन्यानुसार साक्षांकीत केलेली करारनाम्याची प्रत,

२.पेट्रोलपंपाच्या दोन्ही बाजूस १.५० कि.मी. लांबीपर्यंत राष्ट्रीय महामार्गाच्या मालकीच्या रस्त्याच्या रुंदीत येणारे खाजगी मिळकतीचे जोडरस्ते, अस्तित्वातील सार्वजनिक रस्ते व इतर सुधारणा दर्शविणारा स्थळदर्शक नकाशाची प्रमाणित प्रत.

३.नियोजित पेट्रोल पंपाचा सविस्तर तपशिल, जसे की, डिसिलरेशन ॲक्सीलरेशन लेन्स, सर्व्हीस रोड (आवश्यक असल्यास) बफर स्ट्रीप्स, इंधन पंप, कार्यालय, किओस्क(Kiosk), ल्युब्रिटोरियम, हवा व पाणी पुरवठा, स्वच्छता गृह व जलनिस्सारण इ. बाबी दर्शविणा-या चिन्ह व खुणांसह नकाशाची प्रमाणित प्रत.

४.राष्ट्रीय महामार्गाच्या बाजूने पेट्रोल पंपाचा समोरुन दिसणारा नकाशा (एलिव्हेशन), काटछेद नकाशा (क्रॉस सेक्शन) आणि पेट्रोल पंपाच्या जागेतील पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी देण्यात आलेला उतार, राष्ट्रीय महामार्गालगत पाणी न साचण्यासाठी केलेली उपाय योजना इ. दर्शविणारा नकाशा.

५. पेट्रोल पंपाचा जलनिस्सारण नकाशा

६. डिसिलरेशन लेन, सर्व्हिस रोड, व ॲक्सीलरेशन लेन यांच्यासाठी वापरण्यात येणा-या बांधकाम साहित्याचा सविस्तर तपशील.

७.नियोजीत पंपाची जागेची तपासणी अधिका-याने केलेल्या तपासणीचा निरिक्षण अहवाल व सर्व आवश्यक अटी नमुद केलेले प्रमाणपत्र

८.विशिष्ट कारणांसाठी सवलत मिळण्याची शिफारस आवश्यक असल्यास त्याचा कारणांसह सविस्तर खुलासा

९.राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून जेव्हा जेव्हा राष्ट्रीय महामार्गाच्या जागेचा वापर करण्यासाठी आकारण्यात आलेले शुल्क भरण्याबाबतचे अधिकारपत्र

१०. राष्ट्रीय महामार्गाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाने वेळोवेळी सूचविल्याप्रमाणे जोडरस्ता काढून टाकणे, दुरुस्ती करणे इ. बाबींसाठी येणारा खर्च तेलकंपनी यांनी स्वखर्चाने करावयाचे असल्याचे हमीपत्र.

११. सर्व अटी व शर्ती बाबत कार्यवाही करण्याची जबाबदारी तेल कंपनीची असल्याचे हमीपत्र.

ब) राष्ट्रीय महामार्गालगत उभारावयाच्या नविन पेट्रोल पंपासाठी घ्यावयाच्या मंजुरीसाठी तपासणी सूची.

---

१)सर्वसाधारण माहिती

१.१) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक - --

१.२) राज्य - --

१.३) स्थान - --

१.३.१) कि.मी.मधील साखळी क्रमांक - --

१.३.२) राष्ट्रीय महामार्गाची बाजु (डाव्या किंवा उजव्या बाजुने वाढत जाणारे साखळी क्रमांक/किमी) - --

१.४) राष्ट्रीय महामार्गाच्या प्राधिकरणाचे नांव- (NAHI/PWD/BRO) --

१.५) कार्यकारी अभियंता (किंवा समकक्ष) - पत्ता --

१.६) तेल कंपनीचे नांव (लागू असल्यास) - --

१.७) पेट्रोलपंपाच्या मालकाचे नांव व पत्ता. - --

क) इंधन आऊटलेटसाठी मानके

अ. क.	बाब	जागे- -वरची मोजमापे	भूतल-परिवहन मंत्रालयाचे निकष	भूतल परिवहन मंत्रालया च्या निकषांचे पालन होते किंवा नाही
१	रस्त्यांच्या संगमस्थानापासूनचे अंतर			
	१.१)बिगर शहरी (ग्रामीण) लांबी १.१.१)सपाट व कमी उंचसखल भूप्रदेश- I)संगमस्थानाचे अंतर रा.म./रा.मा. प्रजिमा		१००० मी.	होय/ नाही
	II) ग्रामीण मार्गाच्या संगमस्थाना पासूनचे अंतर ३.५० मी किंवा जास्त रुंदीच्या धावपट्‌टीचे III) ग्रामीण मार्ग व इतर मातीचे रस्ते यांच्या संगमस्थाना पासूनचे अंतर ३.५० मीटर पेक्षा कमी रुंदीच्या धावपट्‌टीचे १.१.२)टेकडया/डोंगराळ/भुप्रदेश I)संगमस्थानाचे अंतर रा.म./ रा.मा. प्रजिमा II)इतर मार्ग व रस्ते यांच्या संगमस्थाना पासूनचे अंतर		३०० मी. १०० मी. ३०० मी. १०० मी.	होय/ नाही होय/ नाही होय/ नाही होय/ नाही
	१.२)शहरी लांबी १.२.१) सपाट व कमी उंचसखल भूप्रदेश- अ) शहरी भाग- (२०,००० पेक्षा जास्त व एक लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेला)			

	i) कोणतेही रस्ते ३.५० मी रुंद व त्यापेक्षा जास्त रुंदीच्या धावपट्टीचे रस्त्यांचे संगमस्थानापासूनचे अंतर ii)३.५० मी धावपट्टीपेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यांचे संगम स्थानापासूनचे अंतर ब) शहरी भाग- एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेला i)इतर कोणत्याही दर्जाच्या रस्त्याचे संगमस्थाना पासूनचे अंतर (धावपट्टीची रुंदी विचारात न घेता) १.२.२) टेकडया/डोंगराळ भूप्रदेश ii)इतर कोणत्याही दर्जाच्या रस्त्याचे संगमस्थानापासूनचे अंतर(धावपट्टीची रुंदी विचारात न घेता) विश्रामस्थळाचा भाग आहे काय ? जवळच्या पेट्रोल पंपा पासूनचे अंतर अ) सपाट व कमी उंचसखल भूप्रदेशातील बिगर शहरी भाग.		३०० मी. ३०० मी. १००मी. १००मी. --	होय/ नाही होय/ नाही होय/ नाही होय/ नाही होय/ नाही
२.	i)धावपट्टीस दुभाजक नसलेले ii)धावपट्टीस दुभाजक असलेले		कमीत कमी ३००मी. कमीत कमी १००० मी.	होय/ नाही होय/ नाही
३.	ब) डोंगराळ प्रदेश व शहरी लांबी		कमीत कमी ३००मी.	होय/ नाही
४.	तपासणी नाका / जकात नाका पासूनचे अंतर		कमीत कमी १००० मी.	होय/ नाही
५.	७.० मी / ५.५० मी रुंदीच्या सेवा मार्ग / जोडरस्त्याची तरतूद असणे		इंधन स्थळांच्या समुहासाठी आवश्यक	होय/ नाही
६.	राष्ट्रीय महामार्गाला असलेला चढ / उताराची टक्केवारी		जास्तीत जास्त ५ टक्के	होय / नाही
७.	पेट्रोल पंपाचे आवार / सेवाभागाचा जलनिस्सारणासाठीचा उतार		कमीत कमी २ टक्के	होय/ नाही
८.	पुढील भागाची रुंदी		कमीत कमी ३५ मी/२० मी	होय / नाही
९.	बफर स्ट्रीपची लांबी		कमीत कमी १२ मी.	होय / नाही
१०.	रस्त्याच्या हद्दीत वाढणारी बफरस्ट्रीपची रुंदी		कमीत कमी ३ मी.	होय/ नाही
११.	अस्तित्वातील बफर स्ट्रीपवर मानकाप्रमाणे व मान्यताप्राप्त ओळख		मानकाप्रमाणे व मान्यता असलेल्या ओळख चिन्ह	होय/ नाही

	चिन्ह असलेला खांब आहे का ?		असलेल्या खांबा व्यतिरिक्त कोणतेही बांधकाम व जाहीरात फलक लावण्यास मनाई आहे	
१२.	बफरस्ट्रीमच्या कर्बची उंची		कमीत कमी २७५ मीमी	होय/ नाही
१३.	बफरस्ट्रीपची बाहेरची बाजू व रस्त्याची बाहेरची बाजू यामधील जागा हिरवळ व २७५ मी.मी.ची उंची बांधून इतर कोणतेही बांधकाम न करता उंच केली आहे का ?		बफरस्ट्रीपच्या समोर कोणतेही बांधकाम अथवा जाहीरात फलक अथवा वहान उभे करण्यासाठीची जागा ठेवण्यास मनाई आहे	होय/ नाही
१४	वळणावरील वळणाची त्रिज्या		कमीत कमी १३ मी.	होय / नाही
१५	न वळणा-या वळणाची त्रिज्या		कमीत कमी १.५ मी जास्तीत जास्त ३ मी.	होय / नाही
१६	पेट्रोल पंपाकडे जाणा-या पोहोच मार्गाचा कमीत कमी खालचा उतार		कमीत कमी २ टक्के	होय /नाही
१७	रस्त्याची कडा आणि बफर स्ट्रीपची कडा यांच्या पासूनच्या एलिव्हेशन मधील फरक		कमीत कमी १५ सेमी	होय /नाही
१८	आयआरसी-एसपी-१३ नुसार डिझाईन केलेल्या मोरीची तरतूद असणे		कमीत कमी १ मी व्यासाच्या पाईपची मोरी कमीत कमी १ मी गाळयांच्या स्लॅबची मोरी	होय / नाही
१९	पेट्रोल पंपाच्या आवारात जलनिस्सारणाच्या उपायांची योग्य तरतूद असणे		राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे समाधान होईल असे जलनिस्सारणाचे उपाय दर्शविणारा नकाशा सादर करणे.	होय/ नाही
२०	नकाशानुसार योग्य चिन्ह व खुणांची तरतूद असणे		नकाशात दर्शविल्या नुसार कमीत कमी गरजा भागणे	होय/ नाही

निकषांचे पालन होत नसल्यास सविस्तर कारणमिमांसा देणे आवश्यक आहे अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. सर्व प्रकारच्या प्रकरणामध्ये वरीलप्रमाणे आधारभूत कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे अथवा सदरचे प्रकरण नाकारण्यात येते.

२.१३.२ राज्य मार्ग व त्याखालील दर्जाचे सर्व रस्ते :-

राज्य मार्ग व त्याखालील दर्जाच्या रस्त्यांचे बाबतीत सर्वसाधारणपणे हीच कार्यपध्दती अंमलात आणावयाची असली तरी या दर्जाच्या रस्त्यांपासूनचे जोड रस्त्यांना परवानगीचे प्रस्तावास महाराष्ट्र शासनाची मान्यता आवश्यक असते.

तत्संबंधीची मानके खालील प्रमाणे आहेत.

१) अर्जदाराने कार्यकारी अभियंता, सा.बां./ जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांचेकडे अर्ज सादर करावयाचा आहे.

२) अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची यादी :-

- ज्या जागेसाठी जोडरस्ता आवश्यक आहे त्या जागेचा ७/१२ उतारा.
- जोडरस्ता आवश्यक असलेल्या जागेचा मोजणीचा नकाशा.
- प्रस्तुत जागा ज्या गावांचा / शहरांचा भाग आहे त्या गावांचा / शहराचा विकास आराखडा अथवा त्याचा भाग.
- प्रस्तुत ठिकाण कोठे येते हे स्पष्ट होण्यासाठी तालुका / जिल्हा नकाशावर प्रस्तुत ठिकाण नमुद करुन दाखविणे.
- प्रस्तुत जागेचा विकास आराखडा (डेव्हलपमेंट प्लॅन) ज्यात तेथे प्रस्तावित सर्व गोष्टी नमुद असतील त्याबरोबर इमारत व नियंत्रण रेषाही नमुद केलेल्या असून रस्ता मध्यापासूनची सर्व अंतरे व रस्त्याखालील जमिनीची हद्द ही नमुद केलेली असेल व असा नकाशा संबंधीतांनी प्रमाणित केलेला असावा.
- प्रस्तुत जागेचा काटछेद / लंबछेद ज्यात रस्त्याची धावपट्टीची, बाजुपट्टीची व प्रस्तुत जागेतील तलांक (लेव्हल) नमुद केलेल्या असतील जेणे करुन रस्त्याच्या व प्रस्तावित जागेच्या उंचीतील फरक कळू शकेल. तसेच त्यात प्रस्तावित जोडरस्ता व प्रस्तावित जागेतील काटछेद आवश्यक तरतुदीसह दिलेले असावे.
- प्रस्तुत जागेचा ड्रेनेज प्लॅन ज्यात प्रस्तुत जागेतील पावसाचे पाण्याची व सांडपाण्याची विल्हेवाट कशी लावली आहे हे स्पष्ट होईल.
- प्रस्तुत जागेचा स्थलदर्शक नकाशा (Location Plan) ज्यात प्रस्तुत जागेच्या सभोवतीच्या १.५०कि.मी. पर्यतची माहिती जसे रस्त्याची संगमस्थाने (Intersection), अस्तित्वातील पेट्रोलपंप,ढाबे,हॅाटेल्स, खाजगी मालमत्तेकडे जाणारे रस्ते व रस्ते विकास आराखडातील रस्ते त्याचे क्रमांक व धावपट्टीच्या रुंदी इ.नमुद करुन दाखविलेले असावे.
- जिल्हाधिकारी यांचेकडील प्रस्तुत जागा बिनशेतीकडे वर्ग केल्याबद्दलचा दाखला (ज्यात बिनशेतीकरणाचे कारण नमुद केलेले असून-जसे निवासी कारणासाठी, वाणिज्य कारणासाठी इ.)
- अर्जदार एखाद्या कंपनी अथवा संस्थेचा प्रतिनिधी असल्यास त्याचे अधिकारपत्र.
- प्रस्तुत जागेत पेट्रोलियम पदार्थांची विक्री / साठा करावयाचा असल्यास केंद्रीय स्फोटके खात्याचा (Departments Explosives) दाखला जोडावा.
- अर्जदारास खालील प्रमाणे रु.२०/- च्या महसूली मुद्रांकावर हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.
- अर्जदार प्रस्तुत जागा अथवा तिचा भाग शासनास आवश्यकता वाटल्यास किंवा

त्यात काही बदल /सुधारणा करावयाच्या असल्यास विनामूल्य स्वखर्चाने जागा मोकळी करुन देण्यास तयार असल्याबद्दलचे तसेच त्याचे काही नुकसान झाल्यास त्या बद्दलची कोणत्याही प्रकारची भरपाई मागणार नाही व तसा न्यायालयात दावाही दाखल करणार नाही. याबद्दलच्या स्पष्ट हमी सह हमीपत्र

i) प्रस्तुत प्रकरणी शासकीय जागेचे शासन जे भाडे ठरवून देईल ते त्यास मान्य असेल व ते तो प्रत्येक वर्षी आगाऊ भरेल या बद्दलचे हमीपत्र.

ii) प्रस्तुत प्रकरणी शासनाचे प्रचलित तसेच वेळोवेळी प्रसिध्द होणारे नियम अर्जदारावर बंधनकारक राहतील याबद्दलचे हमीपत्र.

iii) प्रस्तावित जोडरस्ता त्यावरील मो-या , कॅचवॅाटर ड्रेन व शासकीय जागेतील पाण्याच्या विल्हेवाटीसाठी आवश्यक बांधीव गटर तो स्वखर्चाने संबंधीत का.अ.यांना मान्य होईल अशा प्रकारे परंतु स्वखर्चाने बांधुन द्यावयास तयार असल्याबद्दलचे हमीपत्र.

iv) प्रस्तुत प्रस्ताव राष्ट्रीय महामार्गालगतचा असल्यास अर्जदार केंद्र शासनाकडे एकरकमी जागा भाडे / फी रु.१.०० लक्ष एवढी अथवा शासन ठरवेल ती रक्कम भरणेस तयार असल्याबद्दलचे हमीपत्र.

v)अर्जदार केंद्र शासनाचे परिपत्रक दि.१७/१०/२००३ च्या परिशिष्ट-१ (Appendix I) नुसार सर्व मानकांची पूर्तता करणेसाठी वचनबध्द असल्या बद्दलचे हमीपत्र.

- प्रस्तुत प्रकरणी संबंधीत कार्यकारी अभियंत्यांचे नांवे रु.५.०० लक्ष एवढया किंमतीची १ वर्ष मुदतीची बँक गॅरंटी
- अर्जदारास केंद्र शासनाने केंद्र शासनाचे परिपत्रक दि.१७/१०/२००३ परिशिष्ट - ३ (Annex III) मध्ये नमुद केल्याप्रमाणे रु.१००/- च्या महसुली मुद्रांकावर करारनामा करुन सोबत द्यावा.
- संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी प्रस्तुत जागेचे निरिक्षण करुन प्रस्तुत प्रकरणी ‘सर्व मानकांची पूर्तता होत असल्याबद्दलचा निरिक्षण अहवाल’ सादर करावा.
- प्रस्तुत प्रकरणी एखाद्या नियमात सुट हवी असल्यास तत्संबंधीची कारणे नमुद करुन संबंधितांची तत्संबंधीची शिफारस आवश्यक असते.
- केंद्र शासनाचे परिपत्रक दि.१७/१०/२००३ च्या परिशिष्ट - २ अन्वये विहित तपासणी सूची ज्यात सर्व मानके नमुद केलेले आहेत ती योग्यरित्या भरुन अर्जदार तसेच खात्याचे संबंधीत अधिका-यांचे स्वाक्षरी / नावांनिशी सादर करणे आवश्यक असते.

* * *

२.१४ पाईपलाईन क्रॉसिंग

सा.बां.विभागाच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यालगत व्यापारी केंद्र निवासी संकुले , कारखाने इत्यादीची दिवसेंदिवस वाढ होत आहे. अशा व्यापारी केंद्रे निवासी संकुले , कारखाने यांच्या उपयोगासाठी मुख्य रस्त्याखालील / रस्त्यालगत जलवाहिनी / दुरध्वनी वाहिनी / विद्युत वाहिनी इत्यादी टाकण्यासाठी प्रस्ताव येतात. अर्जाच्या छाननीनंतर प्रस्ताव योग्य आढळुन आल्यास अर्जदार व्यक्ती / संस्था यांना कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग / जिल्हा परिषद (बांधकाम) विभागामार्फत परवानगी देण्यात येते. परवानगी मिळाल्यानंतर विहित केलेल्या मसुद्याप्रमाणे करारनामा करणे आवश्यक आहे.

वरील संबंधी आवश्यक असलेले कागदपत्र , अटी व सर्वसाधारण कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहेत.

२.१४.१ अर्ज कसा व कोणास करावा ?

राष्ट्रीय महामार्गालगत असेल तर कार्यकारी अभियंता संबंधीत राष्ट्रीय महामार्ग विभाग, राज्यरस्ते - प्रमुख राज्य मार्ग / राज्यमार्ग / प्रजिमा / इजिमा / ग्रामा लगत असेल तर कार्यकारी अभियंता.सा.बां.विभाग / जिल्हा परिषद , बांधकाम विभाग

२.१४.२ अर्जासोबत कोणकोणते कागदपत्र जोडावेत?

१) जमिनीची मालकी दाखविणारा महसुल विभागाचा ७/१२ चा उतारा.

२) तालुका निरिक्षक तथा भूमिअभिलेख यांचेकडून संबंधीत जमिनीचे नकाशे.

३) संबंधीत महामार्गावर ज्या ठिकाणी सेवावाहिनी ओलांडते ती व्यवस्था व संबंधीत जमिन दाखविणारा नकाशा.

४) संबंधीत भागासाठी नगररचनाकार यांनी तयार केलेला विकास आराखडा / नकाशा.

२.१४.३ अर्जासोबत भरावयाचे शुल्क

अर्जासोबत सर्वसामान्य नागरिक/शेतकरी यांच्या पिण्याच्या पाण्याच्या/शेतीसाठीच्या/ ड्रेनेज लाईन यांच्या रस्ते ओलांडणीसाठी (रोड क्रॅासिंग) रस्ता पूर्ववत करण्यात येणा-या रक्कमेचे दर संपूर्ण राज्यासाठी पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहेत.

अ.क्र.	रस्त्याचा प्रकार	राष्ट्रीय महामार्ग / राज्यमार्ग / शहरातील रस्ते चराच्या लांबीसाठी (रु.प्रती मीटर)	इतर रस्ते (रु.प्रती मीटर) चराच्या लांबीसाठी.
१.	डांबरी रस्ता	१२००/-	१०००/-
२	खडीचा रस्ता	६००/-	५००/-
३	मुरुम साईडपट्टया	२५०/-	२५०/-
४	रस्त्याच्या बाजुची जमिन	६०/-	६०/-
५	टाईल्स लावलेले प्रिकास्ट पेव्हड ब्लॉक लागलेले पदपथ) (फुटपाथ)	१२००/-	१२००/-

सदरहु दर दि.१/४/२००० पासून अमंलात आहेत. सदरहु रक्कम महसूली जमा '००५९ सार्वजनिक बांधकाम' या शिर्षाखाली जमा करण्यात येते.

परवानगी प्राप्त झाल्यानंतर अर्जदारांनी रस्ता खोदुन पाईप लाईन टाकताना पूर्ण दक्षता घ्यावी व वाहतुकीस अडथळा / गैरसोय होणार नाही. आणि अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदारावर राहील. अशी हमी अर्जदाराकडून अर्जासोबत घ्यावी.

याशिवाय महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महानगरपालिका / नगरपालिका यांच्या जलवाहिन्या अथवा कालव्याच्या चा-या इ.चे रस्ते ओलांडणीचे प्रस्ताव असल्यास प्रत्यक्ष मोजमापावर आधारीत अंदाजपत्रकाप्रमाणे रक्कम संबंधित कार्यकारी अभियंतांचे कार्यालयात आगाऊ जमा करावयाची आहे.

२.१४.४ अर्जावर निर्णय कोण घेणार ?

१) राष्ट्रीय महामार्ग - मुख्य अभियंता, सा.बां.विभाग, (परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली यांचे संमतीने)

शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-०६९६/प्र.क्र.१५७/रस्ते-१ दि.२३.२.२००३

२) कॉंक्रीट रस्ता व पदपथ - मुख्य अभियंता

३) डांबरी रस्ता व पदपथ - कार्यकारी अभियंता

४) मुरुम, माती व खडीचा रस्ता - उप अभियंता

- निर्णय घेण्यासाठी लागणारा अपेक्षित कालावधी - सुमारे तीन महिने आहे.
- परवानगी मिळाल्यानंतर अर्जदारांनी शासनासोबत करावयाचे करारपत्र व सोबत भरावयाची अनामत रक्कम / शुल्क बाबत संबंधीत कार्यकारी अभियंता यांचेकडे संपर्क साधण्यात यावा.
- संबंधीत नियमांची पुस्तिका मिळण्याचे / चौकशी करण्याचे ठिकाण कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग / जिल्हा परिषद , बांधकाम विभाग यांचे कार्यालय.

२.१४.५ पाईपलाईन टाकताना घ्यावयाची दक्षता

पाईपलाईन रस्त्याच्या पृष्ठभागाच्या कमीत कमी ६० से.मी. खोलीवर असाव्यात. (राष्ट्रीय महामार्गाबाबत भूतल परिवहन मंत्रालय नवी दिल्ली यांचे परिपत्रक क्र.एनएच-३/पी/६६/७६ दि.१९ नोव्हेंबर १९७६ चे अनुपालन करावे.)

रस्त्याखाली जलवाहीनी टाकण्यापुर्वी त्याच्या पेक्षा मोठया व्यासाचा (कमीत कमी १५ सेमी व्यासाचा कॉक्रीट अगर आवश्यक व्यासाचा स्टील) एनकेसींग पाईप टाकावा.

खोदलेल्या चरात पाईप व एनकेसींग पाईप टाकल्यानंतर तो चर मोठया अगर लहान खडीनेच भरण्यात यावा. त्यात माती वापरण्यात येऊ नये.

* * *

२.१५ रस्त्याच्या कडेला लावलेल्या झाडावरील फळांचा लिलाव

शासनाने रस्त्याच्या बाजूला त्याचप्रमाणे इमारतींच्या आवारात मोठया प्रमाणावर वृक्षलागवड केली आहे. अशा झाडांपैकी काही ठिकाणी फळझाडे उदा.आंबा, फणस,चिंच इत्यादी लावण्यांत आली आहेत. शासनाचे महसूली उत्पन्न वाढविण्याचे दृष्टीने प्रत्येक वर्षी अशा फळांचा लिलाव करण्यात येतो. या लिलावाची कार्यपध्दती सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे आहे :-

१. फळांच्या लिलावाबाबत जाहीर सूचना स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यांत येतात. त्याचप्रमाणे या जाहीर सूचना ज्याठिकाणी लिलाव होणार अशा ठिकाणच्या जवळपासच्या गावांच्या ग्रामपंचायतीमध्ये, उपविभागीय कार्यालयात लावण्यांत येतात.

२. लिलावाची वेळ सर्वसाधारणपणे अशी निवडण्यांत येते की, आसपासच्या गावातले गांवकरी त्याठिकाणी पोहोचू शकतील.

३. जाहीर सूचना पुरेशी आधी करण्यांत येते.

४. लिलावाच्या अटी व शर्ती या लिलावाचे जागी वाचून दाखविण्यांत येतात.

५. प्रथम सर्व इच्छूक बोलीदारांच्या सहया अथवा अंगठयांचे ठसे घेण्यात येतात. सही किंवा अंगठा असल्याशिवाय कोणालाही बोली बोलता येत नाही.

६. लिलावाच्या अटी वा शर्तीबाबत कोणाला काही शंका असल्यास लिलाव सुरु होण्यापूर्वी त्या शंकांचे निरसन करुन घेण्यांत यावे.

७. लिलाव सुरु होण्यापूर्वी इच्छूक बोलीदारांना जाहीर सूचनेत दिल्याप्रमाणे अनामत रक्कम भरावी लागते. अनामत रक्कम घेण्यामागील उद्देश म्हणजे ज्या व्यक्तींना लिलावात खरोखर भाग ध्यावयाचा आहे त्यांनीच भाग घ्यावा हा आहे. ही अनामत रक्कम लिलाव झाल्यानंतर, ज्या व्यक्तींच्या नांवे लिलाव मंजुर झाला असेल ती व्यक्ती वगळता, इतरांना परत करण्यांत येते.

८. जर कार्यकारी अभियंता यांना सर्वोच्च बोली ही अपेक्षेपेक्षा कमी वाटत असेल तर ते ती नाकारु शकतील व नंतर पुन्हा लिलाव करु शकतील.

९. जास्तीत जास्त बोली बोलणाऱ्या व्यक्तीस लिलावाची रक्कम जागेवरच ताबडतोब भरावी लागते. जर ती व्यक्ती अशी रक्कम भरण्यास असमर्थ ठरली तर त्या व्यक्तींची अनामत रक्कम जप्त करण्यांत येते व फेर लिलाव करण्यांत येतो.

* * *

३.० इमारती

१. **शासनाच्या अनुदानातुन विविध शासकीय विभागांची ते स्थानिक विकास संस्थांची वास्तुशास्त्रा मार्फत करणेत येणारी कामे** : खाजगी वास्तुशास्त्रज्ञा मार्फत विविध कामे कणेत येतात. त्याची अंदाजपत्रके तयार करुन त्यांना सा.बां. विभागामार्फत तांत्रिक मान्यता देणेत येते. सदर तांत्रिक मान्यतेसाठी शासनाकडून आवश्यक ती तपासणी फी आकारली जाते. सदर फी शासनाच्या महसुलात जमा करणेत येते (Revenue Credits)

२. इमारती खाजगीकरण : शासनाच्या विविध विभागांच्या ताब्यातील व्यापारीदृष्टया महत्वाच्या जमिनीवर खाजगी उद्योजकांचे माध्यामातुन जमिनी विकसीत करुन शासकीय कार्यालयासाठी जागा विकसीत करणे तसेच जमिनीची किंमत जास्त असल्यास अवश्यकतेनुसार इमारती बांधून झालेवर उर्वरित रक्कम (upfrontvalue) शासनास महसूल जमा करणेत येतो (Revenue Credits)

३. शासकीय इमारतींची संलग्न कामे :

अ) शासकीय इमारतीच्या परिसरात पडणारा पाऊस त्याच जमिनीत जिरविणे त्याव्दारे पाणी वाचविणे (Green Building)

ब) शासकीय इमारतींना सोलर हिटर्स वापरुन मोठया प्रमाणावर उर्जाबचत करणे.

४.   ३.१ इमारतींची बांधकामे

सा.बां.विभागाची तसेच अन्य विभागाची उदा.न्यायदान,पोलीस,महसूल,आरोग्य इत्यादी विभागाची बांधकामे सुध्दा सा.बां.विभागामार्फत केली जातात. ती प्रामुख्याने अर्थसंकल्पातील कामे, ठेव अशंदान कामे, लहान मुळ कामे व दुरुस्तीची कामे अशा प्रकारात मोडतात.

३.१.१ अर्थसंकल्पीय कामे :-

सदरच्या कामांची मागणी उपभोक्ता खात्याच्या सक्षम अधिका-यांनी सा.बां.खात्याकडे केलेली असते व त्यास अनुसरुन कामाची ढोबळ नकाशे व अंदाजपत्रके सा.बां.खात्यामार्फत शासनास सादर करण्यात येतात. कामांस संबधित विभागाकडून शासन स्तरावर प्रशासकीय मंजुरी देण्यात येते व त्यानंतर कामे शासनाच्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात येतात सदर कामे निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्यात येतात.

३.१.२ ठेव अंशदान कामे :-

उपभोक्ता खात्याकडे निधी उपलब्ध असल्यास कामाचे ढोबळ नकाशे व अंदाजपत्रके उपभोक्ता खात्याच्या सक्षम अधिका-यांच्या विनंतीस अनुसरुन सा.बां.विभागामार्फत संबधीत विभागास सादर करण्यात येतात. उपभोक्ता विभाग संबधीत कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करतात. ठेव अंशदान तत्वावर करावयाच्या कामाबाबत शासन सा.बां.विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे निर्णय क्रमांक सीएनसी १००३/प्र.क्र.९७/अर्थ दि.२० ऑक्टोबर २००३ अन्वये स्थापत्य कामावर ५ टक्के व विद्युतीकरण कामावर ८ टक्के अशी सेंटेज चार्जेस आकारणी करण्यात येते. बहुतांश कामासाठी संपूर्ण निधी जमा करण्यात येतो अथवा उपभोक्ता खात्याकडून कामाच्या प्रगतीनुसार टप्प्याटप्प्याने वर्ग करण्यात येतो.

३.१.३ लहान मूळ कामे (Minor Original Works)

इमारतीची वाढ व बदलाची कामे ही लहान मूळ कामे (M.O.W.) या प्रकारात येतात. या कामासाठीचे अंदाजपत्रक उपभोक्ता विभागाकडे प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी व आवश्यक निधी उपलब्धतेसाठी सादर केली जातात व योग्य मान्यतेनंतर व निधीच्या उपलब्धेनुसार काम हाती घेतले जाते.

३.१.४ इमारतीची दुरुस्तीची कामे :-

शासकीय इमारती सुव्यवस्थित व सुरक्षित रहाण्यासाठी इमारतींची वेळोवेळी व ठराविक कालावधीत दुरुस्ती व देखभाल करणे आवश्यक असते (सा.बां.नियमावली अनुच्छेद क्र.१७३). यासाठी सार्वजनिक विभागाची सेवाकेंद्रे स्थापण्यात आली आहेत. या सेवाकेंद्राबाबतची माहिती मॅन्युअलमध्ये स्वतंत्रपणे देण्यात आली आहे.

* * *

३.२ सार्वजनिक बांधकाम सेवा केंद्र

३.२.१ शासकीय निवासस्थान संकुले व शासकीय कार्यालय संकुले येथील इमारतींच्या दैनंदीन तक्रारींचे त्वरेने निराकरण होण्यासाठी मोठया शासकीय इमारती संकुलात किंवा अनेक शासकीय इमारती संकुले मिळून एक 'सार्वजनिक बांधकाम सेवा केंद्र' कार्यान्वीत असते. सार्वजनिक बांधकाम सेवा केंद्रात उपभोक्त्यांचे तक्रार पुस्तके ठेवण्यात येते. या तक्रार पुस्तकांत उपभोक्त्यांसाठी येणा-या इमारतींच्या दुरुस्ती व देखभालीच्या तक्रारी नोंदविल्या जातात.

३.२.२ सेवा केंद्रात मार्ग लिपिक हा सेवा केंद्र प्रमुख असतो. सेवा केंद्र प्रमुखाकडून नोंदविलेल्या तक्रारींची त्वरीत दखल घेऊन त्यांची वर्गवारी करुन नैमित्तीक (किरकोळ) दुरुस्तीचे त्वरीत निराकरण करण्यात येते. विशेष किंवा विविक्षीत स्वरुपांच्या दुरुस्तीचे सक्षम अधिका-यांचे मंजुरी नंतर निराकरण केले जाते.

३.२.३ सेवा केंद्र प्रमुखाने नोंदविलेल्या त्यांची निराकरण करणेसाठी सेवा केंद्रात उपलब्ध असलेले कुशल (सुतार,गवंडी,नळ कारागीर इत्यादी) व अकुशल (मजुर) कामगारांना त्यांनी दररोज करावयाच्या कामांची नोंद करुन ती कामे पूर्ण करुन घेण्यात येतात. तक्रार निवारण झाल्यावर तक्रार नोंदविणा-या संबधीतांची स्वाक्षरी घेण्यात येते.

३.२.४ सार्वजनिक बांधकाम सेवा केंद्रात कुशल कामगार (१ सुतार, १ गवंडी, १ नळ कारागिर) व अकुशल कामगार असे सुमारे १० ते १५ मजुर कार्यरत असतात. कुशल कामगारांकडे त्यांना लागणा-या हत्यांराचा साठा असतो. सेवा केंद्रात दुरुस्ती व देखभालीसाठी लागणा-या बांधकाम साहित्याचा अत्यावश्यक साठा केलेला असतो.

३.२.५ सा.बां.सेवा केंद्रात नोंदविलेल्या तक्रारींपैकी किरकोळ / नैमितीक दुरुस्ती कामे त्वरीत पूर्ण करण्यात येतात व उर्वरीत मोठया स्वरुपांचे तक्रारीचे वर्गीकरण करुन प्रकारानुसार संबधित दुरुस्ती कार्यक्रमात ही कामे प्रस्तावित करण्यात येतात. ही दुरुस्ती कामे व सा.बां.विभागाचे अभियंत्यांनी इमारत निरीक्षणानंतर सुचविलेली दुरुस्ती कामे आणि दर वर्षाचे सुरुवातीस उपभोक्ता विभागासोबत इमारत दुरुस्ती व देखभालीकरीता आयोजित केलेल्या बैठकित उपभोक्ता खात्याने सुचविलेली दुरुस्ती कामे प्राधान्यक्रमाने खालील तीन प्रकारच्या दुरुस्ती कार्यक्रमात अंतर्भूत करुन हा इमारतींचा दुरुस्ती कार्यक्रम सा.बां.विभागाच्या सक्षम अधिका-यांकडून निधीच्या उपलब्धेनुसार मंजुर केला जातो.

या दुरुस्ती कामांमध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

१) नैमितीक / किरकोळ दुरुस्ती

२) विशेष दुरुस्ती

३) विविक्षित (भांडवली स्वरुपाची) दुरुस्ती.

५) ज्या ठिकाणी सेवा केंद्र नाहीत त्या ठिकाणी सेवा केंद्राकडून अभिप्रेत असलेली देखभाल दुरुस्तीची कार्यवाही संबधीत सा.बां. उपविभागाकडून करण्यात येते.

* * *

३.३ शासकीय विश्रामगृहे

जवळजवळ ३ लाख चौ.कि.मी. भूप्रदेश आणि ७२० कि.मी.लांबीची किनारपट्टी लाभलेल्या महाराष्ट्रात थंड हवेच्या किंवा प्रेक्षणीय स्थळांच्या ठिकाणी विश्रामगृहे बांधण्याची संकल्पना स्वातंत्र्यापूर्वी इंग्रज सरकारने राबविली. तथापि स्वातंत्र्यानंतर शासनाने हाती घेतलेल्या निरनिराळया विकासाच्या कार्यक्रमांमुळे प्रशासन जसजसे लोकाभिमुख होत गेले आणि विकासाच्या योजना गाव पातळीपर्यत पोहोचल्या, तसतसे अशा योजना राबविणा-या तसेच त्यांना मार्गदर्शन करणा-या अधिका-यांसहित लोकप्रतिनिधीनी दौ-यावर असताना राहण्याची सोय असणे आवश्यक झाले.

बरीचशी गावे अद्यापही दुर्गम भागात आहेत. अनेक ठिकाणी निवासाची तसेच इतर सोय असतेच असे नाही. ही गोष्ट लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने सर्व जिल्हे, तालुके, थंड हवेची ठिकाणे, तीर्थक्षेत्रे, प्रेक्षणीय स्थळे इत्यादी ठिकाणी विश्रामगृहे बांधलेली आहेत. आता महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांत आणि जवळजवळ सर्व तालुक्यांमध्ये शासकीय कामानिमित्त दौ-यावर असणा-या मंत्री, अधिकारी व इतर पदाधिकारी यांच्यासाठी विश्रामगृहांची व्यवस्था आहे.

महाराष्ट्रातील ३५ जिल्हयांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाची एकंदरीत ५६३ विश्रामगृहे असून त्यामधील सर्व कक्षबंधाची संख्या २१२० एवढी आहे. शासकीय कामानिमित्त दौ-यावर असताना सदर विश्रामगृहात शासकीय कर्मचा-यांना तसेच इतर पदाधिका-यांना सवलतीच्या दराने राहता येते.

याशिवाय महाबळेश्वर,माथेरान,खंडाळा,खुल्ताबाद,चिखलदरा इत्यादी थंड हवेच्या ठिकाणी विश्रामगृहे आहेत. महाबळेश्वर येथे १८ विशेष कक्ष व १९ साधे कक्ष असून १ एप्रिल ते १५ जून व १५ ऑक्टोबर ते १५ नोंव्हेंबर या हंगामी कालावधीत त्यांचे आरक्षण सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई येथून करण्यात येते. दि.१६.११ ते ३१.३ या कालावधीतील आरक्षण कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पुणे व सातारा या कार्यालयाकडून(संबधीत विभागांच्या अखत्यारीतील) करण्यात येते. १६.६ ते १४.१० पर्यंत अतिवृष्टीमुळे आरक्षण बंद असते.

शासकीय विश्रामगृहांचा वापर, आरक्षणाचा अग्रक्रम,त्यांचे भाडे व अन्य नियम इत्यादी बाबतची माहिती या पुस्तिकेत अंतर्भूत केली आहे.राज्यातील शासकीय विश्रामगृहांचे भाडे तसेच त्यांचा वापर करण्याच्या सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यामधील ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

३.३.१ आरक्षण :-

१/- सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील शासकीय विश्रामगृहाचे, महाबळेश्वरकरिता विशिष्ट कालावधीसाठी शासनस्तरावरुन होणारे आरक्षण, मुंबईसाठी अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,मुंबई,नागपूर येथिल रविभवन मधील कुटीरे व पुणे येथे नवीन सर्किट हाऊससाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून होणारे आरक्षण, माथेरानकरिता

अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, कोकणभवन, नवीमुंबई यांच्याकडून होणारे आरक्षण वगळता इतर सर्व शासकीय विश्रामगृहाचे आरक्षण संबधित कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयामधून होते. अतिमहत्वाच्या (व्ही.आय.पी.) व्यक्तीसाठी कक्षाचे आरक्षण देतांना आवश्यक ती काळजी घेण्यात येते.

२/- सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या वेबसाईटवरुनही विश्रामगृहासाठी आरक्षण करता येते.

३/- विश्रामगृहाच्या आरक्षणासाठी शक्यतो किमान सात दिवसांपूर्वी संबधित कार्यकारी अभियंता यांना लेखी कळविणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेल्या अर्जाचा कक्षाच्या उपलब्धेनुसार विचार करण्यात येईल.

४/- विश्रामगृहातील कक्षाचे आरक्षण करताना खालीलप्रमाणे अग्रक्रम कटाक्षाने पाळण्यात यावा. (मा.राष्ट्रपतीच्या सचिवालयाने दिनांक ४ ऑगष्ट १९७९ रोजी निर्गमित केलेल्या अधिसुचनेनुसार अतिमहत्वाच्या व्यक्तिसाठी प्राधान्यक्रम विचारात घेतला आहे.)

- महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल
- राज्याचे मुख्यमंत्री
- विधानपरिषदेचे सभापती/विधानसभेचे अध्यक्ष/उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती
- लोक आयुक्त
- मा.मंत्री / उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती
- विधानपरिषदेचे उपसभापती / विधानसभेचे उपाध्यक्ष
- मा.राज्यमंत्री
- विधान मंडळाच्या समित्यांचे सभासद
- लोकप्रतिनिधी (खासदार/आमदार)
- राज्य शासनाचे शासकीय कामानिमित्त दौ-यावर असणारे अधिकारी /कर्मचारी
- केंद्र शासनाचे शासकीय कामानिमित्त दौ-यावर असणारे अधिकारी /कर्मचारी
- राज्य शासनाचे कामावर नसतांना येणारे अधिकारी /कर्मचारी
- इतर राज्य शासनाचे शासकीय कामानिमित्त दौ-यावर असणारे अधिकारी /कर्मचारी
- माजी खासदार/आमदार/स्वातंत्र्य संग्राम सेनानी/ राज्य शासनाचे सेवानिवृत्त अधिकारी /कर्मचारी
- अधिस्वीकृत पत्रकार (Accredition Card Holder)
- खाजगी व्यक्ती.

५/- मा.मंत्री,उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती / राज्यमंत्री इत्यादी अतिमहत्वाच्या व्यक्तीसाठी आरक्षण देतेवेळी योग्य ती खबरदारी घेण्यात यावी. राजशिष्टाचाराप्रमाणे अशा महत्वाच्या व्यक्तीसाठी सर्व व्यवस्थांची जबाबदारी जिल्हाधिकारी कार्यालयातील स्वागत अधिका-यांची राहील.

६/- उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीना विश्रामगृहातील कक्षाचे आरक्षण देताना परिच्छेद ४ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे प्राधान्य द्यावयाचे आहे. उच्च न्यायालयाच्या न्यायमुर्तीना विश्रामगृहाचे आरक्षण हवे असल्यास संबधित प्रबंधक हयांनी संबधित कार्यकारी अभियंता तसेच जिल्हाधिकारी यांना किमान दोन दिवस आधी कळविणे आवश्यक आहे. मा.न्यायमूर्तीसाठी कक्ष आरक्षणाबाबत व इतर सोयीबाबत संबधित प्रबंधक हयांनी वैयक्तिकरित्या खात्री करुन घ्यावी.

७/- विश्रामगृहातील कक्षंबधाचे आरक्षण करताना खाजगी व्यक्तीना सर्वात शेवटी प्राधान्य आहे. खाजगी व्यक्तींच्या आरक्षणासाठी कोणी पत्र दिले किंवा दूरध्वनी केला ही बाब गौण धरण्यात यावी. तसेच आरक्षण कोणाच्याही नावाने केले तरी विश्रामगृहात प्रत्यक्ष कोण राहणार आहे यावरुन प्राधान्यक्रम ठरविण्यांत यावा.

८/- विश्रामगृहातील कक्षंबधाचा ताबा देताना तेथे प्रत्यक्ष राहणा-या व्यक्तीची ओळख पटवून घेणे आवश्यक आहे. त्याकरिता विश्रामगृहात कक्षाचे आरक्षण करुन येणारी व्यक्ती ज्यांच्या नांवे आरक्षण झाले आहे तीच आहे किंवा कसे, याची खातरजमा संबधित व्यवस्थापक / प्रभारी कर्मचारी यांनी करावी.

९/- ज्यांच्या नावे आरक्षण करण्यात आलेले असेल ती व्यक्ती स्वतः आली नसेल तर त्यांचे नावावर कोणत्याही परिस्थितीत इतरांना विश्रामकक्ष उपलब्ध करुन देऊ नये.

१०/- संबधितास कक्ष उपलब्ध करुन देण्यापूर्वी विश्रामगृहांच्या नोंदवहीत त्यांचे संपूर्ण नांव , पत्ता, पदा, आल्याची तारीख व वेळ यांच्या नोंदी करण्यात याव्यात.

११/- कोणत्याही व्यक्तीस एकावेळेस एकापेक्षा अधिक कक्ष आरक्षित करता येणार नाही.

१२/- आरक्षण पावती वेळच्या आत संबधित विश्रामगृहाकडे पोहोचती करण्याची जबाबदारी आरक्षण करणा-या कार्यालयाची राहील. याबाबत संबधित कार्यकारी अभियंता यांनी स्थानिक परिस्थितीनुसार पध्दत घालून द्यावी.

१३/- आरक्षण पावत्या विश्रामगृहाच्या सूचना फलकावर कटाक्षाने लावण्यात येतात.

१४/- करण्यात आलेले आरक्षण २४ तासांपर्यतच राखून ठेवण्यात येईल. आरक्षण कालावधी सकाळी ९.०० ते दुस-या दिवशी सकाळी ९.०० वाजेपर्यत असते.

१५/- विश्रामगृहाचे आरक्षण जास्तीत जास्त ७ दिवसापर्यतचे करण्यात येते.

१६/- अतिमहत्वाच्या व्यक्तीसोबत येणा-या सहका-याचा किंवा स्वीय सहाय्यकाचा दर्जा लक्षात घेऊन त्यांना अनुज्ञेय कक्ष उपलब्ध असल्यास देण्यात यावा. अन्यथा त्याच्याकरीता वेगळा कक्ष संबधितांनी सुरुवातीस आरक्षित करुन ठेवावा.

१७/- आरक्षण परवाना दिलेला / ताब्यात असलेला कक्ष रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आला आहे. अशा प्रसंगी आरक्षण रद्द झाल्यास ताब्यात घेतलेला कक्ष तात्काळ सोडावा लागतो.

१८/- अचानक येणा-या अतिमहत्वाच्या व्यक्तीच्या स्वतःच्या सोयीकरिता (त्याच्या सोबत असणा-या अन्य व्यक्तीसाठी नव्हे.) रीतसर आरक्षण केलेल्या व विश्रामगृहात मुक्कामास असलेल्या व्यक्तीकडून कक्ष ताब्यात घेण्याची अगदीच निकड असेल तर तेथे वास्तव्यास असणा-या व्यक्तींना सूचना देऊन आणि शक्य असल्यास त्यांची अन्यत्र व्यवस्था करुन कक्ष ताब्यात घेण्यात यावा.

१९/- फक्त अधिस्वीकृत पत्रकारांनाच (Accredition Card Hoder) प्राथम्य क्रमानुसार आरक्षण देण्यात यावे.

२०/- खंडाळा,माथेरान,खुलताबाद,चिखलदरा येथील शासकीय विश्रामगृहातील कक्षबंधाच्या आरक्षणासाठी शासकीय अधिकारी / कर्मचा-याकडून अनामत रक्कम रु.१००/- घेण्यात यावी आणि महाबळेश्वर येथील कक्षबंधाच्या आरक्षणासाठी रु.२००/- अनामत रक्कम घेण्यात यावी. खाजगी व्यक्तीकडून वरील थंड हवेच्या ठिकाणी असणा-या विश्रामगृहातील आरक्षणासाठी प्रतिकक्ष रु.५००/- अनामत रक्कम घेणेत यावी. ही अनामत रक्कम संबधित कार्यकारी अभियंता यांनी नमुना फॅार्म तयार करुन आरक्षणापूर्वी आरक्षणार्थीकडून घेण्याची व्यवस्था करावी. ही रक्कम विश्रामगृहाच्या भाडयामधून समायोजित करावी विश्रामगृहाचे भाडे सदरहू अनामत रक्कमेपेक्षा अधिक झाल्यास अतिरिक्त भाडे संबधिताकडून वसूल करण्यात यावे व कमी झाल्यास विश्रामगृह व्यवस्थापकाने / प्रभारी कर्मचा-याने दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राच्या आधारे उर्वरित रक्कम संबधितास परत करण्यात यावी.

३.३.२ महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथील आरक्षण.

महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथील कक्षबंधाचे आरक्षण कार्यासन अधिकारी, कार्यासन २० अ, सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय,मुंबई (दुरध्वनी क्र.२०२५९३२) यांच्यामार्फत केले जाते. तथापि महाराष्ट्र सदन येथील कक्षबंधाची संख्या मर्यादित असल्याने शासकीय कामानिमित्त जाणा-या व्यक्तींनाच सर्वसाधारणपणे आरक्षण मिळते.

३.३.३ महाबळेश्वर येथील आरक्षण

महाबळेश्वर येथील आरक्षण प्रत्येकवर्षी १ एप्रिल ते १५ जून व १५ ऑक्टोबर ते १५ नोंव्हेबर या हंगामी कालावधीत मंत्रालयीन स्तरावर कार्यासन अधिकारी, मि.व्य.२, सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,(दुरध्वनी क्र.२०२५०५७) यांच्याकडे विहित नमुन्यातील अर्ज भरुन दिल्यावर उपलब्धतेनुसार करण्यात येते.

सर्व अर्जदाराकडून महाबळेश्वर येथील आरक्षणाच्या वेळी रु.२००/- अनामत रक्कम घेण्यात येते. आरक्षण न मिळाल्यास सदर अनामत रक्कम दोन महिन्याच्या आत अर्ज केल्यास परत देण्यात येते.

३.३.४ जेवणाची सोय

जिल्हयाच्या ठिकाणी शासकीय विश्रामगृहामध्ये जेवणाची व्यवस्था आहे. परंतु त्यासाठी पुरेशी पूर्वसूचना देणे आवश्यक असते. तालुक्याच्या ठिकाणी आगाऊ विनंती केल्यास व जेवणाची सोय उपलब्ध असल्यास जेवण मिळू शकते.

३.३.५ विस्तृत माहिती पुस्तिका

याशिवाय सा.बां.विभागाने महाराष्ट्रातील सा.बां.विभागाच्या विश्रामगृहाची माहिती देणारी पुस्तिका प्रकाशित केली असून ती विक्रीसाठी शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,चर्नी रोड,मुंबई येथे उपलब्ध आहे. सदर पुस्तिकेत सर्व विश्रामगृहांची माहिती, दुरध्वनी क्रमांक, आरक्षणासाठी संपर्काचा पत्ता इ. माहिती संकलित केली आहे.

३.३.६ शासकीय विश्रामगृहाचे दर दर्शविणारे विवरणपत्र

(शासन निर्णय क्र.आरक्षण-२००१/प्र.क्र.७७/मि.ब्य.२ दि.१९/१०/२००२.नमुना दि.१/११/२००२ पासून लागू)

	केंद्र व राज्य शासनाचे अतिथी म्हणून घोषित न केलेले व्ही.आय. पी./लोकायुक्त /मंत्री /न्यायमूर्ती/राज्यमंत्री /विधानमंडळाच्या समितीचे सभासद, खासदार/आमदार राज्य शासनाचे शासकीय कामानिमित्त दौऱ्यावर असणारे अधिकारी व कर्मचारी /जिल्हा परिषदाचे पदाधिकारी /अभिस्वीकृत पत्रकार /राज्य शासनाच्या समित्याचे अशासकीय सभासद.		केंद्र व इतर राज्य शासनाच्या कामानिमित दौऱ्यावर असणारे अधिकारी/ कर्मचारी माजी आमदार/ खासदार राज्य शासनाचे अधिकारी कर्मचारी कामावर नसताना व राज्य शासनाचे निवृत्त अधिकारी/कर्मचारी.		इतर / खाजगी व्यक्तीसाठी (साधे कक्ष)		इतर / खाजगी व्यक्तीसाठी वातानुकूलित (कक्ष)	
	प्रतिदिन		प्रतिदिन		प्रतिदिन		प्रतिदिन	
	सध्याचा दर रुपये	सुधारीत दर रुपये	सध्याचा दर रुपये	सुधारीत दर रुपये	सध्याचा दर रुपये	सुधारीत दर रुपये	सध्याचा दर रुपये	सुधारीत दर रुपये
१.मुबई येथील विश्रामगृहे	१०/- प्रति व्यक्ती	२०/- प्रति व्यक्ती	२०/- प्रति व्यक्ती	५०/- प्रति व्यक्ती	१००/- प्रति कक्ष	५००/- प्रति कक्ष	१००/- प्रति कक्ष	७५०/- प्रति कक्ष
२.रवि भवन नागपूर वरील कुटीरे	२०/- प्रति कुटीर	५०/- प्रति व्यक्ती	४०/- प्रति कुटीर	८०/- प्रति व्यक्ती	५००/- प्रति कक्ष २०००/ प्रति कुटीर	दरवाढीचा प्रस्ताव नाही	७५०/- प्रति कक्ष २५०० प्रति कुटीर	दर वाढीचा प्रस्ताव नाही

३)अ) महाबळेश्वर स्पेशल सुट्स	१०/- प्रति व्यक्ती	२०/- प्रति व्यक्ती	२०/- प्रति व्यक्ती	५०/- प्रति व्यक्ती	१००/- प्रति कक्ष	६००/- प्रति कक्ष	--	७५०/- प्रति कक्ष
३ब) महाबळेश्वर व्हिआयपी सुट्स	१०/- प्रति व्यक्ती	२०/- प्रति व्यक्ती	२०/- प्रति व्यक्ती	५०/- प्रति व्यक्ती	२००/- प्रति कक्ष	७५०/- प्रति कक्ष	--	१०००/- प्रति कक्ष
४) व्हि.आय.पी. गेस्ट हाऊस सर्कीट हाऊस / महसुल मुख्यालयाच्या ठिकाणची विश्रामगृहे	१०/- प्रति व्यक्ती	२०/- प्रति व्यक्ती	२०/- प्रति व्यक्ती	५०/- प्रति व्यक्ती	१००/- प्रति कक्ष	५००/- प्रति कक्ष	--	७५०/- प्रति कक्ष
५)आमदारनिवास मुंबई / नागपूर	१०/- प्रति व्यक्ती	२०/- प्रति व्यक्ती	२०/- प्रति व्यक्ती	५०/- प्रति व्यक्ती	१००/- प्रति कक्ष	५००/- प्रति कक्ष	--	७५०/- प्रति कक्ष
६) जिल्हयाच्या ठिकाणी असलेली विश्रामगृहे	१०/- प्रति व्यक्ती	२०/- प्रति व्यक्ती	२०/- प्रति व्यक्ती	५०/- प्रति व्यक्ती	७५/- प्रति कक्ष	२००/- प्रति कक्ष	--	३००/- प्रति कक्ष
७) महाबळेश्वर खंडाळा, माथेरान, खुल्ताबाद चिखलदरा येथील विश्रामगृह	१०/- प्रति व्यक्ती	२०/- प्रति व्यक्ती	२०/- प्रति व्यक्ती	५०/- प्रति व्यक्ती	७५/- प्रति कक्ष	५००/- प्रति कक्ष	--	७५०/- प्रति कक्ष
८) इतर ठिकाणची विश्रामगृहे	५/- प्रति व्यक्ती	१०/- प्रति व्यक्ती	१०/- प्रति व्यक्ती	२०/- प्रति व्यक्ती	५०/- प्रति कक्ष	२००/- प्रति कक्ष	--	३००/- प्रति कक्ष

* * *

३.४ इमारतींची भाडे निश्चिती

३.४.१ शासन सा.बां.विभागाचे परिपत्रक क्र.आरएनटी-१०८४/८९०/कार्यासन मिळकत व्यवस्थापन-३ दि.२३/४/१९८४ व आरएनटी-२३८५/५८३८३/(२३६)/मि.व्य.१ दि.१६/२/१९८७ मध्ये शासनाने शासकीय कामाकरिता खाजगी इमारती भाडयाने घेतल्या असता त्याचे भाडयाबाबत योग्यता प्रमाणपत्र देण्याबाबतच्या सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

त्यासूचना विचारात घेऊन शासकीय उपयोगासाठी भाडयाने इमारत घेणा-या कार्यालयाने सर्वप्रथम त्या क्षेत्राचे संबंधित कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम खाते यांचेकडून त्यांच्या कार्यालयासाठी शासकीय जागा उपलब्ध नसल्याबद्दलचे प्रमाणपत्र आधी प्राप्त करावयाचे आहे.

३.४.२ त्यानंतर जागा भाडयाने घेणा-या संबधित विभागाने कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, यांचेकडे प्रस्ताव पाठवावयाचा आहे. प्रस्तूत प्रस्तावा सोबत खालील कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.

१) विहीत नमुना १ व २ - नमुना १ मध्ये संबधीत घर मालकांनी माहिती पुरवावयाची आहे व नमुना २ मध्ये ज्या कार्यालयास / संस्थेस जागा भाडयाने द्यावयाची आहे त्यांनी माहिती पुरवावयाची आहे.

२) इमारतीचा मूळ नकाशा /छायांकीत प्रत.

३) जागा पुरेशी असल्याबद्दलचा भाडेकरु यांचा दाखला.

४) ७/१२ उतारा किंवा नमुना ८ नोंदीचा उतारा.

५) घरमालकाचे संमतीपत्र.

६) भाडेकरु कार्यालयातील वर्गनिहाय अधिकारी / कर्मचारी यांची मंजूर पदसंख्या बद्दलची माहिती (शासन निर्णयांच्या प्रतीसह)

७) भाडयाने घ्यावयाची जागा ज्यांचे क्षेत्रात आहे त्या जिल्हा उपनिबंधक वर्ग-१ किंवा उपनिबंधक (महसूल) यांचेकडील त्या भागातील जागेच्या खरेदी / विक्रीच्या प्रचलित दराबाबतचे दरपत्रक.

८) प्रस्तूत जागा (इमारतीची) महानगरपालिका /नगरपालिका / ग्रामपंचायत करांची भरणा केलेली अद्यावत पावती.

९) इमारत पूर्णत्वाचा दाखला

९) घरमालक व (भाडेकरु) कार्यालय प्रमुख यांच्यात आपसात झालेल्या रु २०/- च्या महसूली मुद्रांकावरील करारनामा.

३.४.३ वरील सर्व कागदपत्रासंह प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर कार्यकारी अभियंता प्रस्तूत प्रस्ताव संबंधित उपअभियंता यांचेकडून प्रत्यक्ष जागेवर पाहाणी करुन सद्यस्थितीवर आधारित अहवाल तयार करुन भाडे मंजूरीसाठीचा प्रस्ताव मागवतील.

उपअभियंता प्रस्तूत इमारतीची जागेवर जाऊन पाहणी करुन आपला सविस्तर अहवाल (भाडे प्रकरण) कार्यकारी अभियंता कडे पाठवतील व कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात त्याची छाननी करुन भाडे योग्यता / सुधारित भाडे योग्यता प्रमाणपत्र देतील.

३.४.४ एखाद्या इमारतीचे भाडे निश्चित करावयाचे असल्यास.

१. आधी त्या इमारतीचे मुल्यांकन करण्यात येते हे मुल्यांकन बांधकामाचा प्रकार जसे जोता,तळफरशी,भिंती, छत,दरवाजे /खिडक्या यांचे बांधकामाचा प्रकार व त्या वर्षाचा ढोबळमानाने बांधकामाचा दर तसेंच इमारतीचे बांधकामाचे वर्ष विचारात घेऊन तिच्या आयुष्यमानानुसार आवश्यक असल्यास घसारा इ. विचारात घेऊन केले जाते. त्यावर ६ % प्रमाणे व्याज आणि २% प्रमाणे देखभाल दुरुस्ती विचारात घेतल्या जाते.

२. यानंतर त्या इमारतीखालील व भाडेकरु विभागाच्या वापरास आवश्यक / उपलब्ध क्षेत्राचा विचार करुन जमीनीचे मुल्यांकन महसूल खात्याकडील संबधित उपनिबंधक यांचे कडील खरेदी / विक्रीच्या प्रचलित दरांचा विचार व प्रस्तूत जमीनीचे क्षेत्र विचारात घेऊन करण्यात येते. त्यावर ६% व्याज विचारात घेतले जाते.

३. त्यानंतर भाडेनिश्चितीस्तव प्रस्तावीत इमारतीसाठीचा पाणीपुरवठा, मलनिसारण व विद्युतीकरण यावरील खर्चाच्या रकमेवर ६% प्रमाणे व्याज ४.५ % प्रमाणे देखभाल दुरुस्ती विचारात घेतली जाते.

४. वरील (१), (२) व (३) वरील व्याज + देखभाल दुरुस्तीच्या खर्चाची बेरीज म्हणजे त्या इमारतीचे वार्षिक भाडे होय.

वरील १ ते ४ प्रमाणे भाडे निश्चिती होत असली तरी शासनाचे उपरोल्लेखित दि.१६/२/१९८७ चे परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे कार्यकारी अभियंतानी खालील प्रमाणे बाबींची दक्षता घ्यावयाची आहे व भाडे निश्चिती करुन द्यावयाची आहे.

१. कार्यकारी अभियंतांनी त्यांचेकडे भाडेनिश्चितीसाठी येणारा प्रस्ताव संबधित कार्यालय प्रमुख व विभाग प्रमुख यांच्या शिफारशी नुसारच करावा इतर खाजगीसंस्था व मालक यांचे प्रस्ताव ग्राहय धरु नयेत.

२. भाडे योग्यता प्रमाणपत्र देतांना ठरविलेले भाडे करविरहीत अथवा सर्व कर धरुन आहे हे प्रमाणपत्रात स्पष्ट उल्लेख करावा.

३. ज्याठिकाणी भाडे नियंत्रण अधिनियम लागू आहे. तेथील जमीन अथवा इमारतीचे भाडे योग्यता / सुधारित भाडे योग्यता प्रमाणपत्र देतांना सदरहू परिसरात भाडे नियंत्रण अधिनियम लागू आहे हे संबधित विभागास प्रकर्षाने स्पष्ट करावे कारण भाडे नियंत्रण अधिनियमाचा विचार जागा भाडयाने घेणा-या संबधित विभागाने करावयाचा आहे व भाडे नियंत्रण अधिनियम लागू असल्यास त्या अधिनियमानुसार भाडेकरुला मिळणारे संरक्षण प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी जागा भाडयाने घेणा-या संबधित प्रशासकीय विभागाची आहे आणि म्हणून भाडे सुधारणा प्रस्ताव कार्यकारी अभियंता यांचेकडे पाठविण्यापूर्वीच तशा प्रकारचा विचार संबधित विभागांनी करावा.

४.भाडे योग्यता प्रमाणपत्रामध्ये परिसराचे नांव, इमारतीचे नांव, घर मालकाचे नांव, भाडयाने घेतलेल्या जागेचे क्षेत्रफळ, दरमहा भाडयाचा दर यांचा उल्लेख करुन सदरहू प्रमाणपत्र कोणत्या कालावधी पासून किती कालावधी पर्यंत वैध राहील याचाही उल्लेख करावा.

* * *

३.५ अपंगासाठीच्या उपाययोजना

३.५.१ शाररीकदृष्टया अपंग व्यक्तींच्या सोयीसाठी शासकीय इमारतीमध्ये सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने निवासी व कार्यालयीन इमारती बांधतांना विशेष सुविधा उपलब्ध करण्यांबाबत शासन परिपत्रक क्र.(१) बीडीजी-१२९०/प्रक्र-६६/इमारती-१ दि.३१/३/९० (२) बीडीजी १०९८/प्र.क्र.२९८/इमारती-२ दि.३१/५/१९९९ अन्वये सुचना देण्यात आल्या आहेत

३.५.२ निवासी व कार्यालयीन इमारती बांधतांना इमारतीमध्ये खालील प्रमाणे विशेष तरतूदी उपलब्ध करण्यात येतात. (सर्व विशेष सुविधा भारतीय मानक संस्थेच्या 'रिकमंडेशन्स फॅार बिल्डिंग्ज अँड फॅसीलिटीज फॅार दी फिजिकली हॅन्डीकॅप्ड' क्र.आयए ४९६३.१९६८ यांत नमूद केल्याप्रमाणे असाव्यात.)

अ) निवासी इमारती :-

अपंग व्यक्तिच्या उपयोगासाठी तळमजल्यावरील सदनिका खालील विशेष सुविधासह उपलब्ध करण्यात याव्यात (एकूण सदनिकेच्या कमीत कमी १-२ टक्के तळमजल्या वरिल सदनिकेत हया सोयी उपलब्ध असाव्यात.)

१) जमीनीपासून ते जोत्याच्या पातळी पर्यत, कठडया सह बाहेरुन सरळ प्रवेशासाठी उतार (रॅम्प) जास्तीत जास्त १:१२ उतार असावा. (अपु-या जागे अभावी उतार ठेवणे जेथे शक्य होणार नाही तेथे व्हील चेअर लिफ्टची सोय असावी.)

२) फरशी रफ शहाबाद अथवा रफ तंदूर लादयांची असावी ती गुळगुळीत नसावी अति चकचकीत पृष्ठभाग टाळण्यात यावा.

३) प्रसाधनगृहात युरोपिअन पध्दतीचे शौचालयाचे भांडे कमी उंचीवरील उद्‌वाहन नियंत्रक (फ्लॅश कंट्रोल) व पकडदांडे (ग्रॅब आर्म्स) बसवावे आणि चाकाच्या खूर्चीची हालचाल सहजगत्या होऊ शकेल अशा पुरेशा रुंदीचा दरवाजा असावा.

४) विशेष प्रकारचे फिरत्या हालचालीचे दरवाजे आणि पकडदांडे / मुठी (विशेष प्रकारच्या) आणि चाकाच्या खुर्चीची हालचाल सहजगत्या होऊ शकेल अशा पुरेशा रुंदीचे दरवाजे बसविण्यात यावेत.

५) उंबरठा बसविण्यात येऊ नये.

५) चाकाच्या खुर्चीत बसून वापरता येतील अशा कमी उंचीवर विद्युत स्वीचेस बसविण्यात यावेत.

६) अपंग व्यक्तिच्या मार्गदर्शनासाठी अशा सोयी कोठे पुरविल्या आहेत हे दर्शविणा-या चिन्हांचे योग्य माहितीचे फलक लावण्यात यावे.

ब) कार्यालयीन इमारती :-

निवासी इमारतीतील सोयी व्यतिरिक्त कार्यालयीन इमारतीत तळमजल्यावर खालील अतिरिक्त विशेष सुविधा पुरविण्यात याव्यात.

१) बहुमजली इमारतीमध्ये वर जाण्याकरिता चाकाची खुर्ची आत जाऊ शकेल अशा

आकाराच्या उद्वाहनाची तरतूद असावी.

२) उद्‌वाहनामध्ये ब्रेल लिपीतील अक्षरांची तसेच चिन्हांची उपलब्धता असावी.

२) फक्त अपंग स्त्रिया व पुरुषांकरिता प्रत्येकी किमान एक प्रसाधनगृह, विशेष संकल्पनासह तळमजल्यावर असावे. हया प्रसाधानगृहात विशेष तरतूदी म्हणून युरोपियन पध्दतीचे शौचालयाचे भांडे, कमी उंचीवरील उद्‌वाहन पकडदांडे आणि चाकाच्या खुर्चीची हालचाल सहजगत्या होऊ शकेल असा पुरेशा रुंदीचा दरवाजा असावा.

* * *

३.६ चित्रपटगृहांची पाहणी व त्या संबंधीत असलेले नियम

महाराष्ट्र राज्यात जनतेच्या मनोरंजनासाठी, शैक्षणिक कार्यक्रमासाठी व इतर कारणांसाठी जवळजवळ प्रत्येक तालुक्याच्या व जिल्हयाच्या ठिकाणी चित्रपटगृहे असून त्यांचा वापर मोठया प्रमाणात केला जातो. वरील सर्व चित्रपटगृहांचे सुसुत्रीकरणासाठी महाराष्ट्र शासनाने नियम व मार्गदर्शक तत्वे निश्चित केलेली आहेत. हे सर्व नियम महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन) नियम १९६६ म्हणून ओळखले जातात. ज्याठिकाणी चलचित्रकाच्या सहाय्याने चित्रपट दाखविला जातो अशा सर्व तात्पुरत्या व कायमस्वरुपी ठिकाणांचा समावेश चित्रपटगृह म्हणून घोषित करण्यांत आलेला आहे. चित्रपटगृहांसाठी केलेले नियम हे वेळोवेळी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना काढून व त्यात अनेक कालानुरुप सुधारणा करुन तयार केलेले आहेत.

३.६.१ चित्रपटगृहे ही पुढील प्रमाणे चार प्रकारात विभागली आहेत.

१) स्थायी चित्रपटगृहे (Permanent) २) स्थायीवत चित्रपटगृहे (Quasi-permanent)
३) फिरती चित्रपटगृहे (Touring) ४) ड्राईव्ह इन चित्रपटगृहे.

प्रकार (१) स्थायी चित्रपटगृहे :- म्हणजे ज्याठिकाणी चलचित्रकाच्या सहाय्याने चित्रपट दाखविला जातो असे कोणतेही बांधकाम जे चिरेबंदी, माती, विटा, चुना, सिमेंट किंवा इतर अज्वालाग्राही सामानापासून बनविलेले आहे.
प्रकार (२) स्थायीवत चित्रपटगृहे :- म्हणजे जी चित्रपटगृहे लोखंडी कोन, लोखंडी कैच्या व इतर अग्निरोधक बांधकाम सामुग्री वापरुन केलेली आहेत.
प्रकार (३) फिरती चित्रपटगृहे :- ज्याठिकाणी सभागृहामध्ये, नाटयगृहामध्ये चित्रपट दाखविण्यासाठी लागणारा उपकरण संच आणि सयंत्रक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यात येतात यास फिरते चित्रपटगृह (Touring Talkies) म्हणतात.

प्रकार (४) ड्राईव्ह इन चित्रपटगृहे :- म्हणजे जेथे सर्वसाधारणपणे मोटारीत बसून चित्रपट पाहता येईल असे १००० पेक्षा अधिक मोटारी नसतील इतक्या मोटारगाडयांची सोय करण्याची क्षमता असलेले खुले चित्रपटगृह म्हणजेच ड्राईव्ह इन चित्रपटगृह होय.

३.६.२ चित्रपटगृह चालविण्यासाठी जिल्हा दंडाधिकारी अथवा पोलिस आयुक्त यांचेकडून परवाना देण्यात येतो. परवान्याचा वैधता कालावधी ३ महिने, ६ महिने, १ वर्ष व २ वर्ष आहे. चित्रपटगृहांचे बांधकाम करणेपूर्वी परवाना देणाऱ्या प्राधिकाऱ्याकडून व्यवस्थापकास बांधकामास मान्यता घ्यावी लागते. त्यामध्ये चित्रपटगृहे बांधणाऱ्या व्यक्तींनी बांधकामाचे मागणी अर्ज, आराखडे, बांधकामाची जागा व चित्रपटगृहांचा स्थापत्य विभागाच्या दृष्टीने संपूर्ण तपशिल देणे आवश्यक आहे. चित्रपटगृहाच्या ठिकाणाचे अथवा जागेचे मालकी हक्काचे नकाशे चित्रपटगृहाच्या इमारतीच्या नकाशात इमारतीतील जिने, पायऱ्या, मार्गिका, दारे,

खिडक्या, व्हरांडे, इमारतीची उंची, काटछेद, जमिनीचा प्रकार, छताचा प्रकार, वायुविजन, इमारतीतील भिंती, अग्निरोधक सामुग्री, विद्युतीकरण, पाणीपुरवठा, प्रसाधनगृहे, वाहनतळ, अंतर्गत रस्ते इ.बाबींचा मोजमापासह पूर्ण तपशिल नकाशात अर्जदाराने द्यावा. अर्जदाराने वरील सर्व माहिती योग्य त्या विहित नमुन्यात भरुन व कागदपत्रासह महसूल विभागाकडे सादर करावी.

३.६.३ चित्रपटगृहांच्या अभियांत्रिकी बाबींचे पाहणीसाठी व तपासणी करण्याच्या दृष्टीने महसूल विभागाकडून इमारतीच्या आराखडयाची कागदपत्रे कार्यकारी अभियंत्याकडे पाठविण्यांत येतात. अस्तित्वांतील जुन्या चित्रपटगृहांच्या इमारतीत कोणत्याही प्रकारचे फेर बदल करण्याचे असल्यास परवाना देणाऱ्या अधिकाऱ्यांची पूर्वमान्यता अर्जदाराने घेणे आवश्यक आहे. परवाना देणाऱ्या अधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या नकाशाप्रमाणेच नवीन बांधकाम होत आहे याची पाहणी सा.बां.खात्याचे कार्यकारी अभियंता, उपअभियंता करतात. त्यामध्ये कोणतेही फेरबदल परस्पर केल्यास परवाना रद्द होऊ शकतो.

३.६.४ चित्रपटाचे सार्वजनिकरित्या प्रदर्शन करण्यासाठी चित्रपटगृहाच्या परवान्याचे नुतनीकरण प्रतिवर्षी चित्रपटगृहाच्या व्यवस्थापकाने करुन घेणे आवश्यक आहे. चित्रपटगृहाच्या परवान्याचे शुल्क हे चित्रपटगृहात प्रेक्षकांची बसण्याची क्षमता, नुतनीकरणाचा कालावधी व चित्रपटगृहाचा प्रकार यावर अवलंबून आहे परवाना शुल्कांची माहिती संबंधीत अधिकाऱ्यांकडे मिळू शकते. महाराष्ट्र चित्रपटगृह नियम १९६६ मध्ये चित्रपटगृहांच्या बांधकामाच्या परवान्याशी संबंधीत ना हरकत प्रमाणपत्र, इमारत, विद्युतीकरण, आगीपासून बचाव करावयाच्या उपाययोजना, इमारत बांधकामाचा परवाना, तिकिटविक्री इ.बाबींचा समावेश आहे.

३.६.५ वर नमूद केलेले सगळे नियम हे प्रत्येक चित्रपटगृहास लागू आहेत. तथापि हे नियम अस्तित्वांत यायच्या पूर्वी म्हणजे २० डिसेंबर १९५० पूर्वीच्या चित्रपटगृहास लागू नाहीत.चित्रपटगृहाच्या परवान्याच्या नुतनीकरणासाठी व नवीन बांधकामासाठी परवाना प्राधिकारी जिल्हाधिकारी असून इमारत बांधकामातील तरतूदी त्याचे नियम या गोष्टी भाग-३,५,६ सा.बां.विभागाशी संबंधीत असून तालुका पातळीवर सा.बां.उपविभागाचे उपअभियंता अथवा जिल्हा पातळीवर सा.बां.विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात चौकशी केल्यास याबाबतची सर्व माहिती प्राप्त होऊ शकेल.

३.६.६ चित्रपटगृहांसाठी (स्थायी) ना-हरकत प्रमाणपत्रे देण्याबाबतचे नियम, महाराष्ट्र चित्रपटगृह विनियमन १९६६ मध्ये देण्यात आलेले आहेत तसेच याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांचे पालन केले जाते.

* * *

३.७ इमारतींची देखभाल व दुरुस्ती

३.७.१ शासकीय सार्वजनिक इमारतींची देखभाल दुरुस्ती करणे व या इमारती चांगल्या स्थितीत ठेवणे हे सार्वजनिक बांधकाम विभागांचे मूलभूत कर्तव्य आहे. इमारतींची वेळोवेळी देखभाल दुरुस्ती केल्यामुळे इमारतीचे आयुष्य वाढून त्या दीर्घकाळ वापरात राहतात. शासकीय इमारतीचे वर्गीकरण दोन भागात मुख्यतः करण्यात येते.

१) निवासी इमारती २) अनिवासी इमारती

इमारतीचे वर्गीकरण देखभाल व दुरुस्तीच्या आर्थिक मापदंडानुसार खालील प्रमाणे करतात.

अ गट - प्रशासकीय इमारती

ब गट - निवासी इमारती

क गट - रुग्णालयाच्या इमारती

३.७.२ महाराष्ट्र सा.बां.विभागाचे परिच्छेद ३७७ नुसार अधीक्षक अभियंता यांनी त्यांचे मंडळांतर्गत येणा-या शासकीय इमारतींची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तसेच संबधीत कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे विभागात येणा-या शासकीय इमारतींची तशीच एक नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. या नोंदवहीत संबधीत इमारत बांधकामाचे वर्ष, त्या इमारतीचे जोत्याचे क्षेत्रफळ तसेच ही इमारत कोणत्या विभागाचे वापरात आहे, केव्हा पासून वापरात आहे, इमारतीची विविक्षीत दुरुस्ती मोठया प्रमाणात केव्हा करण्यात आली या बाबतच्या नोंदी असणे आवश्यक आहे. ज्या इमारती शासनाने बांधल्या आहेत, विकत घेतल्या आहेत किंवा शासनाने स्वतःचे ताब्यात घेतल्या आहेत, अशा सर्व इमारतींची नोंद या नोंदवहीत करणे आवश्यक आहे.

३.७.३ इमारत दुरुस्तीचे प्रकार :

इमारत देखभाल दुरुस्तीचे खालील प्रमाणे तीन प्रकार आहेत.

विविक्षीत दुरुस्ती (एस.डी.आर.)

विशेष दुरुस्ती (एस.एल.आर.)

किरकोळ दुरुस्ती (सी.आर.)

अ) विविक्षीत दुरुस्ती (SDR)ः या वर्गीकरणाखाली इमारतीचे बांधकाम रचनात्मक दृष्टया मजबुत, आयुर्मान वाढविण्यासाठी, इमारतीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने करावयाच्या प्रमुख दुरुस्ती बाबींचा समावेश शासन सा.बां. विभागाचे परिपत्रक क्र.बीपीएल-१२९०/सीआर-५९५/इमारत दि.१०.४.१९९० यात करण्यात आलेला आहे. दुरुस्तीच्या या बाबी खालील प्रमाणे आहेत.

एस.डी.आर. १ : मोडकळीस आलेल्या जुन्या छपराची कौले बदलणे, सिमेंटपत्रे इत्यादी घालुन छप्पराचे नुतनीकरण करणे.

एस.डी.आर. २ : कुजलेली दरवाजे , खिडक्या बदलणे व त्यांचे नुतनीकरण करणे.

एस.डी.आर. ३ : गळती रोखण्यासाठी पाणी पुरवठा व ड्रेनेज लाईन यांची फेर जुळणी.

एस.डी.आर. ४ : गनायटींग व गंजरोधक पध्दत वापरुन इमारतीचा रचनात्मक ढाचा व्यवस्थित करणे .

एस.डी.आर. ५ : ज्यांची आयुमर्यादा संपली आहे अशा विद्युत वायरींगचे नुतनीकरण.

एस.डी.आर. ६ : ज्याची मितव्ययी आयुमर्यादा संपली आहे अशा मोटारी, पंपसेट, लीफ्ट बदलणे.

एस.डी.आर. ७ : भिंतीचा बाहय पृष्ठ भाग ओला असल्यास व गिलावा हे गळतीचे कारण असल्यास नव्याने गिलाव्या करण्याचे काम .

एस.डी.आर. ८ : गळती व ओलसरपणा थांबविणेसाठी जलरोधक (वॉटर प्रुफिंग)

एस.डी.आर. ९ : आवश्यक असेल तेथे जलनिस्सारणाचे कामात सुधारणा तसेच इमारतीच्या सभोवतालचे पाण्याचा निचरा करणेसाठी व्यवस्थेची कामे.

एस.डी.आर. १० : अति जुने झाले व तडा गेलेले विटांचे खांब व भिंती यांची पुर्नबांधणी करणे.

एस.डी.आर. ११: पावसाळी छप्पर बदलणे.

एस.डी.आर. १२: नुकसान झालेल्या लादीचे (flooring) नुतनीकरण करणे.

ब) विशेष दुरुस्ती (SLR):

(शासन सा.बां. विभागाचे परिपत्रक क्र.बीपीएल-१२९०/सीआर-५९५/इमारत दि.१०.४.१९९०)

इमारतीच्या या दुरुस्त्या किरकोळ स्वरुपाच्या दुरुस्ती व्यतिरिक्त असुन या विशेष दुरुस्त्या दीर्घ कालावधीनंतर ठराविक कालमर्यादेनंतर करावयाच्या असतात.

एस.एल.आर. १ : अशंतः रिरुफींग.

एस.एल.आर.२ : ठराविक वर्षानंतरची रंग रंगोटी.

एस.एल.आर.३ : पाणी पुरवठा व जलनिस्सारणाची पाईप लाईन बदलणे.

एस.एल.आर. ४: विशिष्ट कालावधी नंतर खिडक्या, दरवाजे ग्रील वर्क यांना ऑईल पेटींग करणे.

एस.एल.आर. ५ : विद्युत वायरींग बदलणे.

एस.एल.आर.६ : भिंतीचा गिलावा बदलणे

एस.एल.आर.७ : इमारतीचे नुकसान झाल्यास विशेष दुरुस्तीच्या संकीर्ण बाबी

महाराष्ट्र सा.बां. विभागाचे नियमावलीतील परिच्छेद १९७ नुसार विशेष दुरुस्ती अंदाजपत्रकाचे काम हे काम संपेपर्यंत किरकोळ दुरुस्तीचेच संबोधण्यात येते. मुळ बांधकामाप्रमाणेच विशेष दुरुस्तीचे कामाचे अंदाजपत्रक संबधीत अधीक्षक अभियंता यांचे कडून मंजूर करुन घेणे बंधनकारक आहे.विशेष दुरुस्तीचे कामांना तात्रिक मान्यता मात्र संबधीत सक्षम अधिका-याने द्यावयाची असते. विशेष दुरस्तीचा कार्यक्रम साधारणतः उपलब्ध होणा-या अनुदानाच्या किमान ५० टक्के असावा.

क) किरकोळ दुरुस्ती (CR) : किरकोळ दुरुस्ती म्हणजे वार्षिक कालांतराने करावयाच्या नियमित बाबी होत. यात सामान्यपणे बारीक सारीक दुरुस्तीच्या तसेच अत्यावश्यक महत्वाच्या दुरुस्तींचा समावेश आहे. (शासन सा.बां. विभागाचे परिपत्रक क्र.बीपीएल-१२९०/सीआर-५९५/इमारत दि.१०.४.१९९०)

सी.आर.१ : दरवाजे व खिडकिंच्या कडया कोयंडे, बिजाग-या दुरस्ती करणे.

सी.आर.२: दरवाजे खिडकयांच्या चौकटीचे व झडपांची (शटर्स) दुरुस्ती.

सी.आर.३ : सॅनिटरी व पाणी पुरवठयाचे फिटींग याची दुरुस्ती.

सी.आर.४ : दरवाजे / खिडक्या भिंतीना रंग देणे.

सी.आर. ५: फ्लोरिंगची दुरुस्ती /जमीनी वरील लादीची दुरुस्ती.

सी.आर.६: भिंतीच्या गिलाव्याची व दर्जाची दुरुस्ती.

सी.आर.७: छप्पराची दुरुस्ती उदा.कौले शाकारणे/कौले बदलणे /जलरोधक प्रक्रीयेचे काम करणे.

सी.आर.८: पावसापासून संरक्षण उदा.बांबुची चटई बसविणे किंवा वाटर प्रुफींग कपडा टाकणे/टारपोलीन इ.

सी.आर. ९: विद्युत मांडणीची व जोडणीची देखभाल.

सी.आर.१० : समान स्वरुपाच्या पण किरकोळ बाबी.

(संदर्भ :सा.बा.विभागाचे परिपत्रक क्र.बीपीएल-१२९०/सीआर-५९५/बीएलडीजी-१/मंत्रालय मुंबई दि.१० एप्रील १९९०)

३.७.४ किरकोळ दुरस्तीचे अंदाजपत्रकास संबधीत विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी मंजूरी द्यावयाची आहे. किरकोळ दुरुस्तीचे वार्षिक अंदाजपत्रक संबंधीत इमारतीचा वापर करणा-या विभाग प्रमुखांचे सल्ल्याने तयार करावयाचे असते. शासकीय इमारत / निवासस्थाने यामध्ये वापरणा-या व राहणा-या व्यक्तींचे तक्रारीचे अनुषंगाने दुरुस्ती करावयाची असते.

३.७.५ शासकीय इमारतींची देखभाल व दुरुस्ती साठी शासनाने मानके निश्चित केली आहेत. शासन परिपत्र क्र.बीडीजी-१०८८/सीआर-१४०/बी.एल.डी.जी.२ दि.१९.३.१९९१ नुसार अनुदानाची उपलब्धता करावयाची असते.

३.७.६ इमारतीचे वार्षिक देखभाल दुरुस्तीचे अंदाजपत्रक , इमारतीचा वापर करणा-या व इमारतीत मालकी हक्काने राहण्या-या विभागाचे सल्ल्याने करावयाचे असते या बाबत शासनाचे परिपत्रक क्र. बीपीएल १२९०/सीआर ५९५/इमारती-१ मंत्रालय मुंबई दि.१० एप्रील १९९० नुसार मार्गदर्शक सुचना दिल्या आहेत. त्यानुसार इमारतीचे परिसरात एक सेवा केंद्र स्थापन करण्यात येते व त्यात इमारतीच्या दुरुस्ती संबधातील तक्रारी नोंदविण्यासाठी तक्रार पुस्तक ठेवण्यात येते. सेवाकेंद्राबाबत अधिक तपशिल प्रकरण क्र.३.२ मध्ये देण्यात आला आहे.

३.७.७ इमारतींच्या देखभाली दुरुस्तीबाबतची मानके शासन स्तरावरुन आवश्यकते नुसार वेळोवेळी सुधारीत करण्यात येतात.

३.८ कंत्राटदाराची नोंदणी

स्थापत्य विभाग

३.८.१ सा.बां.खात्यात नोंदणी/नुतनीकरण व वरच्या वर्गाचे नोंदणीकरणासाठी जे कंत्राटदार इच्छूक असतील अशांना अर्ज करुन नोंदणी करता येते. यात वैयक्तीक/भागीदारी संस्था/ खाजगी मर्यादित/ कंपनी/ सार्वजनिक मर्यादीत कंपनी इ.नोंदणीसाठी पात्र ठरतात.

३.८.२ कंत्राटदार/भागीदारी संस्था/कंपनी यापैकी जे कोणी नोंदणीकरीतां इच्छूक असतील ते सा.बां.खात्याकडे विहित नमुन्यात अर्ज सादर करु शकतात.

अर्ज सादर करतांना खालील बाबींची काळजी घेणे आवश्यक असते.

- अर्जदाराचे पूर्ण नांव (संपूर्ण पत्त्यासहीत.)
- अर्जदार, भागीदारी संस्था, मालक किंवा कंपनी असल्यास त्याबाबतचे पुरावे सादर करणे आवश्यक आहे.
- अशा भागीदारी संस्था किंवा कंपनी यातील कोणा व्यक्तीला अधिकार दिले असल्यास अधिकार दिल्याचे पुरावे सादर करावे.
- भागीदारी संस्था किंवा कंपनी असल्यास भागीदारांची संख्या व त्यांचा टक्केवारी वाटा सुध्दा कळवावा.
- बँकेचे योग्य त्या रक्कमेचे पतदारी प्रमाणपत्र आवश्यक असते.
  व्यवसायाच्या भागी संबंधीचा संपूर्ण तपशिल सादर करावा.
- कंत्राटदाराला नोंदणी/नुतनीकरण/वरचा वर्ग यापैकी कोणत्या बाबीत नोंदणी करावयाची आहे हे लिहिणे आवश्यक असते.
- कंत्राटदाराने प्रत्येक कामासाठी अनामत रक्कम भरणे आवश्यक असते. तसेच कंत्राटदाराला काही ठराविक रक्कमेत सूट हवी असल्यास त्यांनी त्याबाबत अर्ज करावा.
- कंत्राटदाराने गेल्या तीन वर्षातील पूर्ण केलेल्या सर्व कामाबद्दलचा तपशिल तसेच सध्या सुरु असलेल्या कामांच्या यादीचा तपशील सादर करावा.
- कंत्राटदाराकडे किती हत्यारे व संयंत्रे आहेत त्याबद्दल सविस्तर माहिती सादर करावी.
- कंत्राटदार/कंत्राटदाराचे भागीदार/निर्देशक तसेच त्यांच्या अखत्यारीतील तांत्रिक कर्मचारी यांच्या तांत्रिक पात्रतेबद्दल सुध्दा सविस्तर माहिती सादर करावी.
- कार्यशाळा, यंत्रे, हत्यारे व औजारे इ.सुस्थितीत असण्याबाबतची सविस्तर माहिती सादर करावी.
- कंत्राटदार दुसऱ्या कोणत्या विभागात/संस्थेत/इतर राज्यात काम करीत असल्यास त्याबाबतची माहिती सादर करावी.
- सदर अर्जातील अ.क्र.१४अ व ब यातील सविस्तर माहितीसादर करावी.
- अद्ययावत आयकर प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत.
- बँकांकडून प्राप्त झालेले पतदारी (सॉल्व्हन्सी) प्रमाणपत्र स्विकारण्यात येतात.
  (सर्व सा.बां. विभागाकडे छापील फॉर्म उपलब्ध आहेत.)

सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याची कंत्राटदार म्हणून नोंदणी

३.८.३ सुशिक्षित बेरोजगार अभियंते जे महाराष्ट्रातील रहिवासी असून पदवी किंवा पदविकाधारक आहेत ते परिक्षा उत्तीर्ण झाल्यापासून दहा वर्षात वर्ग-५ अ मध्ये नोंदणी करु शकतात. अशी नोंदणी करतांना खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावीत.

१) पदवी किंवा पदविका प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत.
२) महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असल्याबाबतचे प्रमाणपत्र.
३) तीन पासपोर्ट आकाराचे फोटो.
४) नोंदणी फी म्हणून रु.५०/- भरण्यात आलेल्या पावतीची छायांकित प्रत.
५) बेरोजगार असणे बाबत प्रतिज्ञापत्र
६) सेवा योजना कार्यालाचे ओळखपत्र

स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक प्रमाणपत्र धारकांची कंत्राटदार म्हणून नोंदणी.

३.८.४ तंत्रशिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य हयांनी दिलेले स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक प्रमाणपत्र धारण करणाऱ्या अर्जदारांना वर्ग-७ मध्ये थेट नोंदणी देण्यात येते. इतर तपशील वर नमुद केल्याप्रमाणे आवश्यक आहे. कंत्राटदार म्हणून नोंदणीसाठी अर्ज सर्व सा.बां.विभागाकडे उपलब्ध असतात.

सेवानिवृत्त किंवा राजीनामा दिलेल्या अभियंत्यांना देण्यात येणारी नोंदणी

(संदर्भ : शासन निर्णय क्र.सीअेटी-१०९६/सीआर-१७२/इमारती-२ दि.२०/४/१९९८)

३.८.५ उपरोक्त शासन निर्णय परिच्छेद ७ अ नुसार महाराष्ट्र शासनाने / महाराष्ट्र शासनाचे अंगीकृत व्यवसाय तसेच महाराष्ट्र शासनाने स्थापलेल्या मंडळ यातून सेवानिवृत्त झालेल्या किंवा राजीनामा दिलेल्या अभियंत्यांना खालीलप्रमाणे सरळ (Direct) नोंदणी देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. सदरची नोंदणीसाठी सक्तीने निवृत्त केलेले अधिकारी पात्र ठरत नाहीत.

i) कार्यकारी अभियंता व त्यावरील अभियंता पदावर सेवा असलेल्या अभियंत्यांना वर्ग ५ मध्ये सरळ नोंदणी.

ii) त्याखालील सेवा असलेल्या अभियंत्यांची वर्ग-६ मध्ये सरळ नोंदणी

iii) शासन सेवेतून राजीनाम दिलेल्या कनिष्ठ अभियंता व त्यावरील पदाचे अधिका-यांना सरळ वर्ग-७ मध्ये नोंदणी देणेत येते.
(फक्त त्यांना सेवेत ५ वर्षापेक्षा कमी अनुभव असेलतर)

iv) सदरच्या सवलतीसाठी सेवानिवृत्त झाल्यापासून दोन वर्षानंतर किंवा ५ वर्षाचे आत अर्ज करणारे अधिकारी पात्र ठरतात.

v) उपरोक्त शासन निर्णय परिच्छेद - ७ (ब) नुसार सैन्यदलातून सेवानिवृत्त झालेल्या अभियंत्यांना वर्ग ७ मध्ये सरळ नोंदणी मिळते.

vi) नोंदणीसाठी त्यांनी सैन्यदलात कात केलेचे प्रमाणपत्रासह व पतदारी प्रमाणपत्रासह अर्ज करणे आवश्यक आहे.

३.८.६ कंत्राटदार म्हणून वर्गाची नोंदणी, कोणत्या रक्कमेपर्यन्त काम घेता येते, कमीत कमी सॉल्व्हन्सी, नोंदणी फी, मागील तीन वर्षाची वार्षिक उलाढाल आणि सध्या काम असलेल्या कामांची अंदाजित रक्कम दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

संदर्भ :- १) शासन सा.बां.विभाग, मंत्रालय, मुंबई ठराव क्र.सिएटी/सिआर-१७२/बिल्डींग-२ दि.२०/४/९८ व २) शुध्दीपत्र क्र.सीएटी-१०९६/प्र.क्र.१७२/इमारती-२/ दिनांक २०/८/९८.

२) शुध्दीपत्रक सीएटी/१०९६/प्र.क्र.१७२/इमा.२ दि.२१.९.२०००

३) शासन निर्णय क्र.सीएटी-२००६/प्र.क्र.१४१/इमा.२ दि.६.२.२००७

वर्ग	कोणत्या रक्कमेपर्यन्त काम करता येते (रु.लाखात)	कमीत कमी सॉल्व्हन्सी (पतदारी लाखात)	नोंदणी फी (रुपये)	वार्षिक उलाढाल (३ वर्षाची सरासरी) (लाखात)	सध्या चालू असलेल्या कामांची अंदाजीत रक्कम (लाखात.)	अनामत रक्कमेची सूट मिळणे बाबत जमा कराव याची सुरक्षा ठेव	नोंदणी मंजुरी अधिकार.
१ अ. ब. क.	अमर्यादीत २५०० लक्ष १५०० लक्ष	१५० १५० १५०	७५००	३००	४५०	५.००	सचिव, सा.बां. विभाग, मंत्रालय,मुंबई
२.	७५०	७५	४५००	२००	३००	३.५०	वरिलप्रमाणे
३.	३००	३०	३०००	९०	१५०	३.००	वरिलप्रमाणे
४.	१५०	१५	१५००	६०	८०	२.००	मुख्य अभियंता सा.बां.प्रादेशिक विभाग,
४अ.	९०	०९	१५००	४०	६०	१.५०	वरिल प्रमाणे
५.	५०	०५	७५०	२५	३०	१.२५	अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ.
५अ.	३०	०३	७५०	१५	२०	-	वरिल प्रमाणे
६.	१५	०२	७५०	७.५०	१०	१.००	वरिल प्रमाणे
७.	१०	०१	६००	१.५०	०३.००	--	वरिल प्रमाणे
८.	०५	०.५०	४००	१.००	१.५०	--	कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग
९.	०३	०.२५	४००	०.५०	१.००	--	वरिल प्रमाणे

विद्युत विभाग

३.८.७ शासन विभागाचे परिपत्रक क्र.सीएटी/०१/०५/२६/इमा.२ दि.३१.३.२००५

विद्युत विभागाकडील कंत्राटदारांच्या नोंदणीचे निकष पुढील प्रमाणे आहेत.

अे	अमर्यादीत	०८	२०००	२०	४०	१.००	मुख्य अभियंता (विद्युत) सा.बां.
बी	२५	०४	१५००	१०	३०	०.५०	वरिल प्रमाणे
सी	१०	०३	६००	०६	१५	०.३०	अधीक्षक अभियंता (विद्युत) सा.बां.
डी	७.५०	१.५०	४००	०३.००	०८.००	०.२०	वरिल प्रमाणे
ई	२.००	०.५०	३००	०१.००	०१.७५	०.१५	कार्यकारी अभियंता (विद्युत) सा.बां.

कंत्राटदार म्हणून नोंदणी वरच्या वर्गात तसेच नुतनीकरण करण्याबाबतचे सविस्तर नियम सा.बां.विभागाकडे उपलब्ध आहेत. तसेच काही नोंदणीच्या नियमात फेरबदल झाल्यास याबाबतची माहिती सुध्दा संबंधीत सा.बां.विभागाकडे उपलब्ध आहेत.

महत्वाच्या सजावटीच्या कामांकरीता कंत्राटदाराची नोंदणी.

३.८.८ फर्निचर/मॉडयुलर फर्निचर/ अंतर्गत सजावटीचे तसेच वास्तुशास्त्रीयदृष्टया महत्वाची सजावटीची कामे ही विशिष्ट स्वरुपाची असल्याने ती कामे दर्जेदार होण्याच्या दृष्टीने उत्पादक अथवा पुरवठादार/ अंतर्गत सजावटकारांची वेगळी नोंदणी करणेबाबत शासनाने मान्यता दिली आहे. सध्या महाराष्ट्र शासनाकडे नोंदणीकृत असलेल्या स्थापत्य कंत्राटदारांना अशा प्रकारच्या कामांच्या स्पर्धेत भाग घ्यावयाचा असल्यास, त्यांनी पुढीलप्रमाणे वर्गीकरणानुसार नोंदणी करुन घेणे अनिवार्य आहे.

फर्निचर/मॉडयूलर फर्निचर उत्पादक अथवा पुरवठादार/ अंतर्गत सजावटकारांसाठी कंत्राटदार नोंदणीचे वर्गीकरण

नोंदणी वर्ग	काम करण्याची कमाल मर्यादा (रु.लाखात)	किमान पतदारी (रु.लाखात)	सरासरी वार्षिक आर्थिक उलाढाल (रु.लाखात)	हातातील कामे (रु.लाखात)	केलेली मोठी कामे (प्रारंभिक नोंदणी २ कामे, नुतनीकरण १ काम) (रु.लाखात)	आस्थापनेवरील शासन मान्य अर्हता प्राप्त किमान तांत्रिक कर्मचारी वर्ग	नोंदणी शुल्क (रु.लाखात)	नोंदणी मंजूर करण्याचे प्राधिकार	नोंदणी करणारे प्राधिकृत कार्यालय
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
आय	अमर्याद	१००.००	२००.००	३००.००	१५०.००	२ पदवी / पदविका प्राप्त वास्तुशास्त्रज्ञ ४ अंतर्गत सजावटदार	०.२०	शासन	मुख्य वास्तुशास्त्रज्ञ
आय-२	१५०.००	३०.००	७५.००	९०.००	५०.००	२ पदवी / पदविका प्राप्त वास्तुशास्त्रज्ञ २ अंतर्गत सजावटदार	०.१५	शासन	मुख्य वास्तुशास्त्रज्ञ

१	२	३	४	५	६	७	८	९	१०
आय ३	१००.००	२०.००	५०.००	६०.००	१५.००	२ अतर्गत सजावटदार	०.१०	शासन	उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ
आय-४	५०.००	१०.००	२५.००	३०.००	७.००	१ अतर्गत सजावटदार	०.०५	शासन	उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ
आय-५	१५.००	३.००	७.५०	१०.००	३.००	--	०.०३	शासन	उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ
आय ६	७.००	१.००	३.५०	३.००	२.००	--	०.०२	शासन	उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ

नोंदणी करणाऱ्या संबंधीत प्राधिकृत कार्यालयाने वर नमुद केलेल्या वर्गीकरणानुसार नोंदणी प्रस्तावित करतांना पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून कार्यवाही करावी.

अ) नोंदणी प्रस्तावातील खाजगी कामे :-

फर्निचर/मॉडयुलर, फर्निचर उत्पादक अथवा पुरवठादार/ अंतर्गत सजावटकाराने पार पाडलेल्या/ हाती असलेल्या खाजगी कामांच्या बाबतीत संबंधित अनुज्ञाप्तीधारक वास्तुशास्त्रज्ञ/ अभियंता यांचे प्रमाणपत्र अनिवार्य राहील. खाजगी कामांच्या अंदाजित खर्चाच्या ५०% एवढी रक्कम उलाढालीसाठी तथा हाती असलेल्या कामांसाठी विचारात घेण्यात यावी.

ब)अर्हताप्राप्त वास्तुशास्त्रज्ञांना/ अंतर्गत सजावटकार उमेदवारांना थेट नोंदणी देण्याबाबत.

१) वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ किंवा त्यावरील पदावरुन शासन सेवेतून नियत वयोमानानुसार निवृत्त झालेल्या किंवा किमान १० वर्षे शासन सेवेत कार्यरत राहून, शासन सेवेतून स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या/ राजीनामा दिलेल्या वास्तुशास्त्रज्ञांना देखील वर्ग आय-४ मध्ये थेट नोंदणी देण्यात येते.

२) बेरोजगार पदवी/पदविका प्राप्त वास्तुशास्त्रज्ञंना वर्ग आय-५ मध्ये थेट नोंदणी देण्यात येते.

३) शासन मान्यता प्राप्त अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या बेरोजगार अंतर्गत सजावटकारांना वर्ग आय-६ मध्ये थेट नोंदणी देण्यांत येते.

वरील परिच्छेद २ व ३ मधील बेरोजगार उमेदवारांना प्रथम नोंदणीसाठी नोंदणी शुल्क आकारण्यांत येत नाही.

क) नोंदणी प्रस्तावासोबतच्या कागदपत्रांची छाननी/ पडताळणी/खातरजमा करण्याबाबत

i) फर्निचर/ मॉडयुलर फर्निचर उत्पादक अथवा पुरवठादार/ अंतर्गत सजावटकाराने मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/ उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडे नोंदणीसाठी प्रस्ताव दाखल केल्यानंतर प्रस्तावासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्र/ कागदपत्र यांच्या सत्यतेबाबत तसेच कामाच्या किंमतीच्या वाजवीपणा बाबतची खातरजमा मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/ उप मुख्यवास्तुशास्त्रज्ञ यांनी ज्या कार्यालयाने/ प्राधिकरणाने अशी प्रमाणपत्रे/ कागदपत्रे दिली आहेत, त्या कार्यालयाकडे प्रत्यक्ष संपर्क साधून/ आवश्यक वाटल्यास कामास भेट देऊन करुन घ्यावी.

ii) फर्निचर/ मॉडयुलर फर्निचर उत्पादक अथवा पुरवठादार/ अंतर्गत सजावटकाराने सादर केलेल्या प्रस्तावातील मूळ प्रमाणपत्र/ कागदपत्र याच्या सत्यतेबाबत खातरजमा केल्यानंतर नोंदणी संदर्भात शासनास सादर करावयाच्या प्रस्तावासोबत विविध प्रमाणपत्रे/ कागदपत्रे यांच्या सत्य प्रतीलिपी ज्या कार्यालयाकडून प्रस्ताव सादर करण्यांत येतो, त्या कार्यालयाच्या प्रमुखांच्या स्वाक्षरीनेच साक्षांकित केलेल्या असाव्यात. ही स्वाक्षरी, संबंधीतांचे नांव, पदनाम व दिनांकासह असावी.

iii) फर्निचर/ मॉडयुलर फर्निचर उत्पादक अथवा पुरवठादार/ अंतर्गत सजावटकाराने खाजगी कामे केल्याबाबतची प्रमाणपत्रे प्रस्तावासोबत सादर केली असल्यास, ती कामे संबंधीतांनीच केली आहेत याची शहानिशा संबंधीत अधिकारी यांनी करावी तसेच त्या कामाच्या किंमतीबाबत खातरजमा करावी.

iv) सक्षम अधिकाऱ्यांकडे नोंदणी प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करावयाच्या प्रस्तावा सोबत **'प्रमाणित करण्यांत येते की, मे./श्री.----------------------------------- --- या वर्ग --------- मधील नोंदणीच्या प्रस्तावात असलेल्या सर्व कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या सत्यतेबाबत संबंधित कार्यालयांशी संपर्क साधून खातरजमा करणेत आली आहे'** असे प्रमाणपत्र मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांनी देणे अनिवार्य आहे.

v) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/ उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांनी नोंदणीबाबतच्या प्रस्तावाची सखोल छाननी करुन वर नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावातील विविध प्रमाणपत्रांच्या सत्यतेबाबत खातरजमा करुनच आवश्यक अटींची/निकषांची पूर्तता होत आहे, असेच प्रस्ताव मंजुरीसाठी शासनास सादर करावेत.

vi) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/ उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांच्याकडून प्राप्त झालेल्या नोंदणी प्रस्तावातील **प्रमाणपत्रे खोटी असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांची नोंदणी रद्द करण्यांत येईल व त्यांचेविरुध्द मुख्य वास्तुशास्त्रज्ञांमार्फत उचित कायदेशीर कारवाई करण्यांत येईल.** तसेच प्रस्तावातील कागदपत्रांची छाननी/ पडताळणी/खातरजमा करणेबाबत दक्षता न घेतल्याबाबत ज्या कार्यालयातून असे प्रस्ताव सादर करण्यांत येतील त्या मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/ उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञांवर व त्या कार्यालयातील इतर संबंधीतांवर कारवाई करण्यांत येईल.

vii) शासकीय/निमशासकीय प्रयोजनासाठी फर्निचर/मॉडयुलर फर्निचर/ अंतर्गत सजावटीची कामे नोंदणीकृत फर्निचर/ मॉडयुलर फर्निचर उत्पादक अथवा पुरवठादार/ अंतर्गत सजावटकार यांचेकडूनच करुन घेणे सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांवर बंधनकारक राहील. **अशी कामे अनोंदणीकृत फर्निचर/ मॉडयुलर फर्निचर उत्पादक अथवा पुरवठादार/ अंतर्गत सजावटकार यांचेकडून करावयाची झाल्यास, त्यास शासनाची मंजुरी घेणे हे संबंधीत अधिकाऱ्यास/यंत्रणेस बंधनकारक राहील.**

viii) नोंदणीकृत कंत्राटदारांचे दर्जोन्नतीकरण व नुतनीकरण या बाबी संदर्भाधीन दिनांक

२०.०४.१९९८ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार करण्यात यावे.

ix) वरील माध्यमातुन उपलब्ध होणाऱ्या नोंदणी शुल्काची रक्कम '००५९ - सार्वजनिक बांधकामे इतर जमा' या लेखाशिर्षाखाली जमा करण्यांत यावी.

* * *

४.१ बांधकाम यंत्र सामुग्री व निरिक्षण वाहनांची देखभाल व दुरुस्ती करणे

सा.बां.विभागाकडील यांत्रिकी शाखेकडे, शासन परिपत्रक क्र.एमसीएन-११८२/(२२८८)/डेस्क-३१ दि.२९ जुलै १९८२. नुसार शासकीय यंत्राचे (बांधकाम यंत्रसामुग्री व निरिक्षण वाहने) फक्त दुरुस्ती व देखभालीचे काम सोपविले आहे. यंत्र सामुग्रीचा मालकी हक्क, वापर अनुदान, पाखरण व आस्थापना इ. भाग स्थापत्य विभागाकडे सोपविला आहे. यंत्रसामुग्रीची देखभाल व दुरुस्तीची कार्यपध्दती व मानके खालील प्रमाणे आहेत.

४.१.१ मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक हे दरवर्षी शासकीय यंत्र सामुग्रीचे वापर, देखभाल व दुरुस्तीचे (O.M.& R) ढोबळ स्वरुपाचे दर निश्चित करतात व त्यानुसार त्या आर्थिक वर्षात यंत्र सामुग्रीची भाडे वसुली व दुरुस्तीवर खर्च करण्यात येतो. तसेच त्यानुसारच यंत्र सामुग्रीचा वर्षभरात होणारा संभाव्य वापर (Working Norms) ठरविण्यात आलेला असतो.

४.१.२ वरील प्रमाणे दरवर्षी मुख्य अभियंता यांनी निश्चित केलेल्या दर सुची नुसार यंत्र सामुग्रीचा वार्षिक वापर, देखभाल व दुरुस्तीचे ढोबळ अंदाजपत्रक (Operation, Maintainance and Repair Estimate) तयार करण्यात येते. सदर अंदाजपत्रक उप अभियंता (यां.) हे आर्थिक वर्षाच्या सुरवातीला संबंधीत विभागाकडे असणा-या वापरण्या योग्य यंत्र सामुग्रीच्या संख्येनुसार तयार करुन संबंधीत सार्वजनिक बांधकाम विभागीय कार्यालयामार्फत सहाय्यक मुख्य अभियंता(यां.) यांचेकडे तांत्रिक तपासणीसाठी सादर करतात. सहाय्यक मुख्य अभियंता (यां.) तांत्रिक तपासणी करुन O.M.R. अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी संबधीत अधीक्षक अभियंता यांचे कडे पाठवितात त्यास संबधीत सार्वजनिक बांधकाम मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रशासकीय मान्यता देतात.

४.१.३ उपरोक्त दिनांक २९ जुलै १९८२ च्या शासन परिपत्रकानुसार कार्यकारी अभियंता हे वापर, देखभाल व दुरुस्तीसाठी लागणाऱ्या अनुदानाची एकत्रित तरतुद करुन उप अभियंता (यांत्रिकी) यांचे मार्फत दुरुस्ती व देखभाल करुन घेतात. देखभाल व दुरुस्तीवर झालेल्या खर्चाचे लेखे सा.बां. लेखा संहितेनुसार विभागीय कार्यालयात अद्यावत ठेवले जातात. वेळोवेळी दुरुस्ती कामासाठी करावे लागणारे दुरुस्ती अंदाजपत्रक हे गरजेनुसार शाखा अभियंता (यां.)/ कनिष्ठ अभियंता (यां.) / सहा. अभियंता (यां.) हे उप अभियंता (यांत्रिकी) यांचे देखरेखी खाली तयार करतात व कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची प्रशासकीय मान्यता घेण्यात येते. अंदाजपत्रकास सक्षम अधिकारी यांचेकडून तांत्रिक मंजूरी शासन परिपत्रक क्र.एम.सी.एन.१६९८/११/ यंत्रसामुग्री दिनांक २६ मार्च १९९८ नुसार घेण्यात येते. केलेल्या दुरुस्ती कामाच्या खर्चासह तपशिल व रजिष्टर नोंदवहया अधीक्षक अभियंता (यां.) यांचे New Machinary Accounting (पत्र क्र. Mech./१०६(१२)/८३१५) दि. ११ जुलै १९८५) नुसार ठेवण्यात येतात. यंत्र सामुग्रीचा वापर हा स्थापत्य विभागाकडे असल्यामुळे यंत्र सामुग्री दुरुस्तीनंतर त्यांचे मुळ उप विभागाकडे पाठविण्यात येते.

४.१.४ यंत्र सामुग्री दुरुस्ती ही प्रथम विभागातील यांत्रिकी शाळेत अथवा विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून (यांत्रिक, जोडारी इ.) प्रथम प्राधान्याने करवून घेण्यात येते. परंतु पुरेसे

कर्मचारी, उपकरणे उपलब्ध नसल्यास नोंदणीकृत खाजगी कार्यशाळेकडून शाखा अभियंता (यां.)/ उप अभियंता (यां.) यांचे देखरेखी खाली करवून घेण्यात येते. दुरुस्ती कामाचे सविस्तर बाबनिहाय दरपत्रक अधीक्षक अभियंता (यां.) दरवर्षी तयार करतात दुरुस्तीसाठी लागणारे सुटे भाग गरजेनुसार नोदणीकृत पुरवठादारांकडून निविदा मागवून सा.बां.विभागाच्या प्रचलित पध्दतीनुसार उपलब्ध करुन घेण्यात येतात.

४.५.१ देखभाल व दुरुस्तीची मानके

अ. क्र.	कार्यसुची	यासाठी विहित असलेले मानक (Norms) निकष /उदिष्टे	सा.बां. नियमावली / लेखासंहिता शासन आदेश/ परिपत्रक इ. संदर्भ
१.	सार्वजनिक बांधकाम विभागातील यंत्र सामुग्री व निरिक्षण वाहनांची देखभाल व दुरुस्ती करणे	शासनाने ठरवून दिलेल्या वार्षिक वापर,देखभाल व दुरुस्ती यांच्या मानकाप्रमाणे यंत्रसामुग्रीचा वापर, देखभाल व दुरुस्ती केली जाते.	१) शासन परिपत्रक क्रएमसीएन/११८२/ (२२८८२) डेस्क-३१ २९ जुलै १९८२
२.	यंत्र सामुग्रीच्या वापर, देखभाल व दुरुस्ती (Operation & maintainance and repair estimate) अंदाज पत्रकातील दुरुस्ती व देखभाल (B+C5) या घटकासाठी वेळोवेळी गरजेनुसार अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता ही शासनाने दिलेल्या (पत्र क्र.एमसीएन/ १६९८/११/ यंत्रसामुग्री दिनांक २६ मार्च १९९८) अधिकारानुसार तांत्रिक मर्यादेच्या अधीन राहून तांत्रिक मंजुरी देण्यात येते.	देखभाल व दुरुस्ती (Operation & maintainance and repair) अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यातील फक्त देखभाल व दुरुस्ती या घटकाच्या तरतुदी नुसार यंत्र सामुग्रीची दुरुस्ती व देखभाल करण्यात येते. यंत्र सामुग्रीच्या दरवर्षी संभाव्य वापराचे निकष खालील प्रमाणे वार्षिक उपलब्ध कामाचे दिवस २००. १) रोड रोलर - ८ ते १० टन - १००० तास २) ट्रक ५ टनी- २०,००० कि.मी. ३) ट्रक ७.५ टन - २०,००० कि.मी. ४) वॉटर टँकर - ५ टन - १००० तास ५) वॉटर टँकर- ७.५ टन- १००० तास ६) टीपर ५ टन २०.०० कि.मी. ७) टीपर ७.५ टन- २०००० कि.मी. ८) ॲस्पाल्ट मिक्सर - ५०० तास ९) क्रशर / ग्रॅन्युलेटर- ५०० तास १०) क्राऊलर ट्रॅक्टर - ५०० तास ११) मोबाईल ब्रिज इनस्पेक्शन युनिट-५०० तास १२) टफ रायडर१,२ व ३ टन.- ५०० तास १३) जेसीबी-१.२ .- ५०० तास १४) व्हील ट्रॅक्टर - ५०० तास १५) कार- ३०,००० कि.मी. १६) जीप- २१६०० कि.मी. १७) मोबाईल व्हॅन ३ टन-२१६०० कि.मी.	

४.२ हॉटमिक्स प्लँट व सहयोगी यंत्राची तपासणी

४.२.१ सार्वजनिक बांधकाम विभागाकडील कामे जाहीर निविदा पध्दतीने देण्यात येतात. मोठया प्रमाणात रस्ते बांधणी कामासाठी ठेकेदार त्यांचेकडील हॉट मिक्स प्लँट स्टोन क्रशर व सहयोगी यंत्रसामुग्री वापरतात. अशी यंत्र सामुग्री ही भारतीय रस्ते महासभा (Indian Road Congress, New Delhi) व केंद्रीय सडक परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली यांनी पत्र क्र.- RW-24011/3/2000-RMP(Pt) dated 19th Dec. 2000 नुसार निर्देशीत केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार असण्याबाबत तपासणी करुन ती यंत्रसामुग्री निविदेतील शर्तीनुसार व कामाच्या संकल्प चित्रानुसार (Design) त्या त्या कामावर वापराच्या योग्यतेबद्दल तपासणी करण्यात येते. कामाच्या गरजेनुसार त्या कामावर वापर करण्यास योग्य असल्या बद्दलचे प्रमाणपत्र एक वर्ष कालावधीसाठी देण्यात येते. ठेकेदार हे निविदाचे कोरे फॉर्म मागणी करतेवेळी वैध प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत देतात.

४.२.२ अशी तपासणी करण्यासाठी ठेकेदार सहाय्यक मुख्य अभियंता (यां.) यांचेकडे रितसर अर्ज करतात व अर्जाबरोबर सयंत्रांच्या मालकी हक्क, उभारणी केलेल्या जागेचा तपशील उदा. मालकी / भोगवटा/ भाडे पट्टी इ. प्रदूषण मंडळाचे प्रमाणपत्र, संयंत्राचा तांत्रिक तपशील व इतर पूरक कागदपत्रे जोडतात. कार्यालयाकडून विहीत नमुन्यातील प्रश्नावली (Questionnair) तपासणी यादी (Check List) भरुन घेण्यात येते. तपासणी अधिकारी प्रत्यक्ष जागेवर जाऊन संयंत्रांची जोडणी, उभारणी, तांत्रिक गरजा, मूळ कागदपत्रे यांची तपासणी करुन त्याची नोंद आपल्या अहवालात (Inspection Report) मध्ये नमूद करुन नंतरच कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र वितरीत करण्यात येते.

४.२.३ असे प्रमाणपत्र दिल्यानंतर देखील निविदा स्विकृती नंतर कार्यादेश दिल्यावर प्रत्यक्ष काम सुरु करण्यापुर्वी / सुरु असतांना केंद्रीय सडक परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.- RW-24011/3/2000- RMP (Pt) dated 19th Dec. 2000 नुसार गठीत केलेली समिती (प्रकरण दोन मध्ये सविस्तर उल्लेख आहे) तपासणी करुन त्यांचा तपासणी अहवाल मुख्य अभियंता यांना सादर करतात.

४.२.४ प्रमाणपत्राची मुदत संपल्यानंतर पुन्हा वरील प्रमाणे ठेकेदार नव्याने अर्ज करुन आवश्यक कागदपत्रे नव्याने सादर करतात. पुन्हा मालकी हक्क इ. फेरबदलाची पडताळणी करुन व यंत्रसामुग्रीची प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी करण्यात येते व त्यानंतर प्रमाणपत्र वितरीत करण्यात येते.

४.२.५ हॉटमिक्स प्लँट व सहयोगी यंत्रसामुग्रीच्या तपासणीचे निकष खालील प्रमाणे आहेत

अ. क्र.	कार्यसुची	यासाठी विहीत असलेले मानके (Norms) निकष / उद्दिष्टे	सा.बां. नियमावली / लेखासंहिता शासन आदेश / परिपत्रक इ.संदर्भ
	सा.बां.विभाग अंतर्गत असलेल्या ठेकेदारांकडील हॉट मिक्स प्लँट, पेव्हर फिनीशर, व्हायब्रेटरी रोलर व अस्फाल्ट स्प्रे पंप युनिटची तपासणी करणे व प्रमाणपत्र देणे.	तपासणीपुर्वी ठेकेदाराने खालील प्रमाणे आवश्यक कागदपत्रे द्यावयाची असतात. i)ठेकेदाराचा तपासणी करणेबाबत अर्ज ii)प्लँट युनिटच्या मालकी हक्काची प्रमाणीत देयके / खरेदी खत इ. iii)उभारणी केलेल्या जागेचा ७X१२ उतारा / भाडेपट्‌टी करारनामा. iv)प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र स्वाक्षांकित प्रत. v)भागीदारी पथकाची स्वाक्षांकीत प्रत vi)तांत्रिक तपशील दर्शविणारी माहिती पत्रके vii)विहीत प्रश्नावली (MORT&H नुसार) viii)प्लँटच्या मालकी हक्का बाबत/अथवा इतर खात्रीसाठी आवश्यकते नुसार वचननामा (Affidavit)	१)एमओआरटी अँड एच यांचे परिपत्रक क्र.२४०११/३/२००० दिनांक २.११.२०००. २)सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय पत्र क्रमांक एनएचपी-२००१/ प्र.क्र.६/ रा.म.१, दिनांक ८/१२/२०००. ३)भारतीय रस्ते महासभा व केंद्रीय सडक परिवहन मंत्रालय नवि दिल्ली यांचे परिपत्रक क्र. HM,Paver व VRR साठी RW-24011 /3/2000 RMP (Pt) dated 1 १९ डिसे. २००० नुसार वितरीत

वरिल संपुर्ण कागदपत्रांची तपासणी करुन व प्रत्यक्ष जागेवरील तपासणी करुन सहाय्यक मुख्य अभियंता (यांत्रिकी) हे १ वर्षासाठी यंत्रसामुग्री योग्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र देतात.

* * *

४.३ सुटे भाग पुरवठादार व खाजगी कार्यशाळा यांची नोंदणी

४.३.१ सार्वजनिक बांधकाम विभागातील यंत्र सामुग्रीची दुरुस्तीची कामे यांत्रिकी शाखेमार्फत करण्यात येतात. दुरुस्ती अंदाजपत्रकास सक्षम अधिका-यांनी मंजुरी दिल्यानंतर प्रत्यक्ष दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येते. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सुटया भागांचा साठा (Stock) न करता प्रत्यक्ष गरजेनुसार आवश्यकता भासेल त्यानुसार निविदा मागवून स्थानिक बाजारपेठे मधुन उपलब्ध अनुदानानुसार सुटे भाग खरेदी करण्यात येतात. विविध प्रकारच्या यंत्रसामुग्री असल्यामुळे व शासनाचा निधी अडकुन राहु नये या धोरणामुळे गरजेनुसार सुटे भाग घेण्यात येतात.

४.३.२ तसेच दुरुस्ती काम प्रथम विभागाच्या कार्यशाळेत करण्यावर भर देण्यात येतो. परंतु ज्या विभागात सरकारी कार्यशाळा / विशेष उपकरणे उपलब्ध नसेल अथवा विशिष्ट काम करणारे कर्मचारी नियुक्त नसतील अथवा पुरेशा संस्थेने उपलब्ध नसतील अशा वेळी पूर्णतः अथवा अंशतः कामे बाहेरील खाजगी कार्यशाळेतून करण्यात येतात. अशा कार्यशाळा किंवा सुटेभाग पुरवठादार यांची अधिकृत नोंदणी शासनाचे परिपत्रक क्र.एस.टी.डी.१०९४/२८/का यंत्रसामुग्री दि. १६ जुलै १९९६ नुसार करण्यात येते.

४.३.३ नोदणीसाठी इच्छूक अभिसरणांकडून जुन व डिसेंबर मध्ये वर्तमान पत्रात स्थापत्य विभागामार्फत जाहीरात देवून देकार मागविण्यात येतात. विहित नमुना अर्ज विभागामार्फत विहित शुल्क आकारुन देण्यात येतो. इच्छूक अभिसरणकर्ते आवश्यक कागदपत्रांसह (उदा.संस्था नोंदणी, विक्रीकर प्रमाणपत्र,आयकर निपटारा जागेचा तपशिल अधिकृत विक्रता,होलसेलर इ.) विभागाकडे सादर करतात.खाजगी कार्यशाळा असल्यास संस्था नोंदणी, हमीपत्र कार्यशाळेतील विशेष हत्यारे,उपकरणे,कुशल कर्मचारी संख्या, पात्रता इ.बाबत कागदपत्रे व प्रमाणपत्रे अर्जाबरोबर सादर करतात.

४.३.४ विभागीय स्तरावर तपासणी व छाननी करुन अर्जासह प्रस्ताव शिफारस करुन सहा.मु.अ.(यां.) हे स्वतः अभिसरणांची प्रत्यक्ष जागेवर जावून मुळ कागदपत्रे व सद्यःस्थितीची तपासणी उप अभियंता (यां) समवेत करुन तसे प्रमाणपत्र प्रत्येक अर्जाबरोबर जोडण्यात येते. तपासणी केलेल्या सर्व अर्जाची माहिती प्रपत्रात संकलीत करुन उप अभियंता (यां) हे मुख्यालयीन कार्यकारी अभियंता व त्यांच्या स्वाक्षरीसह (समितीचे सदस्य म्हणून) प्रादेशिक विभागाकडे पाठवितात त्यावर सहाय्यक मुख्य अभियंता (यां) व कार्यकारी अभियंता, द.व.गु.नि.हे छाननी करुन योग्य त्या शिफारशीसह अधीक्षक अभियंता (यां) सा.बां.विभाग, कोकणभवन यांचेकडे नोंदणीसाठी पाठवितात. अधीक्षक अभियंता (यां) हे पडताळणी करुन पात्र अभिसरणांकडून नोंदणी शुल्क स्विकारण्याबाबत संबधित विभागास कळविण्यात येत.

शुल्क भरणा केल्याचा अहवाल प्राप्त झाल्यावर अधीक्षक अभियंता (यां) नोंदणी करुन, नोंदणी प्रमाणपत्र त्या त्या विभागाकडे वितरणासाठी पाठवितात.

सदर नोंदणी ३ वर्षासाठी ग्राहय असते व त्यानंतर फेरनोंदणी साठी पुन्हा वरील पध्दत अवलंबवण्यात येते. मात्र पुर्वी केलेल्या कामाबद्दल काही एक तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र संबंधीत उप अभियंता (यां) यांचेकडून घेण्यात येते.

* * *

४.४ निरुपयोगी यंत्रसामुग्रीचे निर्लेखन व लिलाव

४.४.१ सार्वजनिक बांधकाम विभागातील वापरुन निरुपयोगी झालेली, विहित आयुर्मान पूर्ण झालेली , कालबाहय अथवा दुरुस्तीवर मर्यादे पलिकडे खर्च होवून आर्थिक दृष्टया न परवडणारी यंत्रसामुग्री तसेच अपघातात अधिक क्षती झालेली, नैसर्गिक आपत्तीमुळे (आग,भूकंप , पूर किंवा वादळ इ.) कारणांमुळे , किंवा चोरी होवून तपास न लागलेली यंत्र सामुग्री ही स्थापत्य विभागाकडून विहित प्रपत्रांमध्ये (प्रपत्र १ ते ४) निर्लेखन प्रस्तावित करण्यात येते.अशा यंत्र सामुग्रीची विल्हेवाट सा.बां.विभागाच्या लिलाव इत्यादी व्दारे लावण्यात येवून मिळणारा महसूल शासनास जमा करण्यात येतो.

४.४.२ सार्वजनिक बांधकाम विभागाकडील विविध यंत्रसामुग्रीचे आयुर्मान (निर्लेखनास पात्र होण्यासाठी) खालील प्रमाणे ठरविण्यात आले आहे.

विषय	मानके	संदर्भ
सार्वजनिक बांधकाम विभागातील आयुर्मान पूर्ण झालेल्या , आर्थिक दृष्टया न परवडणारी अथवा इतर कारणामुळे निर्लेखन पूर्व तपासणी करुन निर्लेखन शिफारस करणे व निर्लेखन मंजुर असलेल्या यंत्रांची जाहीर लिलावाव्दारे विक्री करणे यासाठी ठरविण्यात आलेले आयुर्मान.	१) शासन परिपत्रकानुसार सार्वजनिक बांधकाम विभागातील यंत्रसामुग्रीचे आयुर्मान खालील प्रमाणे ठरविण्यात आलेले आहे. १) ट्रक (५टन/७.५टन) २,००,००० कि.मी. (१० वर्षे) २) टीप्पर-(५टन/७.५टन)२,००,००० कि.मी. (१० वर्षे) ३) टँकर (५ टन / ७.५ टन) १०,०००तास (१० वर्षे) ४) ॲस्पास्ट मिक्सर - ५००० तास (१० वर्षे) ७/५cft ५) क्रशर / ग्रॅन्युलेटर ५००० तास (१० वर्षे) ६) मोबाईल ब्रिज इन्सपेक्शन युनिट - ५००० तास (१० वर्षे) ७) टफ रायडर १,२,३- ५००० तास (१० वर्षे) १,२,३ टन ८) जे.सी.बी.- ५००० तास (१० वर्षे) १.२cft ९) व्हील ट्रॅक्टर - १,६०,००० (१५ वर्षे) १०) कार - १,६०,००० कि.मी. (१५ वर्षे) ११) जीप - १,६०,००० कि.मी. (१५ वर्षे) १२) मोबाईल व्हॅन ३ टन -१,६०,००० कि.मी.(१५ वर्षे) १३) कॅाम्प्रेसर ३०० cfm- १०,००० तास (८ वर्षे) Portable १४) रोड रोलर - १२००० तास (१०वर्षे) (Compactor)	शासन परिपत्रक क्रमांक mech/१०६/(१२)८३१५दि.१ १/७/१९९५

* * *

५.० किनारी अभियंता

५.१ महाराष्ट्र राज्याला नैसर्गिकरित्या लाभलेल्या समुद्रकिना-यावरील लहान बंदराचे व्यवस्थापन व विकास करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागात शासन निर्णय EPT/१०७२/५०१८५१० दि.२१/६/१९७२ अन्वये चीफ पोर्ट ऑफिसर, हायड्रोग्राफर, पोर्ट इंजिनयर या पदांसह किनारी अभियंता यांचे पद निर्माण करण्यात आले होते. सन १९९० पासून वरील सर्व पदे पुनर्रचीत होऊन गृह खात्याकडे वर्ग झाल्यावर किनारी अभियंत्याचे कामकाज गृह मंत्रालयाच्या अंतर्गत वॉटर ट्रान्सपोर्ट कमीशनर यांच्या नियंत्रणाखाली होत असे. त्यानंतर शासन निर्णय EST-१०९०/६६७७/ CR-२५/प्र-१, दि.३०/८/१९९० अन्वये किनारी अभियंता यांचे प्रशासकीय नियंत्रण सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आले. जुलै २००३ पासून किनारी अभियंता हे मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प),मुंबई यांचे प्रशासकीय व तांत्रिक नियंत्रणाखाली कामकाज करतात.

५.२ सार्वजनिक बांधकाम विभागातील एक अधीक्षक अभियंता हेच किनारी अभियंता म्हणून कार्यरत असतात. त्यांचे कार्यालय, मुंबई येथील जिल्हाधिकारी यांचे कार्यालयीन इमारतीत आहे. त्यांचे नियत्रणाखाली नवी मुंबई, रत्नागिरी व सिंधूदुर्ग या ठिकाणी कार्यकारी अभियंता दर्जाचे तीन पत्तन अभियंता कार्यरत आहेत.

५.३ किनारी अभियंता यांच्या मार्फत करण्यात येणारी कामे व त्याबाबतचे मार्गदर्शक सुचना खालील प्रमाणे आहेत.

अ. क्र.	कामाचा तपशिल	निकष / नियम
१	२	३
१	**गृह खात्यासाठी** समुद्रकिना-याच्या संरक्षणासाठी तसेच किना-यावरील जीवीत व वित्त संपत्तीच्या संरक्षणासाठी स्थानिक लोकांची आवश्यकता व मागणीप्रमाणे ॲंटी-सी-इरोजन बंधारे (धुप प्रतिबंधक बंधारे) बांधणे.	महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाव्दारे ॲंटी-सी-इरोजन बंधा-यांच्या (धुप प्रतिबंधक बंधारे) आवश्यकतेबाबत निर्णय घेण्यात येतात. त्यानुसार किनारी अभियंता आपले यंत्रणेमार्फत सविस्तर सर्वेक्षण करुन त्याचा अहवाल CWPRS पुणे किंवा MERI नाशिक या संस्थाकडे पाठवितात. CWPRS/MERI या संस्थाकडून प्राप्त संकल्पनानुसार अंदाजपत्रके तयार करुन त्यांना महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविण्यात येतात. प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर रु.२५ लक्ष पर्यतच्या कामास पत्तन अभियंता, रु २५ ते ६० लक्ष पर्यतच्या अंदाजपत्रकास किनारी अभियंता व रु ६० लक्ष पेक्षा जास्त रकमेच्या कामास मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) मुंबई हे तांत्रिक मान्यता देतात त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित पध्दतीनुसार बांधकामे करण्यात येतात.

१	२	३
२	ॲटी-सी-इरोजन बंधारे (धुप प्रतिबंधक बंधारे), यांची देखभाल व दुरुस्ती.	आवश्यकतेप्रमाणे
३	**मत्स्यसंवर्धन खात्यासाठी** मासेमारीच्या विकासासाठी लहान बंदरे, जेट्टीज, स्लोपींग जेट्टीज बांधणे.	मासेमारीसाठी लहान बंदरे उभारण्याच्या स्थानिक जनतेच्या मागण्यांबाबत विचार करुन मत्ससंवर्धन विभागामार्फत ती उभारण्याबाबत निर्णय घेतल्या जातो व त्यानुसार कि नारी अभियंता यांना कळविले जाते. त्यानंतर किनारी अभियंता आपल्या यंत्रणेमार्फत सविस्तर सर्वेक्षण करुन सर्वेक्षण अहवाल सेंट्रल इंस्टिटयूट ऑफ कोस्टल इंजिनियरिंग ॲड फिशरीज, बंगलोर या संस्थेकडे पाठवितात. C.I.C.E.F. या संस्थेकडून संकल्पन प्राप्त झाल्यावर अंदाजपत्रके तयार करण्यात येऊन मत्ससंवर्धन विभागामार्फत प्रशासकीय मान्यता देण्यात येते. त्यानंतर किनारी अभियंता अथवा सक्षम अधिकारी तांत्रिक मान्यता देतात व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित पध्दतीनुसार बांधकाम करण्यात येते.
४	फिश ड्राइंर्ग प्लॅटफॅार्मस ऑक्शन हॉल, जेट्टी पर्यत जाणारे रस्ते. समुद्रातील ड्रेजींगची कामे, वाळू काढणे इ.कामे.	आवश्यकते प्रमाणे.

* * *

६. विद्युत विभाग

महाराष्ट्र शासनाच्या सा.बां.विभागातील विद्युत शाखा ही मुख्य अभियंता (विद्युत), सा.बां. विभाग, मुंबई हयांचे नियंत्रत्रणाखाली काम करते मुख्य अभियंता (वि) यांचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य एवढे आहे. मुख्य अभियंता (विद्युत) यांचे अधिपत्याखाली ४ प्रादेशिक विद्युत मंडळ कार्यालये तसेच १२ विभागीय कार्यालये असुन प्रत्येक विभागांतर्गत साधारणपणे जिल्हयाच्या ठिकाणी एक उप विभाग असुन कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक उप विभागात गरजेनुसार शाखा अभियंता कार्यरत आहेत. विद्युत शाखेमार्फत केली जाणारी कामे व त्यांचे निकष खालील प्रमाणे आहेत.

अ. क्र.	कामाचे स्वरुप	निकष	संदर्भ
१	२	३	४
१.	नविन बांधण्यांत येणा-या शासकीय निवासी व बिगर निवासी इमारतींसाठी विद्युत संच मांडणीं, पथदिवे व विद्युत उपकरणे, रोहीत्र, जनित्र, पाणीपंप, इ. बाबींची सोय करणे.	१. नॅशनल इलेक्ट्रीक कोडच्या मार्गदर्शक तत्वानुसार. २. वीज नियम, २००५ ३. वीज अधिनियम,२००३. ४. संबंधीत आयएस नुसार. ५. रु.३७५०००/- पर्यंतच्या मुळ अंदाजपत्रकांना तांत्रिक मंजुरी कार्यकारी अभियंता देतात. ६. रु.३७५००१/- ते रु.१२५००००/- पर्यंतच्या मुळ अंदाजपत्रकांना तांत्रिक मंजुरी अधीक्षक अभियंता देतात. ७. १२५००००/- पेक्षा जास्त रकमेच्या मुळ अंदाजपत्रकांना तांत्रिक मंजुरी मुख्य अभियंता (विद्युत) देतात. ८. कामाचे मुल्य रु.१.५० लक्ष पर्यंत असल्यास शाखा अभियंता यांनी मोजमाप घेऊन सहाय्यक कार्यकारी अभियंता (वर्ग- १)/ सहाय्यक अभियंता श्रेणी-१ (वर्ग-१) / उपविभागीय अभियंता/ उप अभियंता / उप विभागीय अधिकारी हया दर्जाच्या अधिकारी यांनी २५% कामाची तपासणी केली पाहिजे. कामाचे मुल्य रु.१.५० ते २.५० लक्षच्या दरम्यान असेल त्यावेळी ५०% कामाची तपासणी केली पाहिजे. कामाचे मुल्य रु.२.५० लक्ष पेक्षा जास्त असेल तेव्हा१००% कामाची तपासणी केली पाहिजे व कार्यकारी अभियंता हयांनी ५% देयकाची तपासणी केली पाहिजे.	१.सा.बां.हस्त पुस्तिका प्रकरण १६ व सा.बां. नियमावली परिशिष्ट ४२. २.शा.नि. क्रं.जीएन-१०९१/ सीआर/१६९/इमारती-२, मंत्रालय, मुंबई दि.०७.१०.१९९३ ३.शा.नि.क्रं.डीपीडबल्यु/ ११८९/ (५७)/ मंत्रालय, मुंबई दि.१८.११.१९९६ ४. शा.नि.क्रं. संकिर्ण/१०९७/ सीआर-६२२/ इमारती-२, मंत्रालय,मुंबई दि.२९.६.१९९९ ५. सा.बां. नियमावली परिशिष्ट २४ नियम ११.

१	२	३	४
२.	नविन बांधण्यांत येणा-या शासकिय निवासी व बिगर निवासी इमारतींसाठी उदवाहनाची सोय करणे	१. मुंबई उदवाहन अधिनियम, १९३९ २. मुंबई उदवाहन नियमावली, १९५८ नुसार. ३. संबंधित आयएस नुसार.	सा.बां.हस्तपुस्तिका प्रकरण १६
३.	नविन बांधण्यांत येणा-या शासकिय निवासी व बिगर निवासी इमारतींसाठी अग्निरोधक व अग्निशमन यंत्रणेची सोय करणे	१.डी.सी.रुल्स नुसार २.संबंधीत आय.एस.नुसार ३.संबंधीत महापालिकेच्या अग्निशमन दलाकडून मंजुरी घेतली जाते	सा.बां.हस्त पुस्तिका प्रकरण १६
४.	शासकिय निवासी व बिगर निवासी इमारतींच्या विद्युत संच मांडणीं, पथदिवे व विद्युत उपकरणे, रोहीत्र, जनित्र, पाणीपंप, उदवाहन, अग्निरोधक व अग्निशमन यंत्रणा इ. बाबींची तपासणी विविध अधिका-यांनी करणे.	विविध क्षेत्रीय अधिका-यांकडून ठराविक कालावधीने तपासणी केली जाते. उप अभियंता हयांनी वर्षातून दोनदा सर्व इमारतींचे निरीक्षण करायला हवे. कार्यकारी अभियंता यांनी ५०० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या इमारतींचे वर्षातून एकदा निरीक्षण करायला हवे. अधीक्षक अभियंता यांनी ५००० चौ.मी. पेक्षा जास्ती क्षेत्रफळ असलेल्या इमारतींचे व १० मजल्यांपेक्षा जास्ती इमारतींचे निरीक्षण वर्षातून एकदा केले पाहिजे. मुख्य अभियंता यांनी अतिमहत्वाच्या इमारती जसे विधान भवन उच्च न्यायालय, मंत्रालय, वैद्यकिय महाविद्यालय व मुख्य मंत्री निवासस्थान इत्यादि इमारतींचे निरीक्षण वर्षातून एकदा केले पाहिजे.	महाराष्ट्र शासन सा.बां.विभाग, परिपत्रक क्रं.बीडीजी-१०८८/ सीआर-१४०/ बीएलडीजीएस-२ , मंत्रालय, मुंबई दिनांक १९.०३.१९९१ व सा.बां. नियमावली
	शासकिय निवासी व बिगर निवासी इमारतींच्या विद्युत संच मांडणीं, पथदिवे व विद्युत उपकरणे, रोहीत्र, जनित्र, पाणीपंप, उदवाहन,	इमारतीचा प्रकार देखभाल दर रु./.चौ.मी. १. अतिमहत्वाच्या इमारती २०.०० २. जिल्हास्तरावरील प्रशासकिय इमारती १३.७५ ३. इतर इमारती ८.०० ४. महत्वाच्या निवासी इमारती १९.५० ५. इतर निवासी इमारती ९.६० ६. इस्पितळे १६.५०	महाराष्ट्र शासन सा.बां.विभाग, परिपत्रक क्रं.बीडीजी-१०८८/ सीआर-१४०/ बीएलडीजीएस-२ , मंत्रालय, मुंबई दिनांक१९.०३.१९९१

१	२	३	४
	अग्निसुचक व अग्निशमन यंत्रणा इ. बाबींची देखभाल व दुरुस्ती करणे.	अनुज्ञाप्ती प्राप्त विद्युत ठेकेदारांची अ ते ई वर्गात नोंदणी केली जाते. वर्ग / मागील तीन वर्षात पूर्ण केलेली कामे / हातात असलेली कामे	व सा.बां. नियमावली
	विद्युत ठेकेदारांची नोंदणी करणे.	अ रु. ६० लक्ष रु. ४० लक्ष ब रु. ३० लक्ष रु. ३० लक्ष क रु. १८ लक्ष रु. १५ लक्ष ड रु. ०९ लक्ष रु. ०८ लक्ष ई रु. ०३ लक्ष रु. १.७५ लक्ष	सा.बां.नियमावली परिशिष्ट ११
	कामांची गुणवत्ता तपासणे.	मुख्य अभियंता (विद्युत) हयांचे अधिपत्याखालील उप अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण हे विद्युत कामांची तपासणी करतात. वर्षभरात कमीत कमी ५०० कामे ते तपासतात व History Sheets, Log Books, and TS Registers बघतात Major Works , CR Works, SDR Works इ. सर्व प्रकारची कामे ते तपासतात.	सा.बां.नियमावली

* * *